[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

२३२८

१८८

[illegible]

१८८

[illegible]

रा० बळवंत पांडुरंग ऊर्फ अण्णा किर्लोसकरकृत

# संगीत सौभद्र नाटक.

अनंत विनायक पटवर्धन यांनीं

पुणें येथें

" आर्यभूषण " छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

**नवी आवृत्ति.**

( या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क आर्यभूषण छापखान्याचे मालक यांनीं आपल्याकडे ठेविले आहेत )

सन १९१७.

ना ग्रं. ११२६७
२३२६

हें लहानसें पुस्तक

( कैलासवासी )

# रावबहादुर केरो लक्ष्मण छत्रे,

प्रोफेसर, डेक्कन कॉलेज, पुणें,

## यांस

त्यांच्या अलौकिक गुणांवर लुब्ध होऊन,

ग्रंथकर्त्यानें अतिविनयपूर्वक अर्पण केलें आहे.

बळवंत पांडुरंग किर्लोस्कर,

ग्रंथकर्ता.

# प्रस्तावना.

दोन तीन वर्षांपूर्वी कांहीं एक कारणानें या संगीताची कल्पना माझ्या मनांत उद्भवून तदनुसार श्रीमहाकवि कालिदास यांच्या अभिज्ञान शाकुन्तलाच्या चार अंकांचें भाषांतर संगीतांत केलें व त्यास योग्य अशी मंडळी अनुकूल झाल्यानें त्याचा रंगभूमीवर प्रयोगही करून दाखविला; तो रसिकजनांस मान्य झाला असें वाटल्यावरून दुसरे वर्षी त्या नाटकाच्या पुढच्या तीन अंकांचेंही भाषांतर करून, तो ग्रंथ संपवून सर्व प्रयोग आमच्या मित्रमंडळींच्या दृष्टीसमोर आणला. आतां या तिसऱ्या वर्षी आमच्या आर्यबंधूंची सेवा करण्यास कोणतें साधन मिळवावें या विवंचनेंत असतां दुसरीं प्राचीन नाटकें पुष्कळ पुढें येऊन उभीं राहिलीं. परंतु आपल्यापाशीं अनुकूल असलेल्या मंडळीकडे पहातां तीं सर्व नाटकें माझ्या दृष्टीनें असाध्यशीं वाटूं लागलीं. या कारणामुळें आपल्या पुराणांतील एखादा इतिहास घेऊन त्यावर स्वकपोलकल्पित नाटकाची रचना करून हें वर्ष साजरें करावें, असा विचार मनांत ठसलानंतर तसे इतिहास पुष्कळ मनांत येऊन हा अर्जुन-

सुभद्राविवाहाचा इतिहास सर्व प्रकारें ठीकसा वाट-ल्यानें यथामति त्यास नाटकरूप देऊन हें संगित सौभद्र नाटक तयार केले नाटकाचे निबंध पुष्कळ आहेत; तिकडे जितकें ठेववेल तितकें लक्ष देऊन याची रचना केली आहे कितीएक ठिकाणीं इंग्लिश पद्धतीवरही यांत रस आले आहेत. सारांश, हें नाटक स्वतंत्र रीतीनें तयार न होतां अनुकूल असलेल्या मंडळीकडे पाहून रचिलें असल्यामुळें सुज्ञ रसिक यांतील, दोषांकडे दृष्टि न देतां, अल्प गुणांचा बहुमान करतील अशी आशा करतों.

ग्रंथकर्ता.

## दुसऱ्या व पुढील आवृत्तींची प्रस्तावना.

संगीत शाकुंतलाप्रमाणें हेंही नाटक विद्वान् व रसिक जनांच्या पसतीस उतरलें आहे किंवा नाहीं, याची प्रतीति प्रत्यक्षानुभवावरून हजारों लोकांना मि-ळाली आहे व मिळत आहे पुण्यासारख्या ठिकाणीं पंधरा पंधरा वीस वीस प्रयोग होऊन देखील अजून प्रयोगादिदृक्षूंच्या झुंडीच्या झुंडी थिएटरच्या द्वारावर प्रयोगाच्या रात्रीं येऊन धडकतातच. संगीत शाकुंत-

अपेक्षांही या नाटकांत ग्रंथकर्त्यांच्या कावेत्वशक्तीचें तेज विशेष चमकतें. रा. रा अण्णासाहेबांच्या कल्पनाचातुर्याची झांक यांत बरीच दिसून येत आहे; पात्रांच्या अनुरोधानें या नाटकांतील विषयाची योजना झाल्यानें या नाटकाचा प्रयोग उत्तम वठतो, व त्यांतलि रसाचा आस्वाद कितीही घेतला तरी वीट आणीत नाहीं, या गोष्टी साधारणतः सर्वांना मान्य आहेत.

सुभद्राहरण हें चरित्रच आमच्या स्त्रीपुरुषसमाजाच्या प्रीतींतलें आहे; त्यांत रा० रा० अण्णासाहेबांनीं तें " पुनर्बुभुक्षाकरणीं " आपल्या कल्पनाशक्तीनें नवीन गोष्टींचा मालमसाला घालून " तिखटची केलें. " मग तें लोकांना कां प्रिय होऊं नये? सुभद्रेचीं करुणरसप्रधान पद्यें अबालवृद्धांच्या तोंडून, तालसुरांच्या नियमांवर विशेषसा जुलूम न होतां ऐकूं येऊं लागलीं आहेत; तेव्हां हें एक नवीनच करमणुकीचें साधन रा• रा• किर्लोस्करांच्या कृपेनें आम्हांस मिळालें याबद्दल त्यांचे उपकार मानणें वाजवी आहे. संगीत वगैरे जनमनआल्हादनाचीं जीं साधनें त्यांचा आजपर्यंत असभ्यतेशीं नित्यसंबंध जडल्यासारखें दिसत होतें, तीं पुनः शुद्ध होऊन सभ्य समाजाला लाभतील असें दिसत आहे.

असल्या प्रकारच्या सदानंद देणाऱ्या साधनाचा फैलाव जितका जास्ती होईल तितका चांगला, म्हणून या पुस्तकाच्या वरचेवर नव्या आवृत्ती काढाव्या लागत आहेत, ही अभिनंदनीय गोष्ट आहे. मागील आवृत्तीस लोकांचा आश्रय चांगला मिळाला तसाच याही आवृत्तीस मिळेल अशी उमेद आहे

पुस्तकप्रकाशक.

# संगीत सौभद्र नाटक.

## अंक १ ला.

### नान्दी.

सूत्रधार—

[ राग भूप—ताल त्रिवाल. ]

नमुनि ईशचरणा ॥ करिन मग गजाननाच्या पादस्मरणा ॥ नमु० ॥ ध्रु० ॥

सुकविरत्नमाला ॥ अतिशोभा दे यदीय सुंदर वृक्षाला ॥ जिच्यामध्यें महामणी प्रकाश पाडित सुवर्णपदकीं बसोनियां कालिदास राणा ॥नमु०॥

[ नमामि महिषासुरमर्दिनी, या चालीवर. ]

तुह्मां तो शंकर सुखकर हो ॥ हिमधरास्थित विकट[1] काननिं तप करी प्रियकरी शुभकरी सुंदरी तिजवरी भुलत निज कैलासनगिं तो ॥ शंकर सुखकर हो ॥ ध्रु० ॥ पद्मजा[2] सुरारि[3]सहीं अवमानुनी इंद्रा चंद्रा सकलां सोडुनी पर्णिनीं[4] कुंदरदनि[5] सुकुंतलावेणी[6] जाहली शिवव-

---

१ भयंकर. २ ब्रह्मदेवास ३ विष्णु ४ विवाहाकरितां. ५ कुंदाप्रमाणें शुभ्र आहेत दंत जिचे. ६ कुरळ्या केसांनीं युक्त.

रानुसारिणी पर्वताग्रशिरोमणी अर्पि कन्या सद्-
गुणी हर्षनिर्भर करग्रहणीं झाला महादेवास तो॥
शंकर सुखकर हो ॥ तुह्मां० ॥ १ ॥

प्रेमपुरस्सर ईश्वराचें स्तवन इतकें झालें तरी पुरे आहे. आतां घरीं जाऊन भार्येचें अनुमोदन घेऊन नंतर नाटकास आरंभ करावा ( इकडे तिकडे फिरून पाहून ) अरे, माझी प्रियसखी इथें कुठें दिसत नाहीं ! ( पुन: पाहिलेसें करून ) ही पहा माझी प्रिया, मी इथें समोर उभा असतां मजकडे पहात देखील नाहीं, आपल्याच नादांत कांहीं गुणगुणत आहे ! तर ही काय म्हणत आहे तें ऐकू.

[ नटी प्रवेश करिते. ]

नटी—

[ जलभरन जात जमुनाके घाटपर, या चालीवर. ]

झाली ज्याची उपवर दुहिता ॥ चैन नसे त्या तापवि चिंता ॥ झाली० ॥ ध्रु० ॥ केंवि मिळे पति कुलीन सुंदर ॥ लोकप्रिय धनवान जो ज्ञाता ॥ झाली० ॥ ॥ १ ॥ सासु श्वशुर दिर जावा नणदा ॥ छळितिल किंवा करितिल ममता ॥ झाली० ॥ २ ॥

बरें, हें सर्व हवें तसें मिळून लग्न झालें म्हणजे तरी चिंता मपली असें होतें का ? नाहींच—

सासरिं मग ती कशि वागेल ही काळजि निशि-दिनिं पोळवि चित्ता ॥ झाली० ॥ ३ ॥

सूत्र०— ( जवळ जाऊन ) प्रिये, कन्येच्या लग्नाविषयीं इतकी अधीर कशाला होतेस ! पहा—

साकी.

कन्येपूर्वी तिच्या पतीतें विधि निपजवितो भार्ये ॥
ईशाज्ञेविण कांहिं न होती सृष्टींतिल तीं कार्यें ॥
ह्मणुनी स्वस्थ रहा ॥ विधिघटनेची वाट पहा ॥ १ ॥

नटी—पुरे बाई, नेहमीं असा वेदांत सांगायचा; अशानें काय होणार आहे! मुलगी वाढत चालली तिच्याकरितां एखादें चांगलेंसें स्थळ आपण नाहींना पहात!

सूत्र०—काय वेडी आहे पहा! अग आह्माला कांहींच का काळजी नाहीं असें समजतेस तू? ऐक तर—

दिंडी.

तुझी चिंता ती दूर करायातें ॥
करुनि आलों सखि लग्ननिश्चयातें ॥
विभव-सद्गुण-कुल-रूपयुक्त ऐसा ॥
असे जामाता रतिस मदन जैसा ॥ १ ॥

नटी—(आनंदानें आलिंगून) बरें झालें बाई एकदाचें. पण प्राणनाथ, आतां एकच गोष्ट विचारायची आहे तेवढी सांगा ह्मणजे झालें.

कामदा.

जन्म घेति ते कोणच्या कुलीं ॥
वसति नित्य ते कोणत्या स्थलीं ॥
जनक जननि हीं असति कीं तयां ॥
द्रव्य किति दिलें दिवस किति वेया ॥ १ ॥

सूत्र०—वा! हा एकच प्रश्न वाटतें! प्रिये, तुला फार

सांगायला नको आहे, कारण मी जें स्थळ ठरविलें आहे तें तुझ्या माहितींतलेंच आहे.

नटी—तें कोणतें?

सूत्र०—अग, या द्वारकेंतच राहणारा माझ्या भगिनीचा पुत्र जो चंद्रकांत तोच वर ठरविला आहे, समजलीस?

नटी—(आनंदानें) तर मग दुधांत साखर पडल्यासारखेंच झालें.

सूत्र०—प्रिये, आमच्या कन्येच्या विवाहाच्या गोष्टीच का या सभासदांनीं ऐकायच्या? हे माझें नाटक पहाण्याकरितां आले आहेत.

नटी—महाराज, आज नाटक कोणतें करणार आपण?

सूत्र०—ऐक—

साकी.

कालिदासमुखकविकृतिपक्वान्नातें सेवुनि विटले ॥
रसिक तयांना पुनर्बुभुक्षाकरणीं तिखटचि केलें ॥
बळवत् कविवर्यें ॥ आपुल्या परिमित चातुर्यें ॥ १ ॥

तर अशा उद्देशानें त्या कवीनें रचलेलें जें संगीत सौभद्र नामक नाटक तें मी आज करून दाखविणार आहें. तर तत्संबंधीं सिद्धता कर.

नटी—ही मी तयार आहें, काय ती आज्ञा व्हावी.

सूत्र०—प्रिये, या वसंतऋतूंतील समयाचें वर्णन ज्यामध्यें यथार्थ असेल असें कांहीं गायन कर, नंतर नाटकास आरंभ करूं.

नटी– ठीक आहे—

[ दिल छीनलिये, या चालीवर. ]

वैशाखमासि वासंतिक समय शोभला ॥ आम्रा-
मव पिउनि गान करिति कोकिला ॥ ध्रु० ॥ या
जाइजुई मोगरिला बहर तो आला ॥ गुंजारव
करण्यांत गुंग मधुप जाहला ॥ नव पल्लव ते
फुटति सकल वृक्षगणांला ॥ कुसुमगंधयुक्तमंद
वात सुटला ॥ वै० ॥ १ ॥ अतिथंडगार चंद-
नाचि उटी लावुनी ॥ वर जातिपुष्प-धवल हार
कंठिं घालुनी ॥ रमतात युवति चांदण्यांत पतिस
घेउनी ॥ लोकां शीतोपचार इष्ट वाटला ॥ वै० ॥ २ ॥
नगरांत लग्नमंडपांचि दाटि जाहली ॥ नरनारि
नटुनि वीथिंत मिरवीत चालली ॥ बहु वाद्य-
गजर दुमदुमुनी गर्दि उसळली ॥ दक्षिणार्थ
भिक्षुकगण पळत सुटला ॥ वै० ॥ ३ ॥

सूत्र०– शाबास प्रिये शाबास ! तू ज्याप्रमाणें समयाचें वर्णन केलेंस त्याचप्रमाणें तूर्त आमच्या या द्वारका नगरींत चाललें असून राजवाड्यांत तर मोठ्याच समारंभाची तयारी चालली आहे कारण–

साकी.

झाली उपवर श्रीकृष्णाची भगिनि सुभद्रा तिजला ॥
दुर्योधन-भूपासि हलधरें द्याया निश्चय केला ॥

(पद्यात "हा मूर्खा भरतकुलाधमा" धनंजयवीरास

द्यायची असें ह्मणायचें सोडून त्या अधपुत्राचें नांव घेण्यास तुला शंका कशीरे नाहीं आली ? " )

सूत्र०– प्रिये, तीर्थयात्रा करीत करीत या द्वारकेस-न्निध येऊन पोहोंचला असा जो धनंजय, त्याला माझ्या भाषणापासून कोप आलासें दिसतें, तर चल आपण इथून निघून जाऊं.

( असें ह्मणून दोघेंही जातात. )

( ही प्रस्तावना झाली. )

[ तदनंतर प्रवासवेश धारण केलेला असा अर्जुन प्रवेश करितो. ]

अर्जुन– [ " हा मूर्खा " इत्यादि पूर्वोक्त ह्मणून ]—

[ राग झिंझोटी-ताल दादरा. ]

नाहिं झाले षण्मास मला राज्य सोडुनी ॥ तोंचि विपरित हें काय ऐकण्यांत ये जनीं ॥ नाहिं० ॥ ॥ ध्रु० ॥ काय साझा तो भाग अंधपुत्र सेवितो ॥ काय देवकिचा तनय कृष्ण वचन मोडितो ॥ काय हलधर नवरत्न मर्कटासि अर्पितो ॥ नवल हेंचि मन्मनीं ॥ नाहिं० ॥ १ ॥

अहाहा ! प्रिये सुभद्रे, तुझीही रीति अशीच झालीना.

[ राग लिलांबरी- ताल धुमाळी. ]

गंगानदि ती सागर सोडुनी कूपा मिळण्या धांवे ॥ किंवा राका चंद्रकलेनें राहुमुखांत पडावें ॥ अथवा चांडालाच्या सदनीं श्रुतिनें[1] काय रिझावें ॥ किंवा

---

१ वेदांनीं.

कोमल हरिणीनें त्या वृकगेहांत शिरावें ॥ कामधेनुनें आनंदानें खाटिकहस्तिं पडावें ॥ तरी सुभद्रे तूं मज सोडुनी अंधसुतासि वरावें ॥ १ ॥

अथवा त्या अबलेवर मी काय हा दोषारोप करतों ? ती पराधीन असल्यामुळेंच असा प्रकार चालला असावा यांत संशय नाहीं. कारण—

[ कर्पुरधवलांगा, या कर्नाटकी चालीवर. ]

होतों द्वारकाभुवनीं ॥ पाहिली प्रिया नयनीं ॥ पूर्ण होती मला वशिनी ॥ कसा शठ ती वरिल कामिनी॥ होतों० ॥ ध्रु० ॥ ती तरुणी मजला निरखुनि वर श- शिकर-विकसित कुमुदिनिपरि हरिखुंनि किंचित मुरडुनि मधुर स्मित करि करिगमनी ॥ होतों० ॥ १॥

तर मग त्या सुंदरीनें धृतराष्ट्रपुत्रासच वरावें अशाविषयीं कृष्णाचाही आग्रह झाला असावा काय? ( विचार करून ) छे छे ! अशी गोष्ट कांहीं संभवत नाहीं कारण—

[ राग बिलावल–ताल त्रिवट. ]

प्रतिकूल होइल कैसा कृष्णदेव मातें ॥ जाहले प्रा णाहूनी प्रिय भक्त ज्यातें ॥ प्रति०॥ ध्रु० ॥ आमुच्या उत्कर्षानें हर्ष जया होतो ॥ दुःखितां पाहुनि आह्मां खेद ज्यास होतो ॥ पडूं नये संकटिं आह्मीं ह्मणुनि कष्ट घेतो ॥ आमुच्या चिंतनें ती झोंप नये त्यातें ॥प्रति०॥१

अशा प्रकारचें असाधारण प्रेम आह्मां पांडवांवर असून

---

१ कसल. २ हर्ष पावून.

माझ्याविषयीं तर भिन्नभाव त्याला मुळींच नाहीं. पहा—

[ राग व ताल सदर. ]

सारखें शौर्य माझें लोकिं गाजवीलें ॥
मम भुजबल बहु करुनी सुर लाजविले ॥
समयविशेषीं माझे अश्व खाजवीले ॥
मम यशापुढतीं आपुलें यश करी कोतें ॥प्र०॥२॥

देवा! याप्रमाणें सर्व गोष्टी अनुकूल असतां, एवढ्याचविषयीं प्रारब्धाची गति कशी वक्र झाली कळत नाहीं मला असें वाटतें, कीं हा सर्व घोटाळा त्या हलधरानेंच केला असावा, यांत संशय नाहीं. अरे हे रेवतीरमणा बलरामा!

[ ताल व राग सदर. ]

कोणता वद रे तूझा अपराध केला ॥
ह्मणुनिया ऐसा करिशी चंड दंड याला ॥
काय तें गेलें सारें नातें लयाला ॥
तव मत[1] भगिनीबंधूहुनी भिन्न कां तें ॥ प्र० ॥३॥

अरे सारें खरें, पण मी त्या यःकश्चित् भरतपुत्राच्या भाषणावर विश्वास ठेवून फसलों तर नाहीं! सुभद्रा मला सोडून त्या दुर्योधनाला कालत्रयीं देणार नाहींत. बहुधा त्या वंचकानें मला खिजविण्याकरिताच हें भाषण केलें असावें असो; तर त्याविषयीं आतां विशेष वाग्घाट नको आहे आपण आपले थोडे राहिलेले दिवस उरलेलीं तीर्थें पाहण्यांत घालवून लवकर धर्मदर्शनाला जावें हें बरें.

---

१ ह्मणणें.

## अंक १ ला.

[ इकडे तिकडे फिरतो. पडद्यांत वीणाशब्द होतो, ] अहो, हा अक्षय्य हरिभजनयुक्त मंजुळ विण्याचा शब्द ऐकू येत आहे, यावरून खचित नारदऋषींचें स्वारी येत असावी बरेंच झालें अशा प्रसंगीं त्या सत्पुरुषाचें दर्शन होत आहे यावरून माझ्या इच्छित कार्यसिद्धीस हा शुभशकुनच समजावयाचा. ( वाट पहात उभा राहतो. )

[ नंतर नृत्यगायनयुक्त नारद प्रवेश करितो. ]

नारद—

[ विठाई माउली, या चालीवर. ]

राधाधरमधुमिलिंदं[१] । जयजय रमारमण हरि गोविंद ॥ ध्रु० ॥ कालिंदी-तट-पुलिंदं[२]-लांछित सुरनुत[३]पादार-विंद ॥ जय० ॥ १ ॥ उद्धृतनग मध्वरिंदमानघं[४] सत्यपांडपटकुविंदं[५] ॥ जय० ॥ २ ॥ गोपसदनगुर्व-लिंद[६]खेलन बलवत्स्तुतितें न निंद ॥ जय० ॥ ३ ॥

अहो, सच्चिदानंद परमेश्वराच्या स्वरूपावांचून दुसरें कांहीं भासत नाहीं व दिसत नाहीं, असा खरा प्रकार असून हे मूढ जीव अमुकच स्थलविशेषीं ईश्वरसान्निध्य आहे अशी कल्पना करून व्यर्थ श्रम मात्र घेतात. पहा—

[ राग कानडा—ताल त्रिवट. ]

निजरूपीं जगदाकृतिभासा कारण होउनि करित विलासा ॥ ध्रु० ॥ वस्तुस किरणें छाया ये परी ॥

---

१ भ्रमर २ वाळू ३ देवांनीं स्तविलेले ४ मधुरिपुचा नाश करणारा व पापरहित. ५ वस्त्र विणणारा ६ गच्चा.

दोहिंस कारण तो रवि जैसा ॥ निज० ॥ १ ॥ भि-त्राकृति जरि कुंडलवलयीं ॥ कनकगुणाचि दिसतो भरलासा ॥ निज० ॥ २ ॥ निखिल निरंजन निस्तुळ तो प्रभु ॥ व्यापक झाला व्याप्यांहि तैसा ॥ नि० ॥ ३ ॥

(इकडे तिकडे फिरतो)

अर्जुन–(पुढें होऊन) मुनिवर्य, आपणास हा मध्यम पांडव पार्थ अभिवादन करतो आहे

नारद–वत्सा धनंजया, तुझें इच्छित पूर्ण होवो अरे पण तूं एकटा इकडे कुणीकडे ?

अर्जुन–महाराज, आपल्या अनुशासनाप्रमाणें एक संवत्सरपर्यंत तीर्थयात्रा करण्याचा संकल्प करून उत्तर, पूर्व व दक्षिण या दिशांकडील तीर्थें संपवून, पश्चिमेकडील क्षेत्रें पहात पहात इकडे आलों आहें.

नारद–काय, माझें अनुशासन ? (विचार करून) हां समजलों—

[ शाम मूसे खेलन होरी, या चालीवर. ]

होइल कलह ह्मणोनी ॥ दिधला यांतें नेम करोनी ॥ हो० ॥ ध्रु० ॥ पांचाहि बंधू एक वधूसी ॥ उपभोगिति २ करुनि अवधीसी ॥ यास्तव दिलि वांटोनी ॥ कीं मासद्वय वारा रजनी ॥ हो० ॥ १ ॥

या नियमानुसार ज्याचा काल असेल, त्या पतिसमवेत

१ कडें. २ शुद्ध. ३ अपार.

द्रौपदी एकांतांत असतांना जर दुसऱ्यानें पाहिली तर त्याला मी हें शासन ठरवून दिलें आहे कीं—

[ ताल व चाल सदर. ]

**बारा महिने गृह वर्जावें ॥ यानावांचुनि नित्य फिरावें ॥ सर्व सुतीर्थें करोनि ॥ तो समजावा शुद्ध फिरोनी ॥ हो० ॥ १ ॥**

असो, बरें पण पार्था, तूं या दंडास कसा पात्र झालास?

**अर्जुन**—ऐकावें महाराज आम्ही इंद्रप्रस्थ नगरींत असतांना एके दिवशीं मी सर्व राज्यकारभार आटपून विश्रांति घेण्याकरितां शयनमंदिराकडे निघालों होतों; मध्यान्ह रात्रीचा सुमार झाला होता, इतक्यांत—

साकी.

**चोरांनीं निजधेनु चोरिल्या धांवा धांवा ऐसे ।
शब्द करित ते ब्राह्मण आले माझ्या द्वारासरिसे ॥
आश्वासुनि त्यांना ॥ झालों तयार रिपुदमना ॥ १ ॥**

**नारद**—बरें मग?

**अर्जुन**—नंतर शस्त्रास्त्रें घेण्याकरितां शस्त्रागारामध्यें गेलों तों तेथेंच धर्मराज द्रौपदीसमवेत एकांतांत असलेले पाहिले. चोरांना दंड करून ब्राह्मणांच्या गाई ब्राह्मणांना दिल्याच, परंतु तो एकांत पाहिल्याबद्दल आपल्या आज्ञेप्रमाणें एक संवत्सरपर्यंत तीर्थयात्रा करणें भाग पडलें.

**नारद**—तुम्ही माझें अनुशासन इतकें जपून पाळतां हें पाहून मला फार संतोष झाला.

अर्जुन–बरें पण मुनिवर्य, आपली स्वारी इतक्या गडबडीनें कुणीकडे निघाली आहे ?

नारद–अर्जुना, तूं प्रवासांत असल्यामुळें तुझ्या मातुलगृहीं काय चाललें आहे हें तुला माहीत नाहींसें दिसतें. ऐक तर.—

[ राग बिहाग–ताल दादरा. ]

लग्नाला जातों मी द्वारकापुरा ॥ देतो निज भगिनि राम कौरवेश्वरा ॥ ध्रु० ॥ उत्सव बहु थोर होत ॥ मिळतिल भूपाल अमित ॥ सुर नर मुनि सर्व येत ॥ नट नर्तक सकल जमत ॥ न मिळे अशि मौज पुन्हा पाहण्या नरा ॥ १ ॥

अर्जुन–( खिन्न होऊन व श्वास सोडून ) एकूण एकदां कानावर आलेली दुःखकारक वार्ता कधींही खोटी व्हावयाची नाहीं, हा अनुभव मनुष्यास वारंवार येत असून पुनः दुसऱ्या वेळीं आशाबद्ध होत्साता प्राणी फसतोच.

नारद–पण पार्था, द्वारकेंतला समारंभ ऐकून तुला आनंद व्हावयाचा, असें असून ही गोष्ट ऐकतांच तूं उद्विग्नसा कां दिसलोस ?

अर्जुन–काय सांगू भगवन् !

[ उद्धवा शांतवन कर जा, या चालीवर. ]

मी कुमार तीहि कुमारी असतांना जागीं एका ॥ वाढलों खेळलों प्रेमप्रिय झालों एकामेकां ॥ वरिल ती सुभद्रा मजला हा निश्चय सर्वां लोकां ॥

घाल ॥ तेशांत रामकृष्णांनीं ॥ वडिलांचें मत घेवो- नीं ॥ मज दिधली ऐसें ह्मणुनी ॥ शेवट मग केला हा कीं ॥ चाल ॥ जो प्रीतितरू वाढविला ॥ त्यां- नींच कसा तोडविला ॥ १ ॥

नारद— काय धनंजया, सुभद्रा तुला द्यायची असें ठरलें असून सांप्रत दुर्योधनाला देण्याचा निश्चय केला? तर मग खरोखर त्या कृष्णाकडून ही गोष्ट फार अनुचित घडली

अर्जुन— मुनिवर्य, दुर्योधनाशीं संबंध कृष्णालाही आ- वडला काय?

नारद—अरे, तूं अगदीं भोळा आहेस त्याचें कपट तुला कसें कळणार! तेव्हा मी सांगतों हें पक्कें समज.

[ गड्यांनो कृष्ण गडी अपुला, या चालीवर ]

पार्था तुज देउनि वचनें ॥ फसविलें पहा मुकुंदानें ॥ ध्रु० ॥ सार्वभौम दुर्योधननृपति ॥ लक्ष्मी त्याची आणुनि चित्तीं ॥ त्यजिलें तुज अवमानें ॥ १ ॥

अर्जुन— खरोखर आपण म्हणता तसेंच माझ्या अनुभ- वास आलें सारांश, मीं माणसांतून उठावें असेंच त्या कृष्णाच्या मनांत आहे, यांत संशय नाहीं

नारद— वा:! काय हें भाषण!! हे दीनपणाचे उद्गार तुला शोभत नाहींत अरे—

[ नारद बोले गंगाबाई, या चालीवर ]

वीरशिरोमणि सकळ धनुर्धरनायक तूं नरवरा ॥ मग

कां वदसी दीना गिरां ॥ ध्रु० ॥ महावात सुटला ह्मणुनि कां कंप येत भूधरा ॥ महागर मूर्च्छवि कां शंकरा ॥चाल॥ मिळतील तुला त्या स्त्रिया वहुत सुंदरा ॥यद्रूप बघुनि लाजतील रति इंदिरा ॥ मग ह्मणशिल हृष्टिस नको सुभद्रा जरा ॥ चाल ॥ काय उणें तुज आणिशि चित्तीं तरि मिळविसि अप्सरा ॥मग०॥१॥

अर्जुन—मुनिराज, मी जो इतका खिन्न झालों आहें, त्याला दोन कारणें आहेत. एक तर फार दिवसापासून आह्मां उभयतांत प्रेम वाढून ऐन फलप्राप्तीच्या वेळीं एक-मेकांस अंतरलों दुसरें, माझा भाग माझें हितचिंतन कर-णाऱ्यांनीं माझा हाडवैरी जो दुर्योधन त्यास अर्पण केल्यानें जगांत मला तोंड दाखविण्यास जागा उरली नाहीं.

नारद—खरोखर हें माझ्या लक्षांत आलें नव्हतें. आतां या सर्व गोष्टींचा विचार केला असतां तुझी स्थिति फार शोकास्पद आहे, यांत संशय नाहीं.

अर्जुन—शोकास्पद म्हणून काय सांगू महाराज—

[ गजानना दे दर्शन, या चालीवर. ]

ज्यावरि मीं विश्वास ठेविला ॥ समजे प्राणप्रिय जो मजला ॥ भजलों देवापरि मी ज्याला ॥ तो ऐसा फिरला ॥ ध्रु० ॥ योग्य मि नव्हतों तद्भगि-नीला ॥ यावी होती अन्य नृपाला ॥ कैसा मम वैरी सन्मानीला ॥ हें दुःखद मजला ॥ ज्या० ॥ १ ॥

नारद—अर्जुना, आतां याविषयीं फार विचार करू

१ वाणी. २ कालकूट विष.

नकोस. जसजसा कोळसा उगाळशील तसतसें काळेंच निघेल. याकरिता आपली तीर्थयात्रा लवकर आटपून बंधुदर्शनाला जावेंस. कांहीं काळ गेला ह्मणजे तुला इतकें वाईट वाटणार नाहीं.

अर्जुन– छे छे! आतां कशाची तीर्थयात्रा आणि कशाचें धर्मदर्शन! मला कांहीं नको, हे प्राण देखील कसे जड झाले आहेत. यास्तव कृपा करून आपण माझें एक काम केलें पाहिजे.

नारद– काय तें सांग. मजकडून होण्यासारखें असेल तर मी करीन.

अर्जुन– तर मग महाराज, माझे प्रिय भ्राते जे धर्म, भीम, नकुल आणि सहदेव यांना हा सर्व वृत्तांत सांगून माझा शेवटचा निरोप असा कळवावा कीं–

[ राग व ताल सदर. ]

**नेमियलें मज शत्रुजयाला ॥ परि तें गेलें सर्व लया-ला ॥ आहे भीमाचि कीं त्या कर्माला ॥ बलसागर पहिला ॥ ज्या० ॥ २ ॥ होतें जगिं भूषण जें याला ॥ तें जाउनि निंदास्पद ठरला ॥ तुमच्या सेवेला हा अंतरला ॥ परलोकीं गेला ॥ ज्या० ॥ ३ ॥**

नारद– अरे, पण अशी निरवानिरव करून काय कर-ण्याचें योजिलें आहेस.

अर्जुन– महाराज, मी कोणत्याही साधनानें प्राणत्याग करणार! हें लज्जेनें काळें झालेलें मुख जगांत दाखवि-ण्याला मी अगदीं असमर्थ आहें.

नारद– काय आत्महत्या ! ! आणि ती तुझ्यासारख्या क्षत्रियाकडून ? महत्पाप ! महत्पाप ! ! महत्पाप ! ! !

अर्जुन– आतां पापपुण्याची भीति मी कशाला बाळगूं महाराज !

नारद– अरे, ह्मणून काय झालें ! ज्या योगानें इहपर-लोकीं सौख्य होईल तेच केलें पाहिजे.

अर्जुन– तर मग सन्यास घेऊन कदमूल सेवन करून कोठेंही अरण्यांत पडून राहीन, पण या लोकांचा मला संबंध नको.

नारद– ही युक्ति बरी आहे; पण त्यांतही एक खुबी आहे, माझ्यावर तुझा विश्वास असेल तर सांगतों

अर्जुन– आपणावर विश्वास न ठेवणारा प्राणी या जगांत तरी आढळेल काय ? सांगा महाराज, मी उपदे-शास पात्र आहें.

नारद– हें पहा, तू जो सन्यास घेणार तो त्रिदंडी घे; ह्मणजे प्रारब्धयोगानें तुझें इच्छित कार्य सिद्ध होण्याचा समय आलाच, तर तुला पुनः गृहस्थाश्रमी होतां येईल

[ पडद्यांत शब्द होतो. ]

" अहो, अहो, सैनिकहो ! या रैवतकगिरिप्रदेशांतील अरण्यासभोंवती चांगला सावधगिरीनें पहारा करावा, अशी तुह्मांस सेनापति सात्यकीमहाराजाची आज्ञा आहे कारण, देवी सुभद्रा यांचा आजच विवाह व्हावयाचा असून त्या एकाएकीं अंतर्गृहांतून नाहींशा झाल्या, त्यांचा शोध करण्याकरितां निरनिराळ्या प्रदेशीं निरनिराळ्या

सैन्याचे भाग करून पाठविले आहेत व त्यांना या अरण्यांत शोधण्याचें काम तुम्हांकडे नेमिलें आहे तर सर्वांनीं सावधगिरीनें असावें "

अर्जुन—( आनंदानें आपल्याशीं ) काय ! सुभद्रेचा विवाह आजच व्हावयाचा असून ती एकाएकीं अंतर्गृहांतून नाहींशी झाली व तिचा शोध या अरण्यांत चालला आहे ! ! ( नारदास ) तर मग नारदस्वामि, माझा आशावृक्ष दग्ध झाला असतां या सुवार्तारूप जलवृष्टीनें त्याला पुन. अंकुर फुटतील असें वाटतें वास्तव त्या सुंदरीचा मी या अरण्यांत शोध करतों, म्हणजे प्रारब्धयोगानें कदाचित् या नेत्राचें साफल्य तरी होईल

नारद—ठीक आहे परंतु प्रसंग पडल्यास माझ्या उपदेशाचें स्मरण ठेव हो

अर्जुन—छे, छे, तो मी कदापि विसरणार नाहीं.

नारद—मीही आतां तिकडेच जाऊन कसा काय प्रकार घडला आहे, पहातों

अर्जुन—आपल्या चरणकमळीं प्रणिपात करतों

नारद—तुझा विजय असो ( असें म्हणून नृत्यगायनयुक्त भजन करतो )

[ गण्याच्या चालीवर ]

पावना वामना या मना ॥ दे[1] तव भजनिं निरंतर वासना ॥ ध्रु० ॥ श्रीवत्सांकित कौस्तुभधारिन् ॥ योगिजनांतररंजना ॥१॥ भो प्रल्हादपरा[2] हरि-

१ मन. २ नृसिंह, प्रल्हादाविषयीं तत्पर किंवा वत्सल

रूपा ॥ मत्तनिशाचरकंदना ॥ २ ॥ नवतुलसी-
दलमालाभूषा ॥ बलवद्भवभयभंजना ॥ ३ ॥

[ नारद निघून जातो. ]

अर्जुन–( इकडे तिकडे फिरून पडद्याकडे पाहून ) अरे, हा काय चमत्कार ! हा कोणी एक निशाचर, विद्युल्लतेप्रमाणें जिचे अवयव मधून मधून चमकताहेत अशा स्त्रीला उचलून घेऊन इकडे येत असल्यानें भूमिगत महामेघाप्रमाणेंच दिसतो आहे ! मला वाटतें, सुभद्रेचें महालातून एकाएकीं नाहींसें होणें आणि या राक्षसाचें एका उत्तम स्त्रीसह येथें येणें, यांमध्यें कांहीं तरी संबंध असावा. असो; यांतला तथ्यांश समजून घेतल्यावांचून आपण येथून जाऊंच नये ( एकीकडे पहात उभा राहतो )

[ तदनंतर वर्णन केल्याप्रमाणें निश्चेष्टित झालेल्या सुभद्रेस उचलून घेऊन एक राक्षस प्रवेश करतो ]

राक्षस–( मोठ्यानें खदखदां हंसून ) जिचें हरण करावें म्हणून मी आजपर्यंत टपून बसलों होतों व ज्या कामांत अनेक प्रकारचीं विघ्नें येत गेल्यामुळें मला फार श्रम भोगावे लागले, ती आज माझ्या हस्तगत झाल्यानें मी कसा कृतकृत्य होऊन गेलों आतां माझ्या सौख्यास पारावार नाहीं ( सुभद्रेकडे पाहून ) अरे, ही माझ्या मोहिनीमन्त्रानें अगदीं निश्चेष्टित झाली आहे, तर हिला या पल्लवराशीवर ठेवून आपला मन्त्र काढून घ्यावा, म्हणजे ही सावध होईल. ( पल्लवराशीवर ठेवतो ) आतां हिला मजपासून सो-

---

१ अलंकार.

डविणारा कोण आहे? या सर्व सौख्याचा उपभोग घेणारा दैववान् पुतळा मीच आहें, यांत संशय नाहीं.

अर्जुन—खचित, या दुष्टानें या स्त्रीला हरण करून आणली आहे पण ही स्त्री कोण असावी बरें? माझी प्रिया सुभद्रा तर नव्हे? ( नीट पाहून ) होय तीच!! जरी मला तिचें मुख अद्यापि दिसलें नाहीं, तरी हें पहा—

[ राग कानडा–ताल त्रिवट. ]

**सुवर्णकेतकिपरि जो दिसतो वर्ण नव्हे तो दुसरीचा॥ सडपातळ नाजुक हा बांधा खचित त्याच मृदु देहा-चा॥ पदतल बघतां भास होतसे नूतन संध्यारागाचा॥ कांचिमुळें ओळखतां येतो अमुक देश ह्मणुनी कटि-चा॥ निर्मुनि जीला कळसचि झाला धात्याच्या चातुर्याचा॥ तेंचि असावें रत्न असा ग्रह झाला इस पाहुनि मतिचा॥ १॥**

अरे, पण भिन्या मनुष्याला काळोखात जसा मनोमय पिशाचाचा आकार दिसूं लागतो, तद्वत् माझें मन सुभ-द्रामय झालें असल्यानें पाहिजे ती स्त्री सुभद्रेप्रमाणेंच दिसा-वयाची, तसें तर नसेलना हें! अथवा याविषयीं इतका विचार कशाला! ही पहा ती स्त्री सावध होत चालली आहे. आतां सरें काय तें कळून येईल

राक्षस—ओः हो! मद्यप्राशनाची धुंदी उतरल्यानंतर मनुष्य जसा सावध होऊं लागतो तद्वत् या स्त्रीनें विशाळ

---

१ कंबरपट्टा. २ जागा.

आणि काळें असें आपलें डोळे उघडण्यास आरंभ केला आहे तर आतां ही सावध होतांच हिला एकदम जाऊन आलिंगन देतों.

( सुभद्रा सावध होते राक्षस तिच्या अंगावर जातो, तोंच गडबडीनें अर्जुन त्यास एकीकडे लोटतो. उभयतांची झोंबा-झोंबी सुरू होऊन दोघेही पडद्यांत निघून जातात. )

सुभद्रा--( उठून बसून ) काय ! मला थोडीशी झोंप लागताच मला एकटी महालांत सोडून सर्व दासी निघून गेल्या ? (खालीं पाहून) अग बाई हें काय ! (दचकून उठून) मी माझ्या महालांत ना निजलें होतें ? आणि या पल्लवशय्येवर कशी आलें ? ( विचार करून ) हां समजलें या अंतःकरणांतल्या विरहव्यथेवर होणाऱ्या भयंकर परिणामाच्या डागण्या बसू लागल्यानें सर्वांगाची लाही होऊं लागली, त्यावेळीं मींच दासींना ह्मटलें कीं मला बागेंत घेऊन जाऊन शीतल अशा पल्लवशय्येवर तरी निजवा, आणि वाटतें, माझा तितक्यांत डोळा लागला तेव्हां त्यांनीं मी निजलेली असतां तसेंच उचलून इथें आणून मला निजविलें, पण कुणीं तरी मेलीनें जवळ असावें कीं नाहीं !

( पडद्यांत अर्जुन--हा दुष्टा साध्वीछलोत्पादका ! ! ज्या हस्तांनीं त्या सुंदरीस तूं स्पर्श केलास, ज्या मुखानें तिजवर मोहिनीमंत्राचा प्रयोग केलास व ज्या शरीरानें तिला उचलून या अरण्यांत आणलेंस, त्या सर्वांचा एक गोळा करून ह्या कड्याखालीं लोटून देतों, ह्मणजे व्याघ्रादिक खाऊन संतुष्ट होतील. )

सुभद्रा-( ऐकून ) दुरून कुणी कांहीं बोलत आहे असें ऐकलें की मला लग्नमंडपांतच घेऊन जायला येताहेत असें वाटतें. देवा ! या संकटांतून मी कशी पार पडेन हें कळत नाहीं.

[तदनंतर राक्षसाच्या रक्तानें भरलेला असा अर्जुन प्रवेश करतो ]

अर्जुन-(आपल्याशीं) अरे हा काय चमत्कार! मी त्या राक्षसाला खालीं पाडून त्याच्या उरावर बसून त्याचा शिरच्छेद करणार तोंच तो मायावी एकदम अदृश्य झाला, ही गोष्ट फार वाईट झाली खरें, त्याच्या शोधाच्या नादीं लागावें तर ही स्त्री या अरण्यांत एकटीच आहे, तिजवर नवीन संकट काय येईल याचा नेम नाहीं. ( सुभद्रेकडे पाहून ) अहाहा ! माझ्या नेत्राचें सार्थक्य झालें. हाच ती माझी प्रिया सुभद्रा.

[ चाल कर्नाटकी. ]

**मम जिवाची प्रियकरिणी ॥ वास करित हृदयीं जी होती ॥ दृष्टिपुढें भासत ती तरुणी ॥ध्रु०॥ राक्षस तो मज मित्रचि वाटे । केलि जयानें हितकर करणी॥१॥**

( आपल्याशीं ) आतां कसें बरें करावें ? आपण कांहीं हिला ओळख देऊं नये, त्यांतून माझें अंग राक्षसाच्या जखमाच्या रक्तानें सर्व भरून गेल्यानें तीही मला ओळखणार नाहीं, बरें, अगोदर ही आपल्याशीं काय भाषण करते तें ऐकू, म्हणजे त्याप्रमाणें बतावणी करण्यास बरें पडेल.

( एकीकडे ऐकत उभा राहतो. )

सुभद्रा—दासींनीं मला इथें एकटेंच सोडलें हा मजवर उपकारच केला म्हणायचा. घटकाभर आपल्या जिवाशीं बोलायला तरी मिळेल नाहीं तर या जळ्ळ्या लग्नाचें जमल्यापासून मला एकांत असा मिळालाच नाहीं. कुणी-नाकुणी जवळ आहेच

अर्जुन—काय! ही आपण आपल्या बागेंतच आहे असें समजते? राक्षसवृत्तांत हिला ठाऊकच नाहीं, तर आपणही तिला तो कळवूं नये. कारण तिच्या त्या कोमल अंतःकरणास इजा होऊन भलताच परिणाम व्हावयाचा.

सुभद्रा—( खालीं बसते ) देवा! काय मजवर हा कहर चालविला आहेस?

[ पडतां वेणुरव कानीं, या चालीवर. ]

**प्रियकर माझे भ्राते मजवरी निष्ठुरता हृदयीं धरिती॥ कर्मगती अशी कैशी झाली आप्त सर्व वैरी होती॥ ॥ ध्रु० ॥ आशा बहु कृष्णावरती ॥ होती निष्फळ झाली ती ॥ मातातातांची गणती ॥ वृद्ध म्हणुनि कोणि न करिती ॥ सर्वही दादाच्या हातीं ॥ त्याला कोणी नच वदती ॥ अंधसुतातें वरण्याहुनि मज मृत्यु बरा वाटे चित्तीं ॥ प्रि० ॥ १ ॥**

[ सुस्कारा टाकते. ]

अर्जुन—शाबास! प्रिये शाबास! त्या दुर्योधनाला वरण्याविषयीं तिटकाऱ्याचे शब्द तुझ्या मुखांतून आलेले ऐकताच तू मला पूर्वीपेक्षाही विशेष रमणीय दिसूं लाग-लीस. परंतु सखे—

[ मामुरहु, या चालीवर. ]

प्रीतीस पात्र कोण तुझ्या सांग जाहला ॥ मानीन जगीं धन्य तोचि असे राहिला ॥ ध्रु०॥ पूर्वींच मला रामकृष्ण हेतु समजला ॥ जो पूर्वापर मित्रभाव त्यांनिं सोडिला ॥ संपत्तिमुळें अंधतनय त्यांसि आवडला ॥ नारि असुनि सत्यपणा तूंचि राखिला॥प्री०॥१

सुभद्रा—हाय हाय ! माझें दुःख पाहून कळवळणारा प्राणी जगांत कुणीच नाहींना ! अथवा कुठून असणार !—

अंजनीगीत.

राजा लुटि जरि प्रजाजनांला ॥ माता मारी निज बाळाला ॥ बंधु विकि जरी निज भगिनीला ॥ शरण कुणा जावें ॥ १ ॥

अर्जुन—( त्वेषानें आपल्याशीं ) खरोखर सुंदरी, तुझ्या बंधूनीं तुझ्या देहाचा विक्रयच माडला आहे ( दांत चावून ) अरेरे ! काय करूं ! ! या सर्व कृत्यांचा सूड मीं घेतला असता; परंतु धर्मराजाच्या आज्ञेवांचून यादवांचा वैरी होण्याला मी स्वतन्त्र नाहीं.

सुभद्रा—( गहिंवरून ) मेल्या फुटक्या नशिबा ! किती प्रकारांनी मला वेढलें आहेस ! ! मी आशा धरून जिवंत राहायला एक तरी मार्ग मोकळा ठेवला आहेस का ? बरें, ज्याच्या जिवावर मीं आप्त, इष्ट, भाऊ तुच्छ मानले त्यांचा तरी ठिकाण कोठें आहे !—

[ राग पिलु—ताल धुमाळी. ]

**बलसागर तुम्हि वीरशिरोमणी कोठें तरि रमलां ॥ आश्वासन जिस दिलें तिला कां विसरुनियां गेलां ॥ध्रु०॥ पेरियलें जें प्रीतितरूचें बीज हृदयिं त्याला ॥ अंकुर येउनि सुदृढ तयाचा वृक्ष असे झाला ॥ सुंदर तुम्ही मूर्तिमान तच्छायेला बसला ॥ चित्र असें हृदयांत कोंदतां ठाव न अन्याला ॥**

[ सचिंत बसते. ]

**अर्जुन**–( आपल्याशीं ) पण सुंदरी, हें तूं कोणाला उद्देशून बोलत आहेस ?

**सुभद्रा**–( मागील पदाचा शेवट करते. )

[ राग व ताल सदर. ]

**पांडुकुमारा पार्थ नरवरा राखा वचनाला ॥ निश्चय माझा न ढळे जरि हा कंठ कुणीं चिरला ॥ १ ॥**

**अर्जुन**– अहाहा ! सर्व संशय फिटून या भाषणानें मी आनंदपर्वताच्या शिखरावर जाऊन बसलों खरा, पण हिच्या या भयंकर स्थितींत मजकडून हिला तिळप्रायही साह्य होण्याजोगें नाहीं हें जाणून त्या पर्वतावरून ढासळून दुःखसमुद्रांत गटंगळ्या खातों आहें

**सुभद्रा**– ( वर पाहून ) अगबाई ! सूर्यास्त होऊन काळोख देखील पडूं लागला, तरी माझ्या दासींतून कुणीही इकडे येत नाहीं हें काय ? देवा ! माझ्या जन्माचा आज

शेवट ना होणार होता ! आणि जिकडेतिकडे सर्व सामसूम दिसत आहे, हें आहे तरी काय ?

**अर्जुन**–( आपल्याशी ) आतां कसें बरें करावें ? अजून हिला संशयांत ठेवणें उपयोगी नाहीं राक्षसवृत्तांत आणि मी कोण, हें गुप्त ठेवून बाकीचें तिला कळविलेंच पाहिजे.

**सुभद्रा**–( रागाऊन ) काय द्वाडगेपणा हा मेल्यांचा ! कुणीच नाहींना उत्तर देत ? ए सारंगनयने ! ए कुसुमावती !

**अर्जुन**–( पुढें होऊन सुभद्रेस ) हे सुंदरी, तू कोणाला हांक मारतेस ? इथें तुला कोणी उत्तर देणार नाहीं

**सुभद्रा**–( दचकून उभी राहून ) कुणी उत्तर देणार नाहीं म्हणजे ! आणि असा हा भयंकर वेष धारण करून या अंतःपुरांत आला, असे आपण आहांत तरी कोण !

**अर्जुन**–हे चारुगात्रि, मी तीर्थयात्रा करणारा प्रवासी आहें मी मार्ग चुकून या घोर अरण्यांत आलों, तों एक मदोन्मत्त मांसाहारी प्राणी मला भेटला त्याची शिकार करण्यांत माझीं वस्त्रें रक्तानें भरलीं, यामुळेंच मी तुला भयंकर दिसतों.

**सुभद्रा**–( घाबरून ) तर काय मी या घोर अरण्यांत आहें ! मला इथें कुणी आणली ?

**अर्जुन**–ते कसें काय झालें असेल हें मला सांगवत नाहीं.

**सुभद्रा**–( गहिंवरून ) हाय हाय ! हें कांहीं माझ्यानें सहन करवत नाहीं दादा, वहिनी आदिकरून सर्वजण मला म्हणतील, तू खास मुहूर्त चुकविण्याकरितां हें साहस

केलेंस देवा, हा विनाकारण कलंक मजवर आलाना ! हाय हाय ! जातो माझा प्राण ! ! ( एकदम मूर्च्छा येऊन जमिनीवर पडते )

अर्जुन–( तिला सांवरतो व वारा घालतो ) सुभद्रे, प्रिये सुभद्रे ! ( बोलत नाहीं असें पाहून ) हा दुष्टा स्त्रीघातका धनंजया, काय केलेंस हें ? अरे ही तुजवर आसक्त आहे असें कळलें असून हिला आपला खरा वृत्तांत सांगून ओळख देऊन, इकडल्या इकडेच इंद्रप्रस्थनगरांत न्यायचें मूर्खशिरोमणे तुला कसें रे सुचलें नाहीं ! धिक्कार असो मला !

[ वासुदेवि रंगताचि, या चालीवर ]

दैवयोग दुर्विपाकें आजि जाहला ॥
पुण्यबळें प्राप्त लाभ मींच दवडिला ॥ ध्रु० ॥
धर्मशब्दभयें केलि मनीं वानवा ॥
नाहिं खचित सोडिलि हंस भिउनि यादवां ॥
दिधले असतेचि बळी सर्व गांडिवा ॥
काय वदूं फसलि गोष्ट मार्ग खुंटला ॥ दै० ॥१॥

अरे, पण फसली असें कां ह्मणावें ? हिला किंचित् मूर्छा आली आहे, तर ही सावध होताच आपण कोण हें हिला कळवून अशीच इंद्रप्रस्थास घेऊन जावी, मग यादव काय करतात तें पाहूं (सुभद्रेच्या तोंडाजवळ तोंड नेऊन) प्रिये सुभद्रे, सावध होग सावध हो ! हा तुझा सेवक पार्थ तुझ्याजवळ आहे, दुसरें कोणी नाहीं ( ती सावध होत नाहीं यामुळें खिन्न होऊन )

---

१ प्रतिकूल

[ राग जोगी–ताल धुमाळी. ]

तुज दिलें दुःख मीं ह्मणूनी ॥ कां मजवरि बसलिस रुसुनी ॥ ध्रु० ॥ वद सखे नेत्र उघडोनी ॥ मी दीन तुजवांचोनी ॥ चाल ॥ हो प्रसन्न मज वरदानीं ॥ हा तव भजनीं ॥ राग सोडोनि करि भाषण था स्मित वदनीं ॥ तुज० ॥

अरे ही कांहीं सावध होत नाहीं ! हिला प्रबल मूर्छा आली आहे. जर या वेळेस थोडेंसें पाणी मिळेल तर ही आता सावध होईल. पण जवळपास कोठें पाणी दिसत नाहीं. जाऊन कुठून तरी शोधून आणलें पाहिजे, विलंब करून उपयोग नाहीं (उठतो) पण हिला एकटीला सोडून कसें जावें ? अथवा काय हरकत आहे ! इतक्यांत कोण येतें इथें ? या शेल्यावर स्वतः कशिद्यानें माझें नांव काढून माझ्या प्रियेनें, मी द्वारकेंत असतांना मला दिला आहे तर तोच हिच्या अंगावर घालून हिला झांकून ठेवतों (तसें करून) हे जगदीश्वरा ! नारायणा ! हिला मी तुझ्या स्वाधीन केली आहे. मी उदक घेऊन येईपर्यंत हिचें तूं रक्षण कर. (निघून जातो)

[ पुनरपि तोच राक्षस प्रवेश करितो ]

राक्षस– भगवान् द्वारकाधीश गोपाळकृष्णाचें कर्तव्य कोणासही कळणार नाहीं. त्या कृष्णाच्या आज्ञेप्रमाणें मी सुभद्रादेवीला इथें आणली व त्यानें जी बतावणी करावयाला सांगितली तीही केली. त्याच्या सांगण्याप्रमाणें सर्व जुळू-नही आलें. आता त्याच्या कपटनाटकाचा शेवटला भाग

उरला आहे, तेवढा करून दूतंच्या कामगिरींतून मोकळें व्हावें. कृष्णानें स्वतः पत्र लिहून या थैलींत घालून दिलें आहे, आणि सांगितलें आहे कीं, सुभद्रेच्या कंठांतली रत्नमाला या थैलीत घालून ती तिथेंच टाक आणि मग सुभद्रेला पुनः आणुन तिच्या मंदिरांत ठेव. तर आता त्याप्रमाणें करावें (सुभद्रेच्या गळ्यांतील रत्नमाला काढून थैलींत पत्रासुद्धा घालून थैली बांधून तेथेंच टाकतो व सुभद्रेवर मोहिनिमंत्र घालून तिला पूर्वीप्रमाणे उचलून खांद्यावर घेतो व इकडे तिकडे फिरतो) वा! ही सुकुमारी किती तरी हलकी आहे! मला वाटतें, एक जाईचें पुष्पच मी आपल्या स्कंधावर घेतलें आहे. असो, आतां विलंब उपयोगी नाहीं (पडद्याकडे पाहून) अरे, हे पहा पार्थराज उदक घेऊन गडबडीनें इकडेच येताहेत, त्याच्या दृष्टीस पडून उपयोगी नाहीं, तर आपण दुसऱ्या दिशेनें निघुन जावें [सुभद्रेसह निघून जातो] [तदनंतर हातांत उदकानें भरलेलें पात्र घेऊन अर्जुन प्रवेश करतो.]

अर्जुन—(आनंदानें) आतां सुभद्रेला एका क्षणांत सावध करतों (जाग्यावर सुभद्रा नाहीं असें पाहून) अरे, सुभद्रा काय झाली! मी जागा तर चुकलों नाहीं? छे, छे, हेंच तें स्थान— ही पल्लवराशी—हे दोन वृक्ष! मग सुभद्रा जावी कुठें? (गहिंवरून) काय व्याघ्रसिंहादिक क्रूर पशुनीं भक्षण केली! किंवा त्या चांडाळ राक्षसानें पुनः हरण केली! ' काहीं कळत नाहीं हाय हाय! प्रिये सुभद्रे! आतां मात्र खचित तुला मी अंतरलों, सखे, या अर्जुनाच्या नादानें तू व्यर्थ फसलीस—

[ राग कर्नाटकी–ताल दीपचंदी. ]

कांते फार तुला मजसाठीं श्रम सखये पडले ॥ यो-
ग्य नसुनि मी प्रेमाला तव व्यर्थ सखे मजवरि तें
जडलें ॥ ध्रु० ॥ जरि वरिला असता दुर्योधन ॥
पाहिली तरि असती नेत्रांनीं ॥ काय करूं तुज
शोधूं कोठें ॥ धैर्य पहा सर्वहि तें खचलें ॥ कांते ॥ १ ॥

अरे, आणखी कितीही जरी या अरण्यांत बसून रडलों, तरी माझें समाधान कोण करणार आहे? वास्तव आपलें आपणच शांतवन करून घेऊन पुढील मार्ग काढला पाहिजे (इकडे तिकडे फिरून पाहून) अरे, हें काय इथें पडलें आहे? (पिशवी उचलून घेऊन) बहुधा ही थैली त्या सुंदरीची असली पाहिजे ती इथें इकडे तिकडे फिरली त्यावेळेस तिच्या वस्त्रांतून गळून पडली असावी बरें यांत काय आहे हें पहायला काय चिंता आहे! (पिशवी सोडतो व आंतील रत्नमाला व पत्र बाहेर काढून) अरे, ही रत्नमाला माझ्या ओळखीची आहे (नीट निरखून पाहून) होय, तीच ही रत्नमाला मीं द्वारकेंत असतांना माझ्या गळ्यांतून काढून तिला अर्पण केली होती बरें आतां या पत्रांत काय आहे तें पाहूं (पत्र उघडून) वाहवा! हें पत्र माझ्या प्रियेनेंच लिहिल्याप्रमाणें दिसतें आणि मलाच! तर मग वाचून बघायला काय चिंता आहे! (पत्र वाचतो) "श्रीमत्सकल–गुणैश्वर्य-मंडित मत्प्राणवल्लभ पार्थराज यांच्या चरणकमलीं ही गीतिद्वारा विज्ञापना अर्पण असो.

( आपल्याशीं ) प्रिये, या हतभाग्याला हीं विशेषणें शोभत नाहींत. बरें पुढें वाचूं. ( खालीं बसून वाचतो. )

पद.

" शशिकुलभूषणें सदया ॥ मत्प्राणेश्वर विजया ॥ विनवी ही तव जाया ॥ मान्य कराया ॥ १ ॥ अर्पियली ही काया ॥ तव चरणीं पतिराया ॥ ठाउक असुनी हें सखया ॥ त्यजिली कां माया ॥ २ ॥ मज दुर्योधनहातीं ॥ द्याया निश्चय करिती ॥ बंधू ते नायकती ॥ वदतां अंत किती ॥ ३ ॥ समयीं नाहीं आलां ॥ देइन मी प्राणाला ॥ धाडियलीसे माला ॥ खूण तुह्मांला ॥ ४ ॥ "

( आपल्याशीं ) यावरून पत्रासमवेत खुणेकरितां रत्नमाला देऊन मजकडे कोणास तरी धाडण्याचें सुदर्शनें ठरविलें होतें; पण मध्येंच राक्षसानें घात केल्यामुळें तें सर्व तसेंच राहिलें. असो; शेवटल्या गीतांत प्रिया काय म्हणते तें वाचूं-( वाचतो. )

" रिपु नेतां भार्येसी ॥ सुचटी यात्रा कैसी ॥ याहूनि होउनि संन्यासी ॥ न्या मज सेवेसी ॥ ५ ॥ "

( दुःखाकुल होऊन ) हरहर ! या शेवटल्या लेखानें तर माझ्या हृदयाचें पाणी होऊन गेलें ! प्रिये, जरी तू मर्मभेदक लेख लिहिलास तरी त्याबद्दल तुला काडीइतकाही दोष देण्यास जागा नाहीं, तुझ्या स्थितीच्या मानानें पाहिलें तर, हें तुझें लिहिणें फारच मर्यादेचें समजलें पाहिजे ( किंचित् विचार करून ) ठीक आहे तुझ्या सूच-

नेमप्रमाणें आतां संन्यासच घेतला पाहिजे आणि तो घेतल्यावर, या पत्राचें पारायण व या मालेनें तुझ्या मंगल नामाचा जप, यावाचून दुसरें कांहीं करणार नाहीं. बरें संन्यास घ्यावयाचा माझा निश्चय तर झालाच; पण तो त्रिदंडी घ्यावा, ह्मणजे त्या सत्पुरुषाच्या उपदेशासही मान दिल्याप्रमाणें होईल—( रडून )

साकी.

प्रिया सुभद्रा घोर वनीं या निशाचरें भेटविली ॥
हेंचि कळेना गुप्त कशी ती एकाएकीं झाली ॥
मायावश केलें ॥ कीं मज स्वप्नचि हें पडलें ॥ १ ॥

असो, त्याविषयीं आतां विचार कशाला? ठरले तेंच करावें.

[ असें म्हणून निघून जातो. ]

पहिला अंक समाप्त.

---

## अंक २ रा.

[ तदनंतर आसनस्थ कृष्ण प्रवेश करतो. ]

कृष्ण—( पडद्याकडे तोंड करून ) कोण आहेरे तिकडे!

[ द्वारपाळ प्रवेश करतो ]

द्वारपाळ—महाराज, मी द्वारपाळ आहें

कृष्ण—चक्रदंडा, दादासाहेबांची स्वारी कोणीकडे आहे तुला ठाऊक आहे?

द्वारपाळ– होय महाराज. सरकारस्वारी श्रीगर्गमुनींच्या दर्शनाकरितां त्यांच्या आश्रमाकडे गेली आहे

कृष्ण– ( आपल्याशीं ) असो, हें बरेंच झालें उपाध्यायही माझ्याच पक्षाकडे असल्याने तूर्तच्या प्रसंगास उचित असेंच कांहीं तरी त्यांना सांगतील, यांत संशय नाहीं. ( उघड ) बरें, स्वारी इकडे येत आहे असें तुला समजलें, कीं अगोदर येऊन मला कळींव.

द्वारपाळ-जी हुकूम ( असें ह्मणून मुजरा करून निघून जातो )

कृष्ण– ( आपल्याशीं ) काय सांगावें ? दादांचा स्वभाव हटी नसता तर त्यांच्यासारखा पुरुष अद्याप झाला नाहीं असें ह्मणण्यास कांहीं हरकत नव्हती आणि त्यांच्याशीं अशी प्रतारणा करण्याचेंही मला कारण पडलें नसतें परंतु करावें काय ? सुभद्रा दुर्योधनासच द्यावयाची हा आग्रह ते कांहीं केल्यानें सोडीनात. बरें सुभद्रेकडे पहावें, तर अर्जुनावाचून इतरास मला दिलीत तर मी प्राणच देईन, असा तिचा निश्चय झाला आहे सारांश, अशा अडचणीच्या प्रसंगीं मी जें करतों आहे तेंच योग्य आहे, असें आश्वासन गुरुवर्य गर्गमुनि यांजकडून मिळालेंच आहे या गुप्त मसलतीचा पाया मला कुठपासून तरी रचावा लागला ?

पद

[ समज धर गड्या, या चालीवर ]

तस्करा हातीं ॥ द्विजगोधन हरिलें ॥ तदां पार्थासि शरण आणिलें ॥ आयुधागारीं ॥ धर्म निजवल्लि ॥

द्रौपदीसह त्या दावियलें ॥ मुनिच्या दंडा ॥ पात्र त्यास केलें ॥ तीर्थाटना पाठवीलें ॥ नारदातें मीं ॥ त्यासि भेटवीलें ॥ इकडचें वृत्त जाणवीलें ॥ ७ ॥

खचित, या प्रसंगीं अर्जुन जर इंद्रप्रस्थनगरींत असता तर पांडवांची व यादवांची शेवटची भेट समरांतच झाली असती. तेव्हां हें जें मीं करविलें तें अगदीं योग्य आहे. पहा, किती तरी मला घोरणें संभाळावीं लागलीं व लागताहेत—

दिंडी.

गर्गगुरुतें घेतलें वश करोनी ॥
अखेरीची ठरविली तिथी त्यांनीं
बरें झालें कीं दिवस पुढें नाहीं ॥
चार मासांची मिळे अवधि पाहीं ॥ १ ॥

ऐन वेळेस सुभद्रेला नाहींशी करण्यास राक्षसही घरचा विश्वासू मिळाला ह्मणून सांगितल्याप्रमाणें त्यानें व्यवस्था कशी चोख करून टाकली. सुभद्रेला अर्जुनाच्या दृष्टीस पाडवून त्याच्या नकळत पुनः तिला नाहींशी केली, ह्मणूनच त्याला उदासीनता उत्पन्न होऊन तो संन्यास घेण्यास तयार झाला नाहींपेक्षां त्या बहाद्दरानें हें कृत्य करण्याचें कधीं पतकरलें नसतें आणखी मीं सुभद्रेच्या अक्षरासारखें अक्षर काढून तें पत्र त्याला मिळे असें केलें त्यानें तर दुजोरा आणला दुर्योधन आदिकरून वऱ्हाडी मंडळी सुभद्रा पुनः मिळाल्याचें आनंदकारक वर्तमान ऐकून पुढें मुहूर्त नाहीं याकरितां चातुर्मास्य संपल्यावर

लग्न करून घेऊ असें वचन देऊन परत हस्तनापुरास तर गेलाच. असो; आरभलेलें कार्य बरेंच सिद्धीस गेलें आतां पुढल्या तजविजीला लागलें पाहिजे.

पद.

[ शिवाशेची वाट न पहातां, या चालीवर. ]

अर्जुन तर संन्यासी होउनि रैवतकीं बसला ॥ झालि सुभद्रा नष्ट असा ग्रह त्याच्या मनिं ठसला ॥ वैराग्याचा पुतळा केवळ सांप्रत तो बनला ॥ ब्रह्मनिष्ठ वेदांती होउनि तुच्छ मानितो विषयाला ॥ प्राणायामें कुंभक* करुनी साधित योगाला ॥ सुभद्रेची मूर्ती हृदयीं धरुनि करितसे ध्यानाला ॥ चाल ॥ ही एक गोष्ट मज अनुकूलचि जाहली ॥ कीं ढोंग नसुनि खरि वृत्ति यतिस साधली ॥ नासिकाग्र दृष्टी सर्वकाल लागली ॥ चाल ॥ भोळे अमुचे दादा तेथें जाति दर्शनाला ॥ तरी खचित सांगतों तयाच्या लागति नादाला ॥ १ ॥

आतां, या यतिराजाची प्रसिद्धि द्वारकेंत होऊन, त्याच्या दर्शनास पुष्कळ लोक जातील असें झालें पाहिजे, ह्मणून ही कामगिरी माझा मित्र जो वक्रतुंड ब्राह्मण त्याला सांगितली आहे, तो येऊन काय सांगतो तें पाहूं ( पडद्याकडे पाहून ) ही पहा आली स्वारी काय हा चालण्याचा झोंक

---

* प्राण कोंडून धरणें. कुंभक हा एक योगशास्त्रपारिभाषिक शब्द आहे.

आणि काय ही मुद्रा! मुलाला वक्रतुंड नाव कसें अगदीं छान शोभतें.

[ तदनंतर विदूषक प्रवेश करतो. ]

विदूषक—( हुश्श करून, सुस्कारा टाकून ) भल्या मनुष्यानें या कृष्णाच्या नादीं लागू नये. कायहो, आज उजाडलें नाहीं तोंच त्या रैवतक पर्वताच्या जंगलांतून मला फांसेपारध्याप्रमाणें हिंडायला लावलें! मरेनाका तो यति, त्याला घेऊन याला काय करायचें आहे कोण जाणे! आपले तर पाय कसे दमून गेले आणि त्या द्वाड जंगलांतले कांटे किती जबरदस्त! या जोड्यांतून वर येऊन माझ्या पायात मोडले! काय तो आजचा फायदा एवढाच बरें, मला खूण तरी बरोबर सांगितलीन! तेंही नाहीं सर्व डोंगर जेव्हां पालथा घातला तेव्हां कुठें ते यतिराज एका गुहेंत सांपडले असो, आतां तिकडला वृत्तांत हे राजेश्री येथें बसलेच आहेत यांना कळवून आपण आपलें घर सुधरावें नाहींपेक्षां हे दुसऱ्या एखाद्या लचांडांत घालतील ( कृष्णाजवळ येऊन ) मित्रा, आज आमची चांगली दुर्दशा उडवलीस बरें!

कृष्ण— मित्रा, ये बैस; अरे दुर्दशा कसली ह्मणतोस! काय झालें तरी काय तुला?

विदू०— ही पहा पायाची कशी चाळण होऊन गेली आहे तो! तुला काय जागच्या जागीं गप्पा मारायला!

कृष्ण— बरें बुवा तसेंच कां होईना आज तुह्मी तलवार मारून आलां हमने आज तूप लावून पाय रगडूं

ह्मणजे झालें कीं नाहीं! पण तू ज्या कामाकरितां गेला होतास, तें काम कसें काय झालें हें सांग.

**विदू०**— मित्रा, त्याविषयीं आपल्याला अगदीं काळजी नको. मी जाण्याच्या पूर्वींच तेथें अशी दाटी होऊन राहिली होती कीं मारून तोबा चालला होता कोणी संतति, कोणी संपत्ति, कोणी आरोग्य अशाविषयीं स्वामींस विचारताहेत, कोणी नुसतेंच दर्शन घेऊन कांहीं फळफळावळ पुढें ठेवताहेत, असा धुमाकूळ तिथें माजून राहिला आहे. तुला काय सांगू, ज्या गुहेस जायला पूर्वी पाऊलवाट सुद्धां नव्हती, तेथें चार हात रुंदीचा रस्ता लोकांच्या जाण्यायेण्याच्या वर्दळीनें झाला आहे.

**कृष्ण**–( आपल्याशीं ) वाहवा, काय मौज झाली तरी! माझा एकंदर बेत कसा निर्विघ्नपणानें सिद्ध होत चालला आहे.

साकी.

**झाली यतिच्या माहात्म्याची प्रख्याती बहु लोकीं ॥**
**दादांच्या ती सहजचि आतां जाइल कानावर कीं ॥**
**संपुनि बहु गेलें ॥ आतां स्वल्प काम उरलें ॥ १ ॥**

( उघड ) बरें मित्रा, एवढ्या थोड्या काळांत त्या यतीची इतकी प्रसिद्धि झाली याविषयीं मात्र आश्चर्य वाटतें.

**विदू०**— हें बघ, तुला नाहीं का ठाऊक? हे लोक कसे मेंढरासारखे आहेत पुढच्या एका मेंढरानें खळग्यांत उडी घातली कीं मागून सगळीं पडलींच. त्याचप्रमाणें हें.

काल काय झालें ह्मणे, आमचे गर्गमुनि गांवांतल्या कांहीं विद्वान् ब्राह्मणाबरोबर आपल्या आश्रमांत कांहीं विषयावर बोलत बसले होते, तों मध्येंच जसा अंगात भूतसंचार व्हावा तसें करून एकदम, आपले उपाध्येबोवा "अलभ्य लाभ, अलभ्य लाभ" असें ह्मणत चालू लागले. ते बिचारे दुसरे ब्राह्मण अगदीं घाबरून गेले आणि तेही त्यांच्याबरोबर निघाले

कृष्ण–(उतावळीनें) हें अगदीं खरें अं? बरें पुढें?

विदू०–नतर, त्या थोळक्यासहवर्तमान मुनिमहाराजाची स्वारी रैवतक पर्वताकडे गेली व ज्या गुहेंत हे स्वामी बसले होते तेथें जाऊन त्यांच्या पायावर साष्टांग नमस्कार घालून पुढें हात जोडून उभी राहिली तेव्हां एवढ्या अगडबंब ऋषिमहाराजांनी देखील आपलें डोकें या स्वामीमहाराजापुढें लवविलें हा पुकारा शहरांत होताच मग काय विचारतां? टोळधाडीप्रमाणे लोकांचे थवेच्या थवे येऊन कोसळले दुसरें काय?

कृष्ण–(आपल्याशीं कृतज्ञताबुद्धीनें) गुरुमहाराज! या शिष्याची लज्जा संरक्षण करण्याकरितां केवढें साहसकर्म करण्यास तयार झालात! अहाहा! गुरुदैवताप्रमाणें अन्य दैवत नाहीं, हें शास्त्रवचन अगदीं खरें आहे पहा—

पद.

[धन्य दिवस आज वर्णूं, या चालीवर]

**कोण तुजसम सांग मज गुरुराया॥ कैवारी सदया॥**
**पाहिजे तें अंगीं स्वीकाराया॥ भवदुःख हराया**

कोण० ॥ ध्रु० ॥ तूंचि विष्णु तूंचि शिव तूं धाता ॥ तूं विश्वंभरता ॥ तूंचि व्यापकव्याप्यातें प्रसवीता ॥ तूं मायेपरता ॥ कोण० ॥ १ ॥ तूंचि शिष्या पोस-णारी माता ॥ तूं विद्यादाता ॥ तूंचि देशी तत्त्वनिधी निजहाता ॥ तारक बलवंता ॥ कोण० ॥ २ ॥

काय सांगूं, आमच्या गुरुमहाराजांनीं जेव्हां इतकी कथर बांधली, तेव्हा माझें काम निर्विघ्नपणानें तडीस गेलें असें मी समजलों ( उघड ) बरें मित्रा, तुजपाशीं कांहीं मिठाई व फळफळावळ त्या यतीपुढें ठेवण्याकरितां म्हणून दिली होती ती ठेवून मला कांहीं प्रसाद आणला आहेस कीं नाहीं !

विदू०–( आपल्याशीं ) मला वाटलें होतें कीं तें हा वि-सरेल, पण हा कसला छट, तो काय विसरतो ? ( उघड ) मित्रा, मी ज्यावेळेस त्या डोंगरांतून चुकलेल्या जनावरा-प्रमाणें इकडे तिकडे भटकूं लागलों, त्यावेळेस उन्हाच्या तिरमिरीनें प्राण कसे कासावीस होऊन जातात की काय असें होऊं लागलें, इतक्यांत एक सुंदर झगडी आढळला मग तेथें बसून त्या यतीस नैवेद्य दाखवुन तें सगळें खाल्लें व वर पाणी प्यालों तेव्हा थोडासा तकवा आला हें बरं, तू तें फराळाचें दिलें नसतेंस तर ( गहिंवरून ) हा तुझा मित्र तेथेंच चचला असता ( डोळे पुसतो )

कृष्ण–तुझ्या हातीं खाण्याची जिन्नस आल्यावर ती तुझ्या पोटाबाहेर कसची रहाते ! बरं त्या नैवेद्याचा कां होईना, मला थोडा प्रसाद आणावयाचा होतास

विदू०—नाहीं असें कसें होईल? हे पहा त्यावर गुंडाळलेले कागद आणिले आहेत (कागद दाखविते आणि हंसतो)

कृष्ण—शाबास! शाबास! याचा वचपा निघेल बरें!

विदू०—बरें मित्रा, तुला एक विचारावयाचें आहे तू जो इतका त्या यतींविषयीं खटाटोप माजविला आहेस, आणि एकसारखा तोच विचार चालविला आहेस याचें कारण काय?

कृष्ण—(उपहासानें) अरे कारण कसचें! तो यति महा विरक्त व शुद्ध ईश्वरी अवतार आहे, तेव्हां त्यानें या द्वारकेंत येऊन रहावे व आपणांस त्याचें नेहमीं दर्शन व्हावें हेंच काय तें.

विदू०—बरें, तो एवढा थोर साधु आहे, असें तुला कसें कळलें?

कृष्ण—अरे गर्गमुनींकडून.

विदू०—हां, तर मग मी तुला सांगतों या ढोंग माजविण्याच्या अपराधांत गर्गमुनि सामील आहेत, त्यांच्यावर मी दादासाहेबांकडे फिर्याद करतों

कृष्ण—चल निघ मूर्खा, फिर्याद करण्यासारखें तुझें काय त्यात वांकडें झालें आहे!

विदू०—(वेषानें) काय झालें तें सांगूं का! हें पहा, त्या यतीपाशीं जो स्त्रीपुरुषांचा घोळका जमला होता, त्यांत आमचें कुटुंबही होतें. काय सांगूं, सटवीनें टोपलीभर नारिंगें ओतून नमस्कार केलान्. मी त्यावेळेस तिला ओळख

दिली नाहीं, परंतु असा राग आला होता कीं या दंडकाष्ठानें त्या यतीची पाद्यपुजाच करावी.

कृष्ण–( हंसून ) बरें, आपल्या कुटुंबानें वर तरी काय मागुन घेतला

विदू०–माझ्यासारखा सौंदर्यवान् पति जन्मोजन्मीं असावा, इतकेंच.

कृष्ण–अहाहा ! तुला सौंदर्यवान् म्हणण्यास सगळ्या जगाचे डोळे फुटले पाहिजेत

[ तदनंतर गडबडीनें द्वारपाळ प्रवेश करितो ]

द्वारपाळ–(मुजरा करून) महाराज, सरकारस्वारी आली.

कृष्ण–( गडबडीनें उठून ) अरे कोठें आहेत !

द्वारपाळ– स्वारी आश्रमाकडून जी आली ती सुभद्राताईसाहेबांच्या महालांत गेली व आपणास तिकडेच बोलावून घेऊन ये, असा मला हुकूम केला.

कृष्ण– ठीक आहे ( विदूषकास ) मित्रा, मी ताईच्या महालांत दादांना भेटायला जातों, तूही विश्रांति घेण्यास घरीं जा.

विदू०– तुझा विजय असो ( असें ह्मणून निघून जातो )

[ तदनंतर पलंगावर निजलेली सुभद्रा व जवळ दोन दासी– सारंगनयना व कुसुमावती व एका अंगास बलराम अशी प्रवेश करतात ]

बल०–( एका दासीस ) कायग, आता प्रकृति कशी काय आहे ?

सारंग०– त्या वेळेपासून ताईसाहेब भ्रमिष्टासारख्या

करताहेत झोंप लागली असते, आणि मध्येंच दचकून उठतात. ज्या दिवशीं त्या नाहींशा होऊन पुन्हां याच मंदिरात पलंगावर निजलेल्या सांपडल्या, त्यावेळेस मीच पुढें होऊन हालवून जागा केल्या, त्याबरोबर केवढ्यानें जी किंकाळी फोडली आणि वेड्यासारख्या चहूंकडे बघूं लागल्या तेव्हां मीं पोटाशीं धरून घाबरू नका, तुम्ही आपल्या मंदिरातच आहां, असें सांगितलें तरी त्यांची खात्री होईना

कृष्ण–( लगबगीनें पुढें होऊन ) बरें, तेव्हां ती काय ह्मणाली ? अगदीं तिचेच शब्द सांग.

बल०–( अवज्ञेनें ) हः ! अरे, पोर अगदीं भिऊन गेली, त्यावेळचे तिचे शब्द काय नि काय काय !

कृष्ण– असें नव्हे दादा, समग्र एक प्रहर ती अदृश्य झाली होती, तेव्हां त्या तिच्या भाषणावरून कांहीं तरी सुगावा लागेल ह्मणुन ह्मटलें माझा तर अगदींच तर्क चालत नाहीं.

सारंग०– त्यावेळेस त्या काय ह्मणाल्या हें कांहीं मला आठवत नाहीं

कुसुमा०– मला त्यांचे ते शब्द पक्के स्मरताहेत.

कृष्ण– बरं तूं सांग काय ह्मणाली तें.

कुसुमा०– त्या म्हणाल्या कीं, ज्यांचीं वस्त्रें रक्तानें भरलीं आहेत, असे ते गृहस्थ कोठें आहेत

कृष्ण– काय याचा अर्थ असेल तो असो. आपली तर अक्कल कशी गुग होऊन गेली !

पद.

[ उधोजी प्यारे दिलकी दिलमे रहि, या चालीवर. ]

गुरुजि तुमच्या प्रीतिस पार नसे ॥
प्रीतिस पार नसे ॥ गुरु० ॥ ध्रु० ॥
आळ कठिण मजवर कीं होता ॥
मुक्तचि केलें असे ॥ गुरु० ॥ १ ॥
शिष्यतापहारिणी तव वाणी ॥
भरली अमृतरसें ॥ गुरु० ॥ २ ॥
कोण दयाघन तुजसम आहे ॥
तारक जो विलसे ॥ गुरु० ॥ ३ ॥

( बलरामास ) बरें दादा, माझा पक्ष अर्जुनाकडला असला तरी तुमच्याशीं मी असें कपट करीन, असें आपणांस वाटलें तरी कसें?

बल०—कृष्णा, मनुष्यावर प्रसंग गुदरला म्हणजे त्याच्या मनांत नानाप्रकारचे तर्क येतात. असो, आतां त्याविषयीं चर्चा कशाला पाहिजे? ईश्वरानें सर्व सकटें निभावलीं आता चार महिने लग्न लाचलें व दुर्योधनादिकांस व्यर्थ हेलपाटा पडला, एवढेंच काय तें थोडेसे गौण झालें.

कृष्ण—दादा, तें कसेंही होईल; पण या सुभद्रेच्या प्रकृतीला कसें करावें? तिला भलभलतेंच दिसतें, अन्नाचा द्वेष झाला आहे, पहा दोन दिवसांत तिचें तेज निम्मे नाहींसें झालें.

बल०—हो! तुला एक मोठें आनंदकारक वर्तमान

सांगायला विसरलोंच या आपल्या रैवतक पर्वताच्या गु-हेंत कोणी एक महासमर्थ वैराग्यशाली असा यति येऊन राहिला आहे त्याची तारीफ गर्गमुनींनीं भारीच केली, आणि त्याचें चरणतीर्थ व हा एक ताईत त्या यतीजवळू-नच त्यांनी करून घेऊन मजजवळ दिला आहे; आणि सांगितलें आहे कीं, हें तीर्थोदक सुभद्रेच्या देहावर सिंचन करावें व ताईत तिच्या उजव्या हातात बांधावा, ह्मणजे ती सर्व भयापासून मुक्त होऊन तिची प्रकृति पूर्ववत् होईल.

कृष्ण–फार चांगलें मग तसें करायला उशीर कां करावा ! ( एका दासीस ) कायग, ताईची उठायची वेळ झाली असली तर तिला हळूच जागें कर.

कुसुमा०–झोंप लागून फार वेळ झाला आहे. आतां जागें करण्यास कांहीं चिंता नाहीं ( हळूच हलवून ) ताई-साहेब, ताईसाहेब उठा ( सुभद्रा एकदम दचकून उठून बसते )

सुभद्रा–( भ्रांत होऊन इकडे तिकडे बघून ) मी कोठें आहें ? आणि ते रक्तमय पोषाखाचे गृहस्थ कोठें आहेत ?

कुसुमा०–हें पहावें सरकार झोंपेंतून उठल्या की यांचें पहिले भाषण हें असतें ( सुभद्रेस ) ताईसाहेब, आपण आपल्या मंदिरांत आहां असें काय बोलतातें ! हे पहा उभयतां सरकार आपल्या समाचारास आले आहेत.

सुभद्रा–(बलराम व कृष्ण यांजकडे पाहून) दादा, कृष्णा, अरे असे उभे कां ? बसायचें नाहीं का ? काय, येथें दोघी असून त्यांना बसायला आसनें देण्याचें सुद्धा कळत नाहीं. [दोघी दासी आसनें पुढें करतात, त्यांवर कृष्ण व बलराम बसतात.]

बल०—बरें, तुझी प्रकृति कशी आहे तें सांग आधीं

सुभद्रा—मला काय होतें आहे! चागली धडधाकड आहें खातें, जेवतें, सर्व यथास्थित चाललें आहे नी तुला कोणी सांगितलें माझी प्रकृति बिघडली म्हणून! हें बघ दादा, तू उगीच मला लाजवू नकोस, माझी प्रकृति बिघडून जळो हा प्राण नाहींसा व्हावा इतकी मी दैववान कोठें आहें!

बल०—तू उगीच काय बोलत आहेस हें? झालेल्या गोष्टीबद्दल तुला आम्ही तिळमात्र दोष देत नाहीं. आणि कसें काय झालें हेंही पण आम्हास कळलें आहे. त्यांत तुजकडे अपराध कांहीं नाहीं.

कृष्ण—हें बघ ताई, हें दादानीं एका समर्थ साधूचें तीर्थ आणिलें आहे, हें तुझ्या अंगावर शिंपडलें ह्मणजे तुझी सर्व बाधा नाहींशी होईल, आणि एक ताईत त्याच यतिमहाराजांकडून आणला आहे तो तुझ्या हातांत बांधला ह्मणजे मग तुला कसलेंही भय वाटणार नाहीं.

सुभद्रा—(अ.पल्याशी) काय, या उदकानें का माझा संताप कमी होणार! (उघड) बरें आहे, तुम्हांला काय उपचार करायचे असतील ते करा

कृष्ण— दादा, आमच्या ताईसारखी समजूतदार मलगी कधी मिळायची नाहीं विवाहास विघ्न येऊन दुर्योधनादिकांस परत जावें लागलें याबद्दल तिला वाईट वाटत नाहीं, असें समजलां की काय आपण!

बल०– अरे न वाटायला काय झालें ? तिला सर्व कळतें, ती लहान का आहे आतां ?

कृष्ण– ताई, एवढा चातुर्मास सपला, कीं पहिल्या मुहूर्तासच तू त्या सार्वभौम राजा दुर्योधनाची पट्टराणी होणार ? मग केवढा ताईला डौल येईल ! आमच्याबरोबर बोलशील तरी का नीट मग ?

सुभद्रा– ( कपाळास आंठी घालून ) काय बाई जळ्ळा त्रास ? हा माझा कपाळशूळ राहणार तरी केव्हां ?

कृष्ण– दादा, मग गुरुजींनीं सांगितल्याप्रमाणें उदक-सिंचन व तें रक्षाबंधन करा, म्हणजे तिला अम्मळ चैन पडेल.

बल०– ठीक आहे. ( पडद्याकडे पाहून ) अरे, तें तीर्थ आणि तो ताईत इकडे आणा.

प०–(तीर्थ व ताईत घेऊन प्रवेश करून) हें घ्यावें महाराज.

[ बलराम तिच्या अंगावर उदक सिंचन करून उजव्या हातात ताईत बांधतो ]

सुभद्रा–( आपल्याशीं ) काय मेला चमत्कार ! माझा रोग कोणता याची परीक्षा न करतां भलतेच उपचार केले तर काय होणार ? असो, वडील आहेत, काय सांगतील तें ऐकलें पाहिजे.

बल०– आपण येथें सुभद्रेला उगीच तिष्ठत बसविणें चांगलें नाहीं, तिला आपल्या सखीजनांशीं करमणूक करीत बसूं दे. चल आपण जाऊं.

कृष्ण– ठीक आहे. ( दासीजनांस ) अग, तुम्ही कांहीं

कमजास्ती झालें तर तावडतोच आम्हांला कळवा, व हिला आवडेल तसें इच्याशीं वागत जा (सुभद्रेस) ताई, आम्ही येतों बरें आतां. (सुभद्रा कांहीं न बोलता मान हालविते)

बल०– कृष्णा, त्या यतीच्या दर्शनास जाण्याचें आ-तांच ठरविलें आहे, तर तूंही माझ्याबरोबर चल

कृष्ण– आपण गेलां म्हणजे झालें; आणखी मला कशाला आलें पाहिजे तिकडे ?

बल०– छे छे, गर्गगुरूची तुला घेऊन जाण्याविषयीं आज्ञा आहे, तर चल.

कृष्ण– त्यांच्या आज्ञेचें कोण उल्लंघन करणार आहे ? चलावें तर, हा मी तयार आहें.

[ दोघे निघून जातात ]

सुभद्रा– अग सारंगनयने, माझ्या अंगधुण्याची तयारी कर जा मी अम्मळशानें तिकडे येतें.

सारंग०– आज्ञा बाईसाहेब. ( निघून जाते. )

सुभद्रा– सखे कुसुमावती, ती द्वाड दासी खालीं गेली कीं नाहीं हें पाहून जिन्याच्या दाराला आंतून कडी लावून ये.

कुसुमा०– ठीक आहे बाईसाहेब (कडी लावण्यास जाते.)

सुभद्रा– त्या सारंगनयनेला पाहिलें म्हणजे माझ्या अंगाची कशी लाही होते लुच्ची मेली, मी काय बोलतें, काय सवरतें तें सगळें जाऊन रेवतीवहिनीला सांगते. मला वाटतें, थोरल्या वहिनीनें एवढ्याचकरितां तिला इकडे ठेवून दिली आहे बरें, इतःपर आपण अगदीं सावधगिरीनें वागलें पाहिजे. त्या मेलीच्या देखत मनांतलें कांहीं बोलतां उप-

योगी नाहीं या कुसुमावलीचें मात्र माझ्यावर खरें प्रेम आहे माझें दुःख पाहून तिला भारी वाईट वाटतें, पण काय करील बिचारी ! तिच्या हातांत काय आहे ! [ कुसुमावती येते ]

कुसुमा०— सारंगनयना गेल्यावर दाराला कडी लावून आलें.

सुभद्रा— तू जाईपर्यंत ती सटवी जिन्यातच उभी होती ना !

कुसुमा०— होय बाईसाहेब, मला पाहताच खाली निघून गेली

सुभद्रा— सखे कुसुमावती, माझ्यावरचें हें संकट नाहीसें होऊन मनासारखें कधीं घडून येईल ! अथवा त्या सुखाची आशा नकोच ! देवा !

पद.

[ शिव शिव फसलों साजणि येउनी, या चालीवर. ]

व्यर्थ मि जन्मलें थोर कुळीं ॥
लागला सर्वदा फांस गळीं ॥व्यर्थ०॥ ध्रु०॥
नच ठावें स्वातंत्र्य कसें तें ॥
बंदित दास सुळीं ॥ व्यर्थ० ॥ १ ॥
गरिबा पोटीं येतें तरि तें ॥
मज नच देते बळी ॥ व्यर्थ० ॥ २ ॥

कुसुमा०— बाईसाहेब, या दोन दिवसात आधींच तुमची प्रकृति फार बिघडली आहे, त्यात आणखी असा संताप करून घेतलात तर कसें बरें होईल ! [ पाठीवरून हात फिरविते ]

सुभद्रा– तर मला कसें कर ह्मणतेस ? ( गहिंवरून ) मी कोणाच्या आशेवर जिवाचें समाधान करून घेऊ ? अथवा-

पद.

[ जो चिदानंदकंद, या चालीवर. ]

वद जाउं कुणाला शरण करी जो हरण संकटाचें ॥ मी धरिन चरण त्याचे ॥ अग सखये ॥ मी धरिन० ॥ ध्रु० ॥ बहु आप्त बंधु बांधवां प्रार्थिलें कथुनि दुःख मनिंचें ॥ तें होय विफल साचें ॥ अग सखये ॥ ॥ तें होय वि० ॥ मम तात जननि मात्र तीं बघुनि कष्टती हाल ईचे ॥ न चलेचि कांहिं त्यांचें ॥ अग सखये ॥ न चले० ॥ जे कर जोडुनि मजपुढें नाचले थवे यादवांचे ॥ प्रतिकूल होति साचे ॥ अग सखये ॥ प्रति० ॥ १ ॥

कुसुमा०– बाईसाहेब, मला तर असें वाटतें कीं, तुमच्या मनाप्रमाणें सर्व सिद्धीस जाणार. मात्र चार दिवस दुःखाचे आहेत तेवढे कसे तरी काढले पाहिजेत.

सुभद्रा– हें कशावरून ह्मणतेस तू ?

कुसुमा०– हें पहा, या दोन दिवसाखालीं आपली सर्वच निराशा होण्याची वेळ आली होती; पण ऐन मुहूर्ताच्या वेळींच देवानें आपणास नाहींसें करून त्या प्रसंगांतून वाचविलें. आतां काय, चार महिन्यांवर गोष्ट गेली आहे, इतक्या काळांत काय होईल नी काय नाहीं याचा काय नेम आहे ?

सुभद्रा–खरें गडे मलाही त्या गोष्टीचें भारीच आश्चर्य वाटतें! त्या दिवसापासून मी जेव्हां जेव्हां एकटी असतें, तेव्हां माझ्या मनांत हेच विचार घोळतात मला तर तें सर्व स्वप्नाप्रमाणें वाटतें

कुसुमा०–खरें पण, हो, बरी आठवण झाली. किती वेळ विचारीन विचारीन ह्मटलें, पण मेली संधीच सापडली नाहीं ह्मणून आता विचारतें बाईसाहेब, आपण नाहींशा झाला होता त्यावेळचे आपल्याला कांहीं स्मरते का!

सुभद्रा–अग हो. जी मी एकदां येथें निजलें होतें, ती एका घोर अरण्यांत जागी झालें

कुसुमा०–ह्मणजे ? हा काय चमत्कार!। तेथें कोणी आपल्याला नेले असेल बाई !

सुभद्रा–अग, मला पहिल्यानें मी आपल्या बागेंतच आहें असें वाटलें तेथें मी बराच वेळ मोठ्या आनंदात घालविली पण जेव्हां सध्याकाळ होऊन काळोख पडू लागला आणि तुह्मांपैकीं कोणीच माझ्याकडे आली नाहीं, तेव्हां तुलानू त्या सारंगनयनेला मोठमोठ्यानें हांका मारल्या.

कुसुमा०–( छातीवर हात ठेवून ) बरें मग ?

सुभद्रा–तेव्हा ज्याचीं वस्त्रें रक्तानें भरलीं आहेत असा एक सुंदर तरुण पुरुष माझ्यापुढें आला.

कुसुमा०–अगबाई ! तो कोण असावा बरें ?

सुभद्रा–मी कांहीं त्याचें नांव विचारलें नाहीं, पण तो ह्मणाला कीं, तुह्मीं काहीं आपल्या बागेंत नाहीं, या

घोर अरण्यात आहांत कशा आला असाल हें कांहीं मा-झ्यानें सांगवत नाहीं!! "

कुसुमा०—अगबाई! तर मग त्यालाही तुह्मी त्या व-नांत कशा गेला हें कांहीं ठाऊक नव्हतें जणूं बाई साराच मेला चमत्कार! बरें, पुढें काय झालें?

सुभद्रा—मी अरण्यांत कशी आलें असेन व याबद्दल मला दादा व वहिनी बोलतील, असें वाटून उरांत जी धडकी भरली त्यासरशी मला मूर्च्छा आली नी मग जागी झालें तों आपल्या महालातच आहें!!

कुसुमा०—बाईसाहेब, हें स्वप्न म्हणावें तर खरोखर आपण नाहीशा होऊन पुनः सांपडलां बरें, खरें ह्मणावें तर ही गोष्ट अमुकच तऱ्हेनें झाली असेल अशी खात्री होत नाहीं, तेव्हां याला ह्मणावें तरी काय!

सुभद्रा—सखे, त्या दिवशींच्या धादलींत आणखी दोन चमत्कार घडून आले आहेत.

कुसुमा०—ते कोणते?

सुभद्रा—हें पहा, त्यांची स्वारी जेव्हां द्वारकेंत होती त्यावेळीं एका शेल्यावर मी आपल्या हातानीं कशिदा का-ढून त्यावर त्यांचें नांव घालून त्यांना मी मोठ्या ममतेनें दिला होता, तो बाई माझ्या अंगावर होता व त्याचवेळीं आपल्या गळ्यातील रत्नमाला काढून माझ्या गळ्यांत आप-ल्या हातानीं घातली होती, ती बाई नाहींशी झाली

कुसुमा०—जें जें ऐकावें तें तें अघटितच! पण बाई

मी तुम्हांला सांगून ठेवतें, आपल्या मनासारखें ईश्वर खचित घडवून आणील

सुभद्रा–हें कशावरून ह्मणतेस तू?

कुसुमा०–कशावरून का होईना, मी ह्मणतें यावर आपण अगदीं भरवसा ठेवा.

सुभद्रा–छे छे! मी तितकी भाग्यवान् कोठून असणार! तशी असतें तर असें कां झालें असतें?

पद.

[ श्रीहरिच्या वेणुनादें मन माझें मोहिलें, या चालीवर ]

रुचती कां तीर्थयात्रा या समयीं त्यास ती ॥
मजवरची प्रेमबुद्धि कां हरिची लोपती ॥
दादांना अंधजांची भक्ती कां लागती ॥
या कृत्या साह्य होती कां वहिनी रेवती ॥१॥

कुसुमा०–ताईसाहेब, आज उभयतां सरकारच्या स्वाऱ्या येथें आल्या होत्या; त्याच्या बोलण्याचालण्यावरून, तुह्मांला विनाकारण दुःख दिलें याबद्दल त्याना पश्चात्ताप झाला असावा असें दिसलें

सुभद्रा–सखे, माझें समाधान करण्याकरिता तू बोलत आहेस दुसरें कांहीं नाहीं अग, त्याना कसचा पश्चात्ताप होणार आहे? ( गहिंवरून ) सखे, त्या कृष्णाचें बोलणें तू नाहीं का ऐकलेंस। चातुर्मास सपल्यावर ह्मणे मी त्या मेल्याची पट्टराणी होणार, मग मला डोल येईल अहाहा! हीं कसाबासारखीं बोलणीं सख्ख्या भावाला शोभतात कायग? सखे पहा—

पद.

[ राग जोगी–ताल धुमाळी. ]

माझ्या मनिंचें हितगुज सारें ठाउक कृष्णाला ॥
ऐसें असुनी दुःखावरती देतो डागाला ॥ ध्रु० ॥
अर्जुनजीला मज द्यावी हें आपणची वदला ॥
आशा मज बहू दाउनि ऐसा घात करूं सजला ॥
जैसा वरती दिसतो काळा आंतुनही झाला ॥
तारिल ह्मणुनी धरिलें ज्याला बुडवी तो मजला ॥ १ ॥

कुसुमा०–( आपल्याशीं ) काय तरी बाई आता करावें? यांचा संताप अधिकच वाढत चालला, तेव्हां यांचें लक्ष दुसरीकडे लागेल असें केलें पाहिजे ( उघड ) बाईसाहेब, आपण पार्थमहाराजांना दिलेला शेला पुन्हा आपल्यापाशीं आला असें सांगितलेंत; तेव्हा तो कसा काय आहे हें पहाण्याची मला भारीच इच्छा झाली आहे

सुभद्रा–सखे, कोणी पाहतील म्हणून त्या पेटींत ठेवला आहे तुला पहाण्याची इच्छा असेल तर पहा जा

कुसुमा०–( पेटींतला शेला घेऊन येऊन व तो उलगडून रेंखून पाहून ) बाईसाहेब, काय आपली कुशलता तरी ही ! यावर काढलेली वेलबुट्टी किती सुरेख दिसते ! तसेंच मधून मधून हे पक्षी काढले आहेत, ते आताच उडतील की काय असें वाटतें

सुभद्रा–( शेला हातांत घेऊन खालीं आपटून ) सखे, या मेल्याचा मला असा राग आला आहे कीं याचे फाडून तुकडे तुकडे करून टाकावे.

कुसुमा०– बाईसाहेब, असा काय त्यानें अपराध केला आहे?

सुभद्रा– सखे, ऐक–

पद.

[ अहा हे कृष्णा मुकुंदा, या चालीवर. ]

अरसिक किति हा शेला ॥ त्या सुंदर तनुला सोडुनि आला ॥ अरसि० ॥ ध्रु० ॥ प्रेमें प्राणपतीला ॥ मीं संतोषें हा अर्पण केला ॥ दुर्मिळ जें स्थळ मजला ॥ तें सहज मिळुनि या दुर्भाग्याला ॥ तेथुनि कां हा ढळला ॥ त्या सत्संगतिला कैसा विटला ॥ कोंडुनि ठेविन याला ॥ मज दृष्टिस नलगे निष्ठुर मेला ॥ अर० ॥ १ ॥

तर उचल याला घेऊन आणि घाल त्या पेटींत! [ शेला फेंकून देते ]

कुसुमा०–( तसें करून आपल्याशीं ) यांना बरें वाटावें म्हणून जी जी गोष्ट काढावी, तिच्यापासून यांचा संताप अधिकच वाढतो; काय करावें ! ( उघड ) बाईसाहेब, दिवस पुष्कळ वर आला; आतां अंग धुवायला नाहीं का उठायचें ! वेळेवर थोडेंसें अन्न पोटांत गेलें तर आपणांस अम्मळ बरें वाटेल.

सुभद्रा– नको त्या जळक्या जेवणाची आठवण करू. मला तें अन्न कसें विषासारखें दिसून ओकारीच येते.

कुसुमा०– तर बाईसाहेब, या जलमंदिराच्या भोंवता-

ल्या बागेंत तरी घटकाभर चला, ह्मणजे हिंडल्याफिरल्यानें थोडीशी भूक तरी लागेल

सुभद्रा– सखे, मी तेथें आलें असतें; परंतु त्या बागेंत पाऊल टाकण्यास माझ्या अंगावर कसा काटा उभा राहतो. पहा—

पद.

[ राग पिलु–ताल धुमाळी. ]

बघुनि उपवना विरहाग्नीची ज्वाला भडके उरीं ॥
पुष्पांचा तो सुगंध माझ्या शूल निपजवी शिरीं ॥
कोकिल-कूजित ऐकुनि वाटे वीज कडाडे वरी ॥
कारंजाचे तुषार भासति अग्निकणाचे परी ॥
सुमंद शीतल सुगंध मारुत येतां अंगावरी ॥
थरथर काळिज कांपे वाटे डाग बसति अंतरीं ॥
॥ चाल ॥ पक्ष्यांचिं जोडपीं खेळति नानापरी ॥
दे ततुस हसही स्त्रीच्या वदनांतरीं ॥
सुखदायी कांता मोर सुनृत्या करी ॥ चाल ॥
जिकडे तिकडे पाहुनि ऐसें होतें मी घाबरी ॥
मजला मग घायाळचि करितो मन्मथ आपुल्या शरीं १

कुसुमा०– बाईसाहेब, आपण एकसारखा तोच विचार चालवून संताप करून घेतलात तर कसें होईल बरें ? मन थोडें दुसऱ्या गोष्टीकडे घालवून समाधान करून घेतलें पाहिजे

सुभद्रा– सखे, तू ह्मणतेस तें सारें मला कळतें, पण माझा उपाय चालत नाहींग ! सखे—

पद.

[ रागिणी आनंदभैरवी,—ताल धुमाळी. ]

किति सांगुं तुला मज चैन नसे ॥ धु० ॥ हें दुःख तरी मी साहु कसें ॥ या समयिं मला नच कोणि पुसे ॥ हा विरह सखे मज भाजितसे ॥ चाल ॥ मन कसें आवरूं ॥ किति धीर धरूं ॥ कसें करूं ॥ कि० ॥ १ ॥ हे बधु नव्हत मम वैरि खरे ॥ दाविती कसें वरि प्रेम बरें ॥ बोलोनी पाडीती हृदयासि घरे ॥ ॥ चाल ॥ नको नको मला जिव ॥ विष तरि पाजिव ॥ सखे सोडिव ॥ कि० ॥ २ ॥

( पडद्यांत ) अग ए कुसुमावती, लवकर दार उघड.

कुसुमा०— कोण ही? सारंगनयना हाका मारते आहे वाटतें.

सुभद्रा— कशाला मेली ओरडत आली कोण जाणे! सखे, पहा जा बरें.

[ कुसुमावती जाते व सारंगनयनेसह पुन प्रवेश करते ]

सुभद्रा—( सारंगनयनेस ) कायग, तुला माझ्या अगधुण्याची तयारी करून ठेवायला सांगितलें होतें, मग इकडे कशाला आलीस?

सारंग०— हो, मी तयारी करून वाट पहात बसलें होतें; पण धाकट्या वहिनीसाहेबांनीं आपणांस लवकर अग धुण्यास घालून वृंदावनाच्या चौकांत घेऊन यायला सांगितलें, म्हणून मी गडबडीनें कळवायला आलें

सुभद्रा—कोणी! रुक्मिणीवहिनीनें का!

सारंग०– हो, अगदीं लवकर यायला सांगितलें आहे.

सुभद्रा– अहाहा ! आज किती दिवसांनीं माझी आठवण झाली तरी वहिनीला ही! ! बरें, चला तर. (सर्व उठतात)

कुसुमा०– कायग, सारंगनयने, धाकट्याबाईसाहेबांचें अंगधुणें झालें ?

सारंग०– अग केव्हांच झालें. त्या आतां वृंदावनाच्या चौकांत पुजेला बसल्या आहेत व तेथेंच ताईसाहेबांना घेऊन यायला सांगितलें आहे.

सुभद्रा– कायग, इतक्या गडबडीनें मला बोलावू पाठविण्याचें काय कारण असेल बरें ? तुला कांहीं कळलें आहे का ?

सारंग०– त्यांनीं कांहीं मला सांगितलें नाहीं; पण थोरल्या सरकारांनीं मोठ्या समारंभानें वाड्यांत एक स्वामी आज भोजनास आणले आहेत, त्यांच्या दर्शनाला जाण्याकरितां असेल असें मला वाटतें.

सुभद्रा– हें कशावरून तू म्हणतेस ?

सारंग०– अष्टनायिका व सर्व यादवस्त्रिया, यांनीं यतिमहाराजाच्या दर्शनाला सोंवळ्यानें यावें, अशी वर्दी देण्याकरितां आपल्या हाताखालच्या चोपदारास आपले वृद्ध कंचुकी सांगत होते, तें मी ऐकलें त्यावरून म्हणतें.

सुभद्रा– असो, कांहीं का असेना, गेलें पाहिजे खरें. चल लवकर, मला अंग धुवायला घाल. अग कुसुमावती, माझें सोंवळें व पेला घेऊन तिकडे ये.

[ सुभद्रा व सारंगनयना जातात. ]

**कुसुमा०**–थाकट्या वहिनीसाहेबांकडून बोलावणें आलें हें फार चागलें झालें; नाहीं तर ताईसाहेबाचा शोक आणखी किती वाढला असता, हें कांही माझ्यानें सागवत नाही (पडद्याकडे पाहून) अगबाई! ह्या पहा थाकट्या वहिनीसाहेब तर पूजेला येऊन बसल्या. आता लवकर ताईसाहेबाना घेऊन गेलें पाहिजे. (निघून जाते.)

[ तदनंतर तुळशीची पूजा चालली आहे, व जवळ परिचारक उभे आहेत, अशी आसनस्थ रुक्मिणी प्रवेश करते. ]

**रुक्मिणी**–(पूजा सपवून) अरे अशोका, माझी जपाची माळ दे.

(परिचारक माळ देतो ती ओंटींत घेऊन जप करीत बसते.)

[तदनंतर सोंवळ्यानें विदूषक येतो, आचमन करतो व शेंडी पुसतो ]

**रुक्मिणी**–( जप संपवून प्रदक्षिणेस उठते व विदूषकास पाहून ) आज स्नान इकडेच झालें वाटतें?

**विदू०**–हो, आज स्वामीमहाराजाचा प्रसाद घेण्याला इकडेच आलों आहें

**रुक्मिणी**–परवा भावोजींनीं इतकी शोभा केली तरी अजून उशिरा स्नान करण्याची सवय गेली नाहींसें दिसतें.

**विदू०**–माझें प्रातःस्नान झालें होतें; पण इकडे येतांना वाटेंत कुतऱ्याच्या शेपटीवर पाय पडला त्यामुळें पुनः स्नान करावें लागलें.

**रुक्मिणी**–असें असें आतांशा सोंवळें बरेंच माजलें आहे तर? बरें तिकडलें कोठपर्यंत आलें आहे?

**विदू०**–स्वामिमहाराजाचें स्नान आन्हिक आटपलें.

आतां सर्व यादवस्त्रियाचीं दर्शनें चाललीं आहेत तुह्मांला काय सांगू वहिनी, या इतक्या स्त्रियांच्या नमस्काराला " नारायण " ह्मणतां ह्मणतां यतिमहाराजांचे डोळे पांढरे होतील असें वाटतें.

रुक्मिणी—बरें, तिकडील गर्दी आटपली ह्मणजे मी व वन्सं दर्शनाला येतों

विदू०—ठीक आहे (असें ह्मणून जाऊं लागतो)

रुक्मिणी—भटजी ही दक्षणा घेऊन चला (परिचारकास) अरे, तो विडा व दक्षिणा त्यांना दे (परिचारक तसें करतो)

विदू०—कोण ? ताईसाहेबच ना ह्या पहा आल्याच (असें ह्मणून निघून जातो.)

[ तदनंतर कुसुमावतीदासीसह सुभद्रा सोंवळ्यानें प्रवेश करते ]

रुक्मिणी—( सुभद्रेजवळ जाऊन ) वन्सें, माझ्या निरोपासरशा आंग धुऊन आलांत हें माझें मोठें भाग्यच समजायचें, नाहीं तर काय विचारता ! नाहीं माझी अंग धुण्याची तब्बेत लागत, धुवीन मी हवी तेव्हां, असें सांगून धाडलें असतें तर मी काय करणार होतें ?

सुभद्रा—वहिनी, सगळ्यांनीच माझ्यावर शस्त्र उपसलें आहे तेव्हां तू तरी कां कमी करशील ! चालू दे ! मी आतां दगडापेक्षा देखील घट्ट झालें आहें !

रुक्मिणी—( सुभद्रेचा हात धरून ) बरें, या इकडे बसा आधीं ( तिला जवळ घेऊन बसते पाठीवरून हात फिरवून तोंडाकडे पाहून)ही पाहिली दोन दिवसांत काय दशा होऊन गेली ती वेळेवर अन्न खायचें नाहीं, झोंप घ्यायची नाहीं,

जेव्हां तेव्हां उगीच संताप करून घ्यायचा, अशानें प्रकृति कशी बरें नीट होईल ?

**सुभद्रा**– हो, हो, माझा समाचार घेतां घेतां तुला फार श्रम पडले बरें वहिनी ! अग, माझ्यावर प्रसंग गुदरल्यावेळीं फुकाचे दोन शब्द तरी येऊन बोलायचे होतेस !

**रुक्मिणी**– हें पहा वन्सें, तुम्ही ऐन लग्नाच्या वेळेस नाहींशा झाला असें ऐकलें आणि जें मला झाले तें काहीं सांगवत नाहीं मला बसलेली जागा सोडून कांहीं उठवेना व शब्दही माझ्या तोंडांतून निघेना मनांत भलभलत्या कल्पना येऊं लागल्या काय सांगू तुम्हाला, तशी वेळ वैऱ्यालाही येऊं नये इतक्यांत पुनः तुम्ही मंदिरांत आहांत, अशी वार्ता ऐकताच मी तशीच धांवत तुमच्याकडे यायला निघालें; पण गर्गगुरूची सगळ्यांना अशी ताकीद झाली कीं, पुरुषांनीं देखील तिकडे जाऊं नये, फक्त तुमच्या दासींनीं मात्र तुमच्याजवळ असावें एकदोन दिवस जाऊन तुमची प्रकृति अम्मळ ताळ्यावर आली, म्हणजे मग तुम्हांला भेटावें, म्हणूनच बरें वन्सें तुम्हाला भेटल्यावाचून राहिलें ती.

**सुभद्रा**–वहिनी, तू किती जरी साधून घेतलेंस तरी मी खरें सांगतें कीं, तुझी पहिल्याप्रमाणें माझ्यावर ममता नाहीं

**रुक्मिणी**–हें कशावरून म्हणतां तुम्ही !

**सुभद्रा**–अग तुझी तशी ममता असती, तर तूं माझी इतकी विटंबना चालली असतां, डोक्यावर कानडें ओढून बसली नसतीस

**रुक्मिणी**–वन्सें, आतां बोललें तर तुम्हाला सदभिर

राग मात्र येईल मला सांगा, काय तुमची विटंबना चालली आहे! तुह्मी होऊन विनाकारण आपल्या जिवाला संताप करून घेतां

सुभद्रा—मला ज्या गोष्टीचा मनापासून तिटकारा आहे, ती गोष्ट तुह्मी जबरदस्तीनें माझ्याकडून करवायला लागलां, तर ती विटंबना नव्हे का?

रुक्मिणी—हं हं, आतां आलें ध्यानांत भावोजींनीं इतके सायास करून दुर्योधनाला देण्याचें ठरविलें ते काय तुमच्या अकल्याणाकरितां? अहो, त्यांच्यासारखा वर आज सगळ्या पृथ्वींत तरी मिळेल का! केवढी राजसत्ता! किती ऐश्वर्य! इतकें असून, बरें सौंदर्यांत तरी कमतरता आहे? तीही नाहीं फार काय सांगू, उद्यां तुह्मी त्यांची पट्टराणी झालां, म्हणजे आम्हाला देखील तुमच्यापुढें मान लववावी लागणार आहे, समजलांत?

सुभद्रा—पुरे पुरे वर्णन नवराबायकोनीं जसा काय एकच किल्ला गिरविला आहे वहिनी, तो इंद्रापेक्षां देखील भाग्यवान् असला तरी, मला नको असल्यावर, तेथें आग्रहानें मला देऊन, माझ्या जन्माची माती कां करतां?

रुक्मिणी—छे छे, असें बोलूं नये असलें भाषण आह्मां बायकांना शोभत नाहीं

सुभद्रा—परदुःख शीतळ आहेग वहिनी आतां मी बोललें तर तुमच्याचीं वर्में काढतां, असें ह्मणशील

रुक्मिणी—कांहीं नाहीं काय बोलायचें असेल तें खुशाल बोला

**सुभद्रा**– बरें तर वहिनी, तुझ्या भावानें तुला शिशुपाल-राजाला देऊ केली होती. तो काय रूपानें, पराक्रमानें किंवा ऐश्वर्यानें कमी होता, ह्मणून तू चोरून ब्राह्मणाबरोबर पत्र पाठवून, कृष्णाला वरलेंस तें कां बरें ? याचें समर्पक उत्तर दे ह्मणजे मी तुमचें सगळें ऐकतें

**रुक्मिणी**–( कांहीं उत्तर न देतां मान खालीं घालून बसते )

**सुभद्रा**–( तिला हातानें हलवून ) अहो वहिनीसाहेब, बोला, आह्मां कांहीं उपदेश करा

**रुक्मिणी**– वन्सें, तुमचें ह्मणणें अगदीं बरोबर आहे; परंतु तुमच्या मनाप्रमाणें माझ्याकडून कांहीं होण्याजोगें नाहीं, ह्मणून मी इतके आढेवेढे घेऊन बोलत होतें.

**सुभद्रा**– हें बघ वहिनी, तूं मनावर घेऊन कृष्णाच्या मनांत चांगलें भरवून दिलेंस ह्मणजे पुरे आहे. तो मग हव्या त्या रीतीनें माझ्या मनासारखें करील

**रुक्मिणी**– मीं ही गोष्ट तिकडे काढली नाहीं, असें समजतां की काय तुह्मी ? मी याविषयीं बोललें की, एकेक डोळा एवढाला करायचा; मग मी बाई भिऊन जालें. काय करावें बरें !

**सुभद्रा**– काय हवें तें कर, पण मी जिवंत रहावें असें जर तुझ्या मनांत असेल, तर हरतऱ्हेनें कृष्णाचें मन वळवून त्याच्याकडून वचन घे, आणि तसें तुझ्या मनांतून नसलें तर आतांच सांग, उगीच आशा लावून फसवूं नको

**रुक्मिणी**–( सुभद्रेस पोटाशीं धरून ) वन्सें, तुमचें

दुःख पाहून माझें काळीज की नाहीं तिळतिळ तुटतें; पण मीं वर दाखविलें नाहीं असो, आता तुह्मी अगदीं स्वस्थ रहा माझ्याकडून होईल तितके मी करीन बरें.

[ गडबडीनें विदूषक येतो. ]

विदू०— हं, वहिनी, आक्का, चला लवकर यतिमहाराज पाटावर बसले दादासाहेबांनीं सांगितलें आहे कीं, हस्तोदक आक्कासाहेबांनींच घातलें पाहिजे.

रुक्मिणी— ठीक आहे. वत्सें, चला स्वामिमहाराजांचें दर्शन घ्यायला.

[ असें ह्मणून सर्व जातात. ]

( दुसरा अंक समाप्त. )

---

# अंक ३ रा.

( आसनस्थ कृष्ण व बलराम, परिमित सेवकांसहवर्तमान प्रवेश करितात )

बल०— कृष्णा, या महाविरक्त यतीच्या दर्शनानें माझें अंतःकरण कसें आनंदभरित होऊन गेलें आहे पहा अशा साधूचा सहवास जर नेहमीं घडेल तर, या प्रपंचांतील दुःखें कधीं भासणार नाहींत. मी आजपर्यंत पुष्कळ साधु पाहिले; परंतु हा मासला कांहीं विलक्षणच आहे पहा—

[ भूपाळीच्या चालीवर. ]

जीं जीं कर्मं त्या योग्याच्या हस्तानें घडती ॥
निष्कामत्वें सहजपणें तीं झालींसीं दिसती ॥
हांसे बोले विषयि जनांसह परि ती त्याचि मती ॥
गुंतुनि गेली ऐसें वाटे सद्रूपावरती ॥
ब्रह्मानंदीं मग्न सदा जो भान न तनुवरती ॥
डुलुनि राहिला सौख्यसागरीं सेवित भरभरती॥१॥

कृष्ण–दादा, तुम्ही कांहीं म्हणा, त्या यतीच्या एकदर चेष्टेवरून त्यांत खरें पाणी दिसत नाहीं

बल०–( रोषानें ) हे नास्तिका कृष्णा, अशा त्या निर्मल साधुविषयींही तुला शंका आलीना ! मग मात्र तुझ्या अक्कलेची कमाल झाली !

कृष्ण–दादा, तुह्माला राग येत असेल तर मी असें पुन. म्हणणार नाहीं परंतु त्याच्या एकदर वागणुकीवरून मला जें वाटलें तें मी बोललों

बल०–काय त्याची वागणूक तुला गैर वाटली सांग पाहूं.

कृष्ण–गैर नव्हे तर काय ! अशी कोठें रीत पाहिली आहे, व दादा, तुम्ही हें लक्षांत आणा ह्मणजे समजेल–

पद.

[अस्तमान झाला टाकुनि युद्ध राम आला, या चालीवर ]

बघुनि सुभद्रेला ॥ कसा यति वेडावुनि गेला ॥धु०॥
॥ चाल ॥ हस्तांतिल ती गोमुखि गळली ॥ आशो–

वंचनीं जिव्हा चळली ॥ नासिकाग्र दृष्टीही वळली ॥ चाल ॥ निर्लज्जचि झाला ॥ टकमक मुख तें बघण्याला ॥ बघुनि० ॥ १ ॥

बल०—( तिरस्कारानें ) अरे, काय ही कुत्सित कल्पना ! म्हणूनच बरें, असे ते योगी आम्हासारख्या निंदकांचा सहवास नको म्हणून गिरिकंदरीं वास करितात. अरे कृष्णा, त्या निरंजन परमहंसाची हेलना करून, आपण पापांत बुडून मलाही बुडवीत आहेस. अरे, एवढ्यावरूनच पहा की, आज भोजनाचे पदार्थ इतके सुरस झाले होते, पण त्याला त्यांची चव होती का ? त्याचें जेवण कसें चाललें होतें तें पाहिलें नाहींस ?

## साकी.

वाली सारें मीठ तुपांतचि दुग्धीं लिंबू पिळिलें ॥
क्षीरीमध्यें कढी घालुनी हस्तानें कालविलें ॥
थोडें खावोनी ॥ उठला बसला फिरफिरुनी ॥१॥

तर या चेष्टा काय उगीच येतात ? अरे, त्यांचें लक्षच इकडे नाहीं केवळ आम्हासारख्याचा उद्धार करण्याकरितांच ते नजरेस पडतात. यांशिवाय त्याचा दुसरा कांहीं उद्देश नसतो

कृष्ण— पण ही जेवणाची धादल कां उडाली, यांतलें इंगित तुम्हाला नाहीं कळलें तें मी ताडलें आहे

बल०— अहाहा ! बृहस्पतीच तुम्ही ! ! सांगा सांगा पाहूं काय इंगित तें ?

कृष्ण– दादा, रागावूं नका माझ्या पोरबुद्धीला जें वा-टलें तें मी सांगतों.—

पद.

[ जयजय मदना सुहास्यवदना, या चालीवर. ]

जेव्हां जेव्हां वाढायातें ॥ येइ सुभद्रा ती त्या यतितें ॥
भुलुनि पाहुनी तद्रूपातें ॥ तैसे नाना ढंग करी ॥ १ ॥
पंक्तीमध्यें नसतों जरि मी ॥ भोळे तुह्मा पाहुनि नामी ॥
भलतें भलतें करिता स्वामी ॥ निश्चयपूर्वक मज वाटे २

बल०– आग लागोरे तुझ्या वाणीला ! ज्याला पात्रा-पात्र विचार नाहीं, त्याला मनुष्य ह्मणण्यापेक्षा पशु ह्मणणें फार चांगलें बधिरापुढें गायन केल्याप्रमाणें, व्यर्थ मी त्या महात्म्याचें या मूर्खापुढें वर्णन केलें असें वाटतें.

( कृष्णाकडे पाठ करून बसतो

कृष्ण– अरेरे, हें मोठें लचांड झालें ! तो साधु खरा असो किंवा खोटा असो, त्याबद्दल मौजेच्या भाषणांत इतकें मनःपूर्वक कशाला रागवावें ? बरें तसें कां होईना ? तुमचा अनुभव माझ्यापेक्षा जास्त आहे, तेव्हां तुह्मांला जें वाटेल तेंच खरें आतां झालें कीं नाहीं !

बल०–(कृष्णाकडे तोंड न करता) अरे जा, ज्याला सा-धुसंतांची देखील पर्वा नाहीं, तो वडील बंधूचा कितीसा मान ठेवणार आहे हें सहजच दिसतें.

कृष्ण–हें काय बरें दादा, उगीच थोड्या कारणासाठी इतकें रागावणें कांहीं चांगलें नव्हे. माझ्याकडून चूक झाली.

तुह्मी इतके मनापासून संतापाल असें मला कळलें असतें, तर मीं मुळींच या विषयावर भाषणसुद्धां केलें नसतें.

बल०— ( कृष्णाकडे तोंड करून ) कृष्णा, मला तुझा फार दिवसापासून अनुभव आहे उगीच माझ्याविरुद्ध पक्ष घेऊन मला चिडवायचें, आणि मी चिडलों ह्मणजे मग आपण संतोष मानायचा, यांत काय तुला थोरपणा वाटत असेल तो वाटो.

कृष्ण—दादा पुरे करा आतां, तो विषय सोडून द्या. खरोखर आपणाला दुखविल्याबद्दल मला फार वाईट वाटतें, हे पहा मी तुमचे पाय धरतों ( पाया पडतो )

बल०—(आनंदानें आपल्याशीं ) लबाडाला ही विद्या कशी उत्तम साधली आहे ! ( उघड ) पुरे पुरे, कृष्णा आतां ऊठ. गेला बरें माझा राग.

कृष्ण— ( हसून आपल्याशी ) या माझ्या भाषणाला पुढें एका प्रसंगीं असा जोर येणार आहे कीं काय सांगू !

बल०— कृष्णा या यतीविषयीं माझ्या मनांत एक विचार आला आहे आतां झालेल्या भाषणावरून त्याविषयीं तुझा अभिप्राय कसा काय पडणार हें मला कळलेंच आहे, तथापि तुला कळविल्यावांचून करणें बरोबर नाहीं ह्मणून सांगतों

कृष्ण— विचाराची ह्मणून गोष्ट आली, तेथें मी योग्य वाटेल तेंच सांगेन काय ते कळूं द्या

बल०— हें पहा मला असें वाटतें—

पद.

[अभाग्याच्या घरीं यावा कामधेनु आली, या चालीवर]

प्राप्त होय जें निधान करिं तें दवडुं नये वायां ॥ चार मास गृहिं ठेवुनि घेऊं सुखदा यतिराया ॥प्रा०॥ ॥ ध्रु० ॥ आयासावांचुनि ती आह्मां सत्संगति घडते ॥ दुर्मिळ जें वच गृहस्थांसि तें सहज कानिं पडतें ॥ सूर्योदय होतांचि तमापरि पातक तें दडतें ॥ चाल ॥ होय नित्य दर्शन त्याचें तरि सार्थक जन्मुनियां ॥ प्रा० ॥ १ ॥

कृष्ण– हो हो, हा विचार योग्य आहे. असे एक सोडून छप्पनहजार साधूंचा प्रतिपाळ करण्यास आपणांस कांहीं अशक्य नाहीं, परंतु—

बळ०– "परंतु" ह्मणून थांबतोस कशाला? पुढें तुझें ह्मणणें काय आहे तें कळीव ह्मणजे झालें.

कृष्ण– माझें ह्मणणें कांहीं आपल्याविरुद्ध फारसें नाहीं. अशा त्या निःस्पृहाचें आमच्या प्रापंचिकांच्या घरांत जुळा-यचें नाहीं, ह्मणून त्यांस समुद्रकाठीं जें उत्तम शिवमं-दिर आहे, त्यांत ठेवून देऊन सर्व व्यवस्था उत्तम रीतीची करून देतां येईल. मग दिवसांतून एक वेळ, दुवेळ किंवा पाहिजे तितके वेळ आपण त्याच्या दर्शनास जात जावें ह्मणजे झालें.

बळ०– छे छे! अशानें कुटुंबांतल्या सर्व मनुष्यांस

१ द्रव्याचा ठेवा.

नेहमीं दर्शन होणार नाहीं आणि त्यांचा वास घरींच असला ह्मणजे ज्यारा जेव्हां फावेल तेव्हां त्यास दर्शन घेण्यास सुलभ होईल

कृष्ण— तर मग आपल्या वाड्याजवळ जी पाटशाळा आहे, तिच्या मागल्या बागेंतलें मंदिर रिकामेंच आहे. पाहिजे तर तेथें ठेवावें ह्मणजे कोणालाही जाण्याला येण्याला कांहीं फारसें लांब होणार नाही.

बल०— हः ! काय जागा शोधून काढलीस पण ! ! अरे, असलें रत्न नेहमीं आपल्या डोळ्यासमोरच पाहिजे. तशांतून माझा मुख्य उद्देश तो निराळाच आहे

कृष्ण— तो कोणता बरें दादा ?

बल०— हें पहा, ही आपली सुभद्रा, किती बरें माझ्या आज्ञेंत वागत होती ! परन्तु अलीकडे तिचा एक चमत्कारिकच हट्टी स्वभाव झाला आहे, तेव्हां तिला या यतीच्या सेवेला लावावी, ह्मणजे सुबुद्धि उत्पन्न होऊन, तिच्या कल्याणाकरितां आह्मीं तिला दुर्योधनराजाला देण्याचें ठरविलें आहे, त्याला ती आनंदानें मान्य होईल यास्तव या यतिमहाराजांना सुभद्रेच्या अंतर्गृहांतच ठेवावे ह्मणजे तिला सेवा करण्यास बरे पडेल.

कृष्ण— ठीक ठीक ! फार चांगलें ! ! दादा, या गोष्टीला मात्र मी अगदीं कबूल नाहीं काय सुभद्रेच्या मंदिरांत त्या यतीची स्थापना करणार ? मग काय विचारतां ! चोराच्या हातीं जामदारखान्याची किल्ली दिल्याप्रमाणेंच होईल ! ! !

बल०-( त्वेषानें ) काय करूं रे! तुझे हे शब्द माझ्या कानाला तापलेल्या तेलाप्रमाणें त्रास देतात! अरे, तूं यःकश्चित् पापमय मनाची आणि त्या महायोग्याच्या अंतःकरणाची योग्यता सारखीच समजून, अशा कुत्सित कल्पना करतोस काय? धिक्कार असो तुला!!

कृष्ण- दादा, बोलण्यात थोडी अमर्यादा होईल त्याची क्षमा करा. समर्था जर भाषण न केलें तर पुढें प्रमाद होतात ह्मणून सांगतों. पहा, या तरुण स्त्रियांच्या सहवासानें आजपर्यंत केवढ्या केवढ्या समर्थ तपस्व्यांचे योग लटपटून गेले आहेत! असे इतिहास आपल्या कानावर आले नाहींत काय?

**वसंतीं बघुनि मेनकेला ॥ गाधिजमुनिनें निज सुत-पावरि उदकांजलि दिधला ॥ पराशर मोहुनियां गेला ॥ नौकेमाजीं धींवर-कन्यासंगोत्सुक झाला ॥ वसिष्ठहि ब्रह्मनिष्ठ कसला ॥ परि स्नुषेवरि लोभ धराया मनिं नच तो बिटला ॥ १ ॥**

दादा, अशा मोठमोठ्यांची ही अवस्था। मग हा यति तर काय अगदीं तरुण असून काय याचा थाट!—

पद.

[ दक्ष वदे हा देव कशाचा, या चालीवर ]

**लाल शालजोडी जरतारी झोंकदार शिरिं बांधोनी**
**नाचत चाले जैसा येतो रंगभूमिवर नट सजुनी**

---

१ कोळी.

बाजे कडकड छाटि गुलाबी माळ जपाची करिं धरुनी ॥ ध्यान करुनि बैसतां दिसे मज दांभिकपण वर ये फुटुनी ॥ सर्वांगावर भस्माचे तें पुंड्र छाति किति रेखोनी ॥ त्यावरि रुद्राक्षांच्या माळा घालि-तसे तरि किति जपुनी ॥ स्फटिकाचीं तीं सुबक कुंडलें झुलतांना हलती कानीं ॥ पायिं खडावा चट-चट करिती दंड शोभती करिं तीनी ॥ १ ॥

ह्मणून सांगतों, आपला विचार मला मुळींच पसत नाहीं.

बल०—वाहवा, कृष्णा वाहवा ! अरे रूपवान् आणि तरुण अशा पुरुषांचें वैराग्य कडकडीत नसतें असा तुझा ग्रह झाला आहे; परंतु तुला मुख्य गोष्ट सांगतों ती ही कीं, हें जग चांगलें व वाईट, खरें आणि खोटें अशा खि-चडीनें कसें भरून गेलें आहे, तथापि चांगल्याची वाई-टाबरोबर व खऱ्याची खोट्याबरोबर गणना ज्ञात्यानीं करूं नये काय, विषयाच्या तडाक्यांतून कोणीच पार पडला नाहीं, असें तू समजतोस ? ऐक तर—

पद.

[ बारे बिभिषण बोलतसे, या चालीवर. ]

उरला भेद न ज्यां कांहीं ॥ त्यांना कोठें भय नाहीं ॥ ध्रु० ॥ रंभा मोही सकलांला ॥ परि तिज शुक तो गुरु झाला ॥ वश करि मन्मथ जगताला ॥ पण तो हर जाळी त्याला ॥ शिवसुत गुह मारुति यांला ॥

१ पट्टे. २ कार्तिकस्वामी

कोणी नच करि वश अबला ॥ चाल ॥ भीष्मगुरु तो जिवंत आहे ॥ याया साक्षी ही ॥ शोभविती जो सकल मही ॥ उ० ॥ १ ॥

तर कृष्णा, असा खरा प्रकार असून तुला विपरीत कां भासतें याचें कारण सांगूं ? राग नाहींना येणार ?

कृष्ण– हें काय दादा ? आपल्या बोलण्याचा कधीं मला राग आला आहे ? सांगा काय तें

बल०– हें बघ, जो तो आपल्या मनाप्रमाणें जगाची परीक्षा करीत असतो कनक आणि कांता यांना तुच्छ मानणारे प्राणी या जगांत आहेत, असें जर चोर आणि जार याना सांगितलें, तर त्याना तें कधीं खरें वाटायचें नाहीं यावरून काय तें समज ह्मणजे झालें.

कृष्ण–तुह्मी काहीं ह्मणा, परंतु सुभद्रेला त्या यतीच्या सहवासांत नेहमीं ठेवणें हें काहीं प्रशस्त नव्हे यापासून काय घोंटाळा होईल हें काहीं माझ्यानें सांगवत नाहीं

बल०–बरें होऊं दे माझा जो निश्चय झाला तो कांहीं ढळायचा नाहीं

कृष्ण–मर्जी आपली माझें काम सुचविण्याचें तें मीं केलें आतां पुढें मागें मजवर काहीं बोल यायचा नाहीं

बल०–ठीक आहे ठरल्याप्रमाणें व्यवस्था करण्याकरिता मी जातों ( उठतो )

कृष्ण–( उठतो. बलराम निघून जातो. नंतर आपल्याशीं आनंदानें ) आजचा हा रंग फार नामी उठला. आतां ह्मणून दादाना त्या यतीविषयीं संशय कधींच ये-

णार नाहीं. अरे! पण मी त्या गंगाजलाप्रमाणें निर्मल मनाच्या पुरुषाशीं असें कपटाचरण करतों आहेंना? ( विचार करून ) छे छे, हें कांहीं फसविणें नव्हे ज्याचा परिणाम हितावह तें आरंभीं जरी कपटरूपी भासलें तरी त्यात दोष मुळींच नाहीं. असो, आज मला निद्रा चांगली सुखानें येईल. कारण—

साकी.

रचिला ज्याचा पाया त्याची बरी उभारणि झाली ॥
विघ्नावांचुनि जुळलें सर्वहि मोठी चिंता सरली ॥
नाहीं भय उरलें ॥ बहुधा सर्व तडिस गेलें ॥ १ ॥

आतां जिवाला करमणूक होईल अशा ठिकाणीं गेलें पाहिजे; तेव्हां काय सत्यभामेच्या मंदिरात जावें किंवा रुक्मिणीच्या इकडे जावें! ( विचार करून ) बरें. चला रुक्मिणीच्या महालांतच जाऊं ( कांहींसें चालून ) पण तेथेंही आज कांहीं सौख्य व्हायचें नाहीं कारण—

दिंडी.

बहुत दिन नच भेटलों सुंदरीला ॥
ह्मणुनि धरुनी बैसेल रुष्टतेला ॥
करिन जेव्हां मी बहुत आर्जवाला ॥
पात्र होइन मग मधुर सुहास्याला ॥ १ ॥

कांहीं असो, आज तिकडेच जायचें. ( पडद्याकडे पाहून ) अरे, मी बोलत बोलत अगदीं तिच्या मंदिराजवळ येऊन पोंचलों वा! या मंदिरास "लक्ष्मीविलासमंदिर" हें

नांव कसें अगदीं शोभतें या समयीं या ठिकाणीं जिकडे तिकडे काय गडबड चालली आहे पहा—

## पद.

[ राग कालंगडा—ताल धुमाळी. ]

परम सुवासिक पुष्पें कोणी चातुर्यें गुंफिति नारी ॥
सुगंध तेलें वासित करिती शय्यावस्त्रें धरुनि करीं ॥
नानापरिचे विडे मनोहर तबकांमध्यें कोणी भरी ॥
अंगराग ते तयार करुनी ठेविति शेजेशेजारीं ॥
खिडक्यांचे वाळ्याचे पडदे भिजवुनि कोणी गार करी॥
गुलाबपाणी थंड करोनी शिंपिति कोणी गच्चिवरी ॥
सर्व तयारी नीट कराया दक्ष असति जन किती तरी ॥
वाटे मज मंदिर हें करिलचि वैकुंठाची बरोबरी ॥१॥

( नीट रेखून पाहून ) अरे वः ! या कित्येक दासी माझ्या प्रियेला संतुष्ट करण्यास्तव कोणी सतार, कोणी वीणा, कोणी बीन, कोणी मृदंग अशीं नानाप्रकारचीं वाद्यें वाजवून गायनही करताहेत, तर आपण एकदम मंदिरांत जाऊं नये, हें सर्व ऐकत ऐकत सावकाशपणानें जावें ( असें ह्मणून निघून जातो )

[ तदनंतर वर्णन केल्याप्रमाणें गायन चाललें आहे व मध्यें मचकावर रुक्मिणी बसली आहे अशी प्रवेश करते ]

रुक्मिणी— ( काहीं वेळ गाणें झाल्यावर ) अग कोकिले आतां सर्वांना विश्रांति घेण्याकरितां जाण्यास सांग, आज कांहीं जिवाला चैन नाहीं, आणि तूंही मला पांच-

रूण घालून माझा डोळा लागला कीं आपल्या ठिकाणीं जाऊन नीज. (शय्येवर निजते व कोकिला पांघरूण घालते.)

कोकिला-( सर्वांस ) बायांनो, बाईसाहेबांस आज निद्रा फार येत आहे, तर तुह्मी हें लवकर आटपून आपापल्या घरीं चला. ( सर्व जातात. रुक्मिणीच्या पलंगाजवळ येऊन पाहून ) किती लवकर यांना आज झोंप लागली तरी ही ! बरें तर, आपणही आपल्या ठिकाणीं जावें. ( दोन पावलें जाऊन पाहून ) अगबाई ! सरकारस्वारीही पण इकडेच आली ! आतां कसें बरें करावें ! यांना जागें करावें तरी कठीण, न केलें तरी कठीण ! (पुन पलंगापाशीं जाऊन) बाईसाहेब, बाईसाहेब ! — या काहीं जाग्या होत नाहींत, आतां काय करावें ! ( नंतर कृष्ण प्रवेश करितो. )

कृष्ण-( दासीस )कायग, काय चाललें आहे !

कोकिला-( हात जोडून ) कांहीं नाहीं, बाईसाहेबांचा किंचित डोळा लागला आहे.

कृष्ण-कां, आज लवकर झोंप लागली ! काल रात्रीं जागरणबिगरण झालें होतें कीं काय !

कोकिला-आज कितीएक दिवस सरकारचें इकडे येणें झालें नाहीं, यामुळें रोज जागरणेंच चाललीं आहेत.

कृष्ण-( आपल्याशीं ) पुढें जो आह्मांवर रागाचा गहजब उडणार, त्याची या दासीनें प्रस्तावनाच केली ह्मणायची ( उघड ) अग, मी आलों हें कळवून हळूच जागी कर बरें

**कोकिला**–(पुन: पलंगाजवळ जाऊन) बाईसाहेब, बा-ईसाहेब, सरकार आले, उठावें

**रुक्मिणी**–(एकदम उठून बसून कपाळास आठ्या घालून) जायग, जळला त्रास तुझा हा! अलीकडे मला झोंप मुळींच नाहीं, ती आज थोडी कोठें आली होती, तर ती तुझ्यानें पहावली नाहींना?

**कोकिला**–बाईसाहेब! (असें म्हणून कृष्णाकडे बोट दाखविते)

**रुक्मिणी**–(कृष्णाकडे पाहून किंचित् लाजलेंसें करून पलंगावरून खालीं उतरून) कोकिले, आतां कांहीं मला येथें झोंप यायची नाहीं. या वेळीं वारा अगदीं बंद झाल्यामुळें येथें भारीच उष्मा होईल, याकरितां जलमंदिरांत मला घेऊन चल, म्हणजे तेथें झोंप आली तर येईल

**कृष्ण**–बरें, तिकडेच चला या उकाड्याच्या दिवसांत ही अगदीं उपयोगी नाहीं तशांतून या वेळेस—

## पद.

[राग मल्हार–ताल त्रिताल.]

**नभ मेघांनीं आक्रमिलें ॥ तारागण सर्वहि झांकुनि गेले ॥ ध्रु० ॥ कड कड कड शब्द करोनि ॥ लख-लखतां सौदामिनी ॥ जातातचि नेत्र दिपोनि ॥ अति विरहि जन ते व्याकुल झाले ॥ नभ० ॥ १ ॥**

**रुक्मिणी**–(किंचित् वांकड्या डोळ्यांनीं पाहून) म्हणून-च विरहि जनांची शांतता करण्याकरितां तिकडेच जायचें होतें. येथें येऊन माझी झोंप मोडायला कोणी सांगितलें होतें!

कृष्ण–प्रिये, तू मजवर रोष करावास अशी कांहीं माझी तुझ्याबराबर वागणूक नाहीं परंतु तशींच कांहीं विघ्नें येत गेल्यामुळें कांहीं दिवस मी तुझ्या आलिंगनसौख्यास अंतरलों, वास्तव—

पद.

[ बिडोरगा ह्यरळू, या कर्नाटकी चालीवर, ताल दादरा ]

नच सुंदरि करूं कोपा ॥ मजवरि धरि अनुकंपा ॥ रागानें तव तनु ही पावत काशि कंपा ॥ नच० ॥ ॥ ध्रु० ॥ नारी मज बहु असती ॥ प्रीती परि तुजवरती ॥ जाणसि हें तूं चित्तीं ॥ मग कां ही अशि रीती ॥ करिं मी कोठें वसती ॥ तरि तव मूर्ती दिसती ॥ चाल ॥ प्रेमा तो मजवरिचा नेउ नको लोपा ॥ नच० ॥ १ ॥

रुक्मिणी–( आपल्याशीं ) काय करावें । असें हें मोहिनीजाल पसरलें ह्मणजे माझा मग कांहीं उपाय चालत नाहीं ( उघड ) अशा नुसत्या मावर पसरण्याला मी आजपर्यंत पुष्कळ वेळां फसलें आहें, तर आतां आपणांस चांगली शिक्षा झाल्यावांचून माझा कांहीं राग जायचा नाहीं

कृष्ण–( हसून ) प्रिये, मग शिक्षा देण्याला उशीर कां करितेस ? सर्व तुझ्या स्वाधीन आहे पहा—

पद.

[ राग व ताल सदर ]

करपाशीं या तनुला ॥ बांधुनि करि शिक्षेला ॥ धरुनीयां केशांला ॥ दंतव्रण करि गाला ॥ कुचभल्लीं

वक्षाला ॥ टोंचुनि दुखवी मजला ॥ चाल ॥ हाचि दंड योग्य असे सखये मत्पाशा ॥ नच० ॥ २ ॥

(असें ह्मणून तिला आलिंगितो कोंकिला निघून जाते.)

**रुक्मिणी**–(लाजून) आता माणसानें काय बोलावें बाई.

(कृष्णासहवर्तमान पलंगावर बसते.)

**कृष्ण**–प्रिये, विनाकारण रागावुन आपल्याला व दुसऱ्याला त्रास देण्यात काय बरें सुख आहे? हे पहा, कांहीं दिवस लग्नाच्या गडबडींत व नंतर कांहीं दिवस सुभद्रेच्या प्रकृतीच्या धादलींत मला कोणीकडेच जायला बनलें नाहीं.

**रुक्मिणी**–आपणाला कितीशी लग्नाची गडबड व प्रकृतीची धादल होती हें मला दिसत होतें असो; बरीच गोष्ट निघाली. मला त्याचविषयी काही बोलायचें आहे मात्र मी जें जें विचारीन तें तें सगळें मोकळ्या मनानें सांगितलें पाहिजे

**कृष्ण**– जाऊ दे आतां ती गोष्टच नको रात्र फार नाहीं का झाली आतां ?

**रुक्मिणी**– होऊं द्या किती पाहिजे तितकी रात्र

**कृष्ण**– बरें काय तें विचार तरी.

**रुक्मिणी**– हें पहा, या वर्सांच्या लग्नाचा एक घोंटाळाच होऊन गेला आहे आपण तर तिकडे मुळीच लक्ष देत नाहीं तेव्हां याचा परिणाम होणार तरी काय ?

**कृष्ण**–परिणाम कसला व्हायचा आणि घोंटाळा कसला झाला आहे ? चातुर्मास झाला म्हणजे लग्न दरलेंच आहे.

रुक्मिणी- आपल्याकडून ठरलें आहे, पण त्यांना कोठे तें मान्य आहे ?

कृष्ण-बरें, आपल्याला या गोष्टींत मन घालायचें काय बरें प्रयोजन आहे? दादा वडील आहेत, सर्व कारभार ते मुखत्यारीनें करताहेत, तेव्हां त्यांत चागलेंवाईट पाहण्याचें काम त्याचें आहे तशांतून तुझ्याप्रमाणेंच मी एकदां त्यांजपाशी गोष्ट काढली होती, तेव्हां त्यानी मला साफ सांगितले कीं, " तू या गोष्टींत अगदीं मन घालूं नको, मी हवें तें करीन. " झालें आतां, मजकडे काय बरें उरलें आहे ?

रुक्मिणी- असें नव्हे भावजींचा ओढा पहिल्यापासून कौरवांकडे आहे, तेव्हां त्याना तेंच स्थळ चागलेंसें दिसतें खरें, परतु ज्याना म्हणून तेथें नांदायचें आहे, त्याचा नको का विचार पहायला ? त्यांतून त्या काहीं लहान नाहींत, आपलें कल्याण अकल्याण त्यांना कळतें मग असें का करावें बरें ? आपणांस तरी काय दहापांच बहिणी आहेत ? एकुलती एक सोन्यासारखी बहीण, तिचा हा असा प्रकार केला, तर या ऐश्वर्याचा, या सत्तेचा नी शहाणपणाचा उपयोग तरी काय ? या जन्माच्या गाठी आहेत, त्या विचारानेंच घातल्या पाहिजेत भावजींनीं आपला हट्ट सोडला नाहीं, आपण आपले उदासीन बसलां, नी त्यांनीं आपल्या जिवाला भलतें सलतें करून घेतलें, तर भावजींचा एकट्याचाच नाहीं लौकिक जाय,

चा ! ( कृष्णाच्या तोंडाकडे पाहून ) कां, मी बोललें इकडे लक्षच नाहीं वाटतें ?

**कृष्ण**– ( रागावल्यासारखें करून ) पुरे पुरे, मी सारें समजलों तुझ्या मनातून माझा व दादाचा विघाड यावा, व स्वतन्त्रपणानें आपण निराळें रहावें खरोखर प्रपचात जें वधूवधूचें वाकडें पडतें याला कारण स्त्रियाच, यांत संशय नाहीं रुक्मिणी तुला जर याच विषयावर आणखी बोलायचें असेल, तर मला येथें क्षणभरदेखील बसायचें नाहीं, साफ सांगतों

**रुक्मिणी**–( रागानें पलंगावरून उतरून दूर उभी राहून ) हें पहा, मला लहानपणापासून आपला अनुभव असल्या-मुळें, हीं सर्व सोंगें मला कळतात मी अशा दुबळ्यावणी-ला भ्यायची नाहीं हें काय मेलें ? आज ही चवथी खेप जेव्हां जेव्हां ही गोष्ट काढावी तेव्हां तेव्हां असेंच कांहीं ढोंग करून निघून जायचें. भावाभावांत वांकडें आणणा-ऱ्या कोण मेल्या अवदसा असतील त्या असोत त्यांची साक्ष मला देऊ नये, साफ सांगतें

[ रागानें फुसफुसत एकीकडे उभी राहते. ]

**कृष्ण**– (आनंदानें आपल्याशीं ) वाहवारे वाहव्वा ! किती मजेदार हिची या वेळेस मुद्रा दिसते आहे तरी !! ( उघड )

### पद.

[ आसखिय भयदिवेदरब्याडो, या कर्नाटकी पदाच्या चा० ]

अति कोपयुक्त होय परी सुखवितें मला ॥ भ्रुकुटि वक्र करुनि बघत ॥ गाल लाल सर्व होत ॥ थरथर

तनु कांपवीत ॥ इंदुवदनिं घर्म सुटला ॥ अति० ॥ध्रु०॥ जणुं कनकाची मूर्ति अग्निमाजिं तावली ॥ कीं नभ सोडुनि वीजाचि ती खालिं उतरली ॥ कीं ज्वलनाची ज्वाला कुंडांत पेटली ॥ चाल ॥ एक जागिं पद न ठरत ॥ हृदय भरत रिक्त होत ॥ अधरबिंब काय फुटत ॥ तेंवि वरी दंत रोंविला ॥ अति० ॥ १ ॥

हें काय बरें प्रिये! सहज मस्करीनें एखादा शब्द चुकून तोंडांतून निघून गेला, तर त्याबद्दल इतकें रागावायला कशाला पाहिजे!

रुक्मिणी– (तेथूनच) ही कसली प्राण घेण्याची मस्करी? मला समजलें आपल्याला येथून कसें तरी निघून जाण्यास कांहीं निमित्त पाहिजे, ह्मणूनच ही भांडगाची कुरापत आपण काढली आहे ती

कृष्ण– छे छे, हें काय भलतेंच मनात आणतेस? तूं येथून मला जा ह्मटलेंस तरी मी जाणार नाही समजलीस? पण तू आपल्या जागेवर येऊन बस कशी

रुक्मिणी– कशाला पण? कांहीं नको मीं बोललेलें कांहि आपल्याला आवडत नाहीं, मग उगीच कशाला कटकट पाहिजे!

कृष्ण– आतां खरोखर तुझ्या इच्छेप्रमाणें सर्व सांगतों. पण तू राग सोडून इकडे येऊन बैस

रुक्मिणी– (येऊन बसून) आपण नीटपणानें बोलल्यावर मला कांहीं राग नाहीं

**कृष्ण**— बरें, तुझें ह्मणणें तरी काय कळू दे.

**रुक्मिणी**— वत्सांच्या मनातून अर्जुनालाच वरण्याचें आहे आणि ती आशाही पण आपणच त्यांना लावून दिली आहे तर अर्जुनाचा शोध करून कोणत्याही प्रकारानें वत्साचे मनोरथ पूर्ण होतील, असें झालेंच पाहिजे

**कृष्ण**— ( विचार करून ) बरें, तुला इतकें सांगितलें ह्मणजे पुरे आहे कीं नाहीं ? कीं मी त्याच खटपटींत आहें, बहुशः ताईच्या मनासारखेंच होईल

**रुक्मिणी**— असे मोघम आशीर्वाद नकोत. आपण खरोखरीच त्या खटपटींत आहात, अशाविषयीं माझी खात्री झाली पाहिजे ह्मणजे मला बरें वाटेल

**कृष्ण**— ( आपल्याशीं ) आतां कसें बरें करावें ! हें मोठें लचांड आलें. हिला सांगावें तरी कठिण, न सांगावें तरी कठिण

**रुक्मिणी**— कां विचार कसला चालला आहे ? एखादी लोणकढी थाप मनांतून द्यायची असेल ?

**कृष्ण**— ( पुन आपल्याशीं ) हिला आपल्या मसलतींत घ्यावीच, कदाचित् हिच्यापासूनही प्रसंगीं उपयोग होण्याचा संभव आहे ( उघड ) प्रिये, आतां तुला मी सर्व सांगतों, पण तें फार गुप्त राहिलें पाहिजे; नाहीं तर स्त्रीजातीच्या स्वभावास अनुसरून जर कां तें बाहेर फोडलेंस तर फजितीस पारावार नाहीं

**रुक्मिणी**—प्राणनाथ, माझा आपल्याला इतके दिवस

अनुभव असून, सामान्य स्त्रियाची आणि माझी बरोबरी करून संशय घेतां, हें काहीं मला चांगलें वाटत नाहीं

**कृष्ण**–( हनुवटीस हात लावून ) तसें नव्हे प्रिये; ही गोष्ट फार जोखमीची आहे, ह्मणून चांगला बंदोबस्त राहण्याकरिता तसें बोलणें भाग आहे.

**रुक्मिणी**–बरें, आता विलंब कां ? असें काय मोठें गुप्त आहे तें सांगावेंच.

**कृष्ण**–तुझा कान पुढें कर, ह्मणजे सांगतों (कानांत सांगतो)

**रुक्मिणी**–( आश्चर्यकारक मुद्रा करून ) छे छे, मला नाहीं खरें वाटत ! असें होईल तरी कसें !

**कृष्ण**–अग, खोटें नव्हे, तोच तो. नीट पहा ह्मणजे तूंही ओळखशील

**रुक्मिणी**–सारें खरें; पण त्याला आतां लग्न कसें करता येईल ?

**कृष्ण**–(पुन: तिच्या कानांत सांगतो ) समजलीस ?

**रुक्मिणी**–( आनंदानें आलिंगून ) महाराज, आतां माझी सर्व काळजी दूर झाली हें काय मला ठाऊक ! मीं व्यर्थ आपणास दोष दिला, त्याची क्षमा केली पाहिजे.

**कृष्ण**–( ऐकलेसें करून ) अगदीं पहाट झाली. बोलण्याच्या नादांत रात्र कशी सरली, हें काहीं कळलें नाहीं. हा पहा पहाटेचा चौघडा देखील सुरू झाला

**रुक्मिणी**–( ऐकलेसें करून ) अगबाई ! खरेंच !! तर आता जाऊ द्या मला अंग धुवून, मामजी आणि सासूबाई यांच्या दर्शनास जाण्याची वेळ झाली.

कृष्ण–ठीक आहे (असें ह्मणून, रुक्मिणीसह उठून) अहाहा! या वेळेस काय मौज दिसते आहे!!

पद.

[ राग भूपाळी–ताल दादरा. ]

प्रिये पहा रात्रींचा समय सरुनि येत उषःकाल हा ॥ ध्रु० ॥ थंडगार वात सुटत ॥ दीपतेज मंद होत ॥ दिग्वदनें स्वच्छ करित ॥ अरुण पसरि निज महा ॥ १ ॥ पक्षि मधुर शब्द करिति ॥ गुंजारव मधुप वरिति ॥ विरलपर्ण शाखि होति ॥ विकसन ये जल-रुहा ॥ प्रिये० ॥ २ ॥ सुखदुःखा विसरुनिया ॥ गेलें जें विश्व लया ॥ स्थिति निज ती सेवाया ॥ उठलें कीं तेंच अहा ॥ प्रिये० ॥ ३ ॥

(जातात.)

(तिसरा अंक समाप्त.)

---

## अंक ४ था.

[ दासी कुसुमावती व सारंगनयना हातांत फुलांच्या परड्या घेऊन गडबडीनें प्रवेश करितात ]

सारंग०–सखे कुसुमावती, हे यतिमहाराज आणखी किती दिवस तरी इथें राहणार? तुला सांगतें, त्याची स्वारी आणखी कांहीं दिवस जर इथें राहिली तर मी कांहीं जिवंत रहात नाहीं.

कुसुमा०–अगबाई, तुला इतकें कटाळायला काय

झालें ! सारंगनयने, तुझें हें असलें भाषण ताईसाहेबांच्या जर का कानावर गेलें, तर काय परिणाम होईल हें माझ्यानें कांहीं सांगवत नाहीं.

सारंग०—अग, दुसऱ्याजवळ मी असें कशाला बोलायला जाऊं? तू माझ्या वडील बहिणीसारखी आहेस ह्मणून तुजपाशीं सुखदुःखाच्या गोष्टी बोलायच्या

कुसुमा०—अग पण चांडाळणी, ते यति आणखी कितीही दिवस इथें राहिले तर त्यांत तुझें काय खर्च होतें?

सारंग०—काय सांगूं तुला ! अगोदरच ताईसाहेबांचा मजवर राग, त्यांत त्या छांदिष्ट यतीची सेवा त्या अगदीं एकनिष्ठपणानें करितात झालें, मग काय विचारायचें ! रात्रीची झोंप नाहीं, पोटभर अन्न खाण्यालाही फुरसत नाहीं एकसारखा खडा पहारा करून मी अगदीं मरगळीस आलें आहें.

कुसुमा०—अग, आमचा जन्मच सेवा करण्याचा आहे; मग कटाळून काय होतें ? ( पडद्याकडे पाहून ) हं, ह्या बघ ताईसाहेब आणि धाकट्या वहिनीसाहेब इकडेच येत आहेत. आपली जीभ चांगली आवरून धर

[ तदनंतर रुक्मिणी व सुभद्रा प्रवेश करितात ]

**सुभद्रा**– ( आपल्याशीं )—

पद.

[ राग जिल्हा—ताल धुमाळी. ]

[ आवडली हरिला, या चालीवर. ]

**असतांना यतिसंनीध किंचित सुख वाटतें ॥**
**परि एकटी बसतां हाय दुःखें मन दाटतें ॥**

॥ चाल ॥ चार मास जाउनियां आतां येइल
तो दिन शेवटचा ॥ ऐसें मानसिं येउनि शयनीं
तळमळतें निशि सारि ॥ मग हें चित्त फाटतें ॥अस०॥

( दासींस उघड. ) अग तुह्मीं फुलें घेऊन इथेंच उभ्या आहांतना? धन्य झाली बायांनो तुमची कुसुमावती, तूही इच्या संगतीला लागून बिघडत चाललीस वरें.

कुसुमा०—( हात जोडून ) ताईसाहेब, अजून कांहीं उशीर झाला नाहीं यतिमहाराजांचें स्नान होऊन ते ध्यानस्थ बसले आहेत व त्या वेळीं तिथे कोणी जाऊं नये ह्मणून आह्मांस ताकीद केली आहे, यामुळें आह्मीं इथें उभ्या आहोत

सुभद्रा—बरं चला, निकडील सर्व तयारी ठेवा त्यांची समाधि आटपली कीं मला कोणी तरी कळवायला या

दोघी—आज्ञा ( असें ह्मणून निघून जातात )

रुक्मिणी—( सुभद्रेचा हात धरून ) वन्सें, तुम्हाला तर आतांशा अगदीं फुरसत नाहींशी झाली आहे पहा, तुमची गांठ घेण्याला कितीएक दिवस जेव्हां टपून बसलें तेव्हां ती आज कुठें पडली, पण घटकाभर मजशीं निवांतपणानें बोलायला तुम्हांला वेळ आहेना !

सुभद्रा—खरेंच वहिनी, अष्टौप्रहर मला त्याजपाशीं असावें लागतें मी जर क्षणभर जवळ नसलें तर लागलीच त्यांची तब्येत बिघडून जाते.

रुक्मिणी—ह ह ! इतके अगदीं तुम्हांवर भुलून गेले आहेतना ? पण वन्सें, सभाळाहो.

**सुभद्रा**– इश्श, हेंग काय जळ्लें तुझें बोलणें वहिनी! अग मजवांचून दुसरें कोणी जवळ असलें तर त्यांच्या मनाप्रमाणें वागत नाहीं ह्मणूनच ते रागावतात चल, तुला एवढें कुठें सांपडलें की लागली टीका करायला अग, अशा त्या यतींचा देखील चावटपणा करायला मागें पुढें पहात नाहीसना?

**रुक्मिणी**– तें असो, मला इतकाच आनंद वाटतो कीं, ते यति आल्यापासून तुमची प्रकृति बरीच निवळल्यासारखी दिसते ईश्वर करो आणि त्या यतीपासूनच का होईना, तुमची काळजी दूर होवो म्हणजे झालें

**सुभद्रा**– बरें वहिनी, तूं मला जें वचन दिलें होतेंस त्याचें काय केलेंस तें सांग

**रुक्मिणी**– हें पहा वन्सें, आज चार दिवस एकसारखी मी हीच गोष्ट काढतें, परंतु सरळ उत्तर नाहीं काहीं तरी वेडेंवांकडें बोलायचें माझा तर कांहीं उपाय चालत नाहीं. तेव्हां काय करूं मी सांगा!

**सुभद्रा**– ( गहिंवरून व खिन्न मुख करून ) या अनाथ अबलेचा गळा कापून तुमचें उभयतांचें कल्याण होवो म्हणजे झालें—

## पद.

[ राग जिल्हा –ताल धुमाळी ]

[ अक्रुर हा नेतो श्रीकृष्णाला, या चालीवर ]

**मज बहुतचि हीं आशा होती वहिनी ॥ मत्पतिचा शोध करोनी ॥ त्या कृष्णातें वळवुनि समजावोनी ॥**

करिशिल तूं मत्प्रिय ह्मणुनी ॥ चाल ॥ परि झा-
लिस निर्दय तूं ही ॥ गे ॥ परि० ॥ मज आतां थारा
नाहीं ॥ गे ॥ मज० ॥ चाल ॥ हतदैवा ही व्यर्थ किरे
जन्मोनी ॥ शिणविलि ती माउलि जननी ॥ १ ॥

रुक्मिणी—वन्सें, असें काय भलभलतें बोलतां तें ! तुमचें अकल्याण व्हावें अशी का आमची इच्छा आहे ? मी तुह्माला सांगतें, तुह्मी ज्याची सेवा करता तेच तुमच्या मनांतील सर्व हेतु पूर्ण करतील.

सुभद्रा—आतां माझें कसें का होईना तुमची सर्वांची परीक्षा झालीना ? तुला सांगून ठेवतें, पडली तर त्या महाराजाची सेवाच माझ्या उपयोगी पडेल.

रुक्मिणी—वन्सें, हेंच खरें तुह्मांला आणखी एक सांगतें ते यति ज्या वेळेस तुह्मावर प्रसन्न होतील त्या वेळीं त्यांस असे ह्मणावें, कीं अर्जुनाची भेट तरी करवा, नाहींपेक्षां तुह्मींच माझा स्वीकार करून मला बरोबर तरी घेऊन चला.

सुभद्रा—( रागानें डोळे वटारून ) जळल्या त्या जिभेला हाडच नाहीं वाटतें. अग तुला आतां वहिनी ह्मणायला देखील मला लाज वाटते चल जा, समजली अक्कल. इतःपर तुजबरोबर भाषणाच्या प्रसंग नको ! ( जाऊं लागते. )

रुक्मिणी—अहो वन्से रागावू नका. माझें बोलणें पुरतें ऐकून तरी घ्या

सुभद्रा—( कांहीं एक उत्तर न करतां निघून जाते )

रुक्मिणी—( आपल्याशीं ) याना माझें बोलणें या

वेळीं अगदीं कडू लागेल, पण पुढें तेंच गोड लागणार आहे. आतां एकदां त्या यतिमहाराजाचें जाऊन दर्शन घेतलें पाहिजे काय बाई चमत्कार तरी, पहिल्या दिवशीं जेव्हां मीं त्याला पाहिलें तेव्हां हा केवढा साधु असेल असें वाटलें, पण आंतलें हें कुणाला ठाऊक ! आतां त्याला केव्हां पाहीनसें झालें आहे (पडद्याकडे पाहून) अगबाई, हे पहा स्वामिमहाराज येऊन बसले आतां सधी पाहून त्याची भेट घेतली पाहिजे (निघून जाते)

[ तदनंतर यतिवेष धारण करणारा अर्जुन आसनस्थ प्रवेश करितो. ]

**अर्जुन**– हरिः नारायण, नारायण ! किती विलक्षण तऱ्हेचा माझ्या प्रारब्धाचा खेळ चालला आहे हा ! ज्या ज्या गोष्टी घडून आल्या त्या त्या स्वप्नवत् वाटताहेत पहा–

## पद.

[ राग झिंझोटी–ताल धुमाळी. ]

**दिसली पुनरपि गुप्त जाहली प्रिया सुभद्रा घोर वनीं ॥ येथें सुंदरी कैशी आली हेंचि कळेना मज अजुनी ॥ ध्रु० ॥ माझ्या वेषा खरें मानुनी हलधरही लागत भजनीं ॥ त्रिकालज्ञ परि मोह पावले कैसे नकळे गर्गमुनी ॥ कपटी कृष्णाचीही बुद्धी गेली कैशी ती भुलुनी ॥ या सर्वांचा विचार करितां जातों मूढचि होवोनी ॥ १ ॥**

असो; मायेच्या कर्तृत्वाविषयीं विचार करूं लागलों

मनुष्य जसा गोंधळून जातो तद्वतच माझी अवस्था झाली आहे तर आतां त्याविषयीं कल्पनाच नको येतो तो दिवस ढकलीत जावा मग त्याचा परिणाम काय होईल तो होवो एका अर्थानें पाहिलें असता माझी ही स्थिति फारच सुखकारक आहे.

पद.

[ सदाशिव धुंदी, या चालीवर. ]

**प्रिया मीनाक्षी ॥ निशिदिनीं सेवनीं दक्ष वचन मम लक्षि ॥ ध्रु० ॥ इंद्राचें सुख तुच्छ मजपुढें ॥ अमृत जरि तो भक्षि ॥ प्रिया० ॥ १ ॥**

तथापि असें तें मनोहर स्वरूप एकांतीं मजजवळ असतांना आपल्या मनांतील इच्छेप्रमाणें वागण्यास प्रतिबंध असल्यामुळें एखादे वेळीं अशी त्रेधा उडून जाते कीं काय सांगू—

पद.

[ अंजनीगीताच्या चालीवर. ]

**अग्नीपाशीं नवनीताची ॥ चुंबकमणिसंनिध लोहाची ॥ षड्रस अन्नीं क्षुधित जनाची ॥ तीच गती माझी ॥१॥**

कसेंही होवो, पण ती सुंदरी जर मजजवळ एक क्षणभर नसली तर हे प्राण जातात कीं रहातात अशी अवस्था होते असो; आपला तर नित्यनियमाप्रमाणें त्या पत्राचा पाठ व त्या रत्नमालेनें तिच्या मंगल नामाचा सहस्र जप तर आटपला आतां तिच्या त्या मनोहर रूपाचें ध्यान करून मानसिक पूजा करावी ह्मणजे आन्हिक आटपल्या-

सारखें झालें (कांहीं वेळ ध्यानस्थ बसून) अहाहा! सुंदरी तुझी नखशिखान्त मूर्ति या हृदयकमलीं भासू लागली तर हे आनंदवर्धके देवी, तुझी पूजा करितों, ही तुला अर्पण असो

पद.

नीरक्षीरालिंगनरूपी स्नान तुला तें घालोनी ॥
माझ्या अवलोकनदशांनीं टाकिन तव तनु झांकोनी ॥
त्वत्प्रीतीच्या रक्तपणाच्या कुंकुमतिलका लावोनी ॥
तव तनुलतिकायौवनपुष्पें घालिन तुजवर गुंफोनी ॥
चिंतनिं तुझ्या श्वास जाति ते धूपापरि घे मानोनी ॥
मदन पेटवी तनुकर्पूरा ओवाळिन तुजलागोनी ॥
नैवेद्यास्तव देइन माझा अधर घेइ अपुल्या वदनीं ॥
कपटाचरणा केलें त्याची क्षमा करी हे हरिभगिनी ॥ १ ॥

अरे, माझ्या नेत्रास उत्साह देणारी ती प्रिया अजून कां येत नाहीं बरें? बरोबर आहे माझ्या वेषास शोभलें पाहिजे म्हणून मींच नियम करून ठेविला आहे कीं माझें प्रातःस्नान झालें म्हणजे एक प्रहरपर्यंत कोणींही मजजवळ येऊं नये; त्याला अनुसरून ती माझी प्रियतमा येथेंच कुठें जवळपास असेल, तर तिला इकडे येण्याची खूण दिली पाहिजे (मोठ्यानें 'नारायण, नारायण' असा शब्द करितो)

[ तदनंतर दासी कुसुमावती धावत येते ]

**कुसुमा०**–(हात जोडून) महाराजांना काय पाहिजे आहे?

**अर्जुन**–(रागावून) हुः, दूर उभी रहा अग चटकीचे पोरी, किती तुझा उद्धटपणा हा? मी इथें सोंवळ्यानें बसलों आहें हें तुला दिसत नाहीं?

[ इतक्यांत सारंगनयना दासी प्रवेश करिते. ]

**सारंग०**–( कुसुमावतीस ) याना इतकें सबळायला झालें तरी काय ?

**कुसुम०**–( सारंगनयनेजवळ येऊन ) अग प्रारब्ध माझें ! हें बघ, ताईसाहेब जवळ नसल्या ह्मणजे हे असेच धडपड करीत असतात.

**सारंग०**–खरें बाई, तूतं ही आह्माला साडेसातीच आहे नाहीशी होईल तो सुदिन.

**कुसुमा०**–अग चांडाळणी, हळू बोल ! त्यांच्या कानावर का हे गेलें तर ते ताईसाहेबांना सागायला कांहीं कमी करणार नाहींत

**अर्जुन**–( सुभद्रा काय करीत आहे अशा संकेताचा हात करून ) नारायण, नारायण ! ( असें ह्मणतो )

**सारंग०**–जळ्ला बाई ! सगळाच यांचा नारायण, यात माणसानें समजावें तरी काय !

**अर्जुन**–( पुन रागानें तसाच हस्तसंकेत करून ) नारायण, नारायण ! ( असें ह्मणतो )

**कुसुमा०**–( पुढें होऊन ) स्वामिमहाराज, आह्मी मूढ दासी आहोंत, अशा खुणानी आह्मांला कांहीं कळायचें नाहीं आपणास जें पाहिजे असेल तें स्पष्टपणें सागा

**अर्जुन**–( रागानें ) तुह्मीं दोघीही इथून निघून चला. मी कांहीं तुह्माकडून सेवा करून घेण्यास इथें राहिलों नाहीं नारायण, नारायण !

**कुसुमा०**– ह ! आतां आलें ध्यानांत, याना ताईसाहेब

जवळ पाहिजे आहेत. ( स्वामीस ) महाराज, ताईसाहेब आतां येतील. पाहिजे तर त्यांनीं इकडे लवकर यावें ह्मणून त्यांस सूचना पाठवितें

**अर्जुन**– ( मान हालवून ) नारायण, नारायण !

**कुसुमा०**– बाई सारंगनयने, जा लवकर, ताईसाहेबांस घेऊन ये

**सारंग०**– ठीक आहे ( जाते )

**अर्जुन**–( आपल्याशीं ) ती सुंदरी या निरोपासरशी लरी येवो ह्मणजे झालें नाहीं तर रागाच्या आवेशांत भलताच शब्द निघून जाऊन सर्वच उघडकीस येण्याचें भय आहे. ( पडद्याकडे कान देऊन ) हा पावलांचा शब्द ऐकूं येत आहे यावरून खचित माझी प्रियाच येत असावी तिनें आज येण्याला उशीर करून मला भारी त्रास दिला, तर आपणही कांहीं वेळ रागावल्यासारखें करून तिच्याबरोबर भाषणाच वर्ज केलें पाहिजे ( तसें करून बसतो )

[ तदनंतर रुक्मिणी प्रवेश करिते ]

**रुक्मिणी**– ( गडबडीनें येऊन कुसुमावतीस ) अग कुसुमावती, तूं इथें हात जोडून का उभी ? वाड्यांत काय गडबड चालली आहे हें तुला ठाऊक नाहींसें दिसतें.

**कुसुमा०**– नाहीं बाईसाहेब आज सकाळपासून मी इकडेच आहें

**अर्जुन**– ( रुक्मिणीकडे पाहून, घाबरून ) हें काय लचांड ! उन्हाच्या तापानें संतप्त झालेला मनुष्य आकाशांत ढगें आलेली पाहून आतां पर्जन्य शांत करील अशा आशेनें

बसला असतां त्यावर जशी अभिवृष्टि व्हावी, तद्वत् ही बाई येथें आल्यानें माझी अवस्था झाली असो. आपण आता अगदीं सावधपणानें बसलें पाहिजे

रुक्मिणी– अग वत्साच्या लग्नाचा दिवस ठरला. आज इकडलें केळवण आणि देवकार्य आटपून टाकावें अशी गुरुजींची आज्ञा झाली आहे, तर तू वत्साना न्हाऊ घालायला जा

कुसुमा०– तर मग ताईसाहेब स्वामिमहाराजाच्या सेवेला आज इकडे यायच्या नाहीत ?

रुक्मिणी– अग छे; त्याना आता इकडे यायला वेळ कुठें आहे ? गुरुजींनीं सांगितलें कीं झाली तितकी सेवा पुरे आहे उद्यां महापर्वणी आहे तेव्हां सर्व मंडळी समुद्र-स्नानास जायची, तिथेंच स्वामींच्या चातुर्मास्याची सांगता करून त्यांस तिथूनच निरोप द्यावा

अर्जुन– ( घाबरलेली मुद्रा करून ) हाय हाय ! मी ज्या दिवसाला भीत होतों तोच दिवस येऊन ठेपला ना ! आतां माझी काय अवस्था होईल ती होवो.

कुसुमा०–पण बाईसाहेब, अजून हस्तिनापुराहून व-ऱ्हाडी मंडळी आली नाही नी केळवणाची गडबड का केली हें कळत नाहीं ?

रुक्मिणी–अग खुळे, इथें एकदा लग्नाला विघ्न आलें म्हणून तें हस्तिनापुरातच व्हावें असें दुर्योधनाचें म्हणणें पडलें आहे, वास्तव सर्व मंडळी तिकडेच जायला परवांच निघणार. मग नको का इथलें केळवण आजच करायला ?

असो, तू जा आतां, तिकडे खोळंबा झाला असेल वर्न्हे कांहीं तुझ्यावाचून दुसऱ्याला अंगाला हात लावू देणार नाहींत

कुसुमा०—ही मी चाललें, पण इथें यांच्याजवळ कोणी नाहीं

रुक्मिणी— तू जा; मी इथें यांच्या सेवेला रहातें.

कुसुमा०—ठीक आहे ( निघून जाते. )

रुक्मिणी—( अर्जुनाजवळ जाऊन हात जोडून ) महाराजांची काय इच्छा असेल ती कळवावी, मी सेवा करण्यास तयार आहें.

अर्जुन—( हातांतील गोमुखी आपटून ) आग लागो तुझ्या सेवेला आणि अशी ती दुःखकारक वार्ता उच्चारणाऱ्या त्या वाणीला हें पहा तू इथून निघून गेलीस म्हणजे माझी सेवा तू चांगली केलीस असें मी समजेन.

रुक्मिणी—अगबाई, हा काहीं खरा सन्याशी नव्हे, कोणी तरी मेला ढोंगी असावा. तसें नसतें तर वत्सांचें लग्न ठरलेलें ऐकून ह्याला इतका राग आला नसता

अर्जुन—(बेफाम होऊन छातीस हात लावून) या सिंहाचा भाग तो जंबूक नेणार असें ऐकून याला कोप आल्यावांचून कसा राहील बरें ! असलें हें वर्तमान सांगणाऱ्याच्या जिव्हेचे तुकडे तुकडे केले नाहींत एवढेंच भाग्य समज

रुक्मिणी—ह, आता तर पक्कें ध्यानांत आलें, तोच हा. अर्जुना, अरे ढोंग्या अर्जुना, आणलेल्या सोंगाची बरेच दिवस चांगली बतावणी केलीस; पण शेवटी मजपुढें फसलास.

अर्जु.–( आपल्याशी ) ही गोष्ट फार वाईट झाली रागाच्या आवेशांत देहभान नाहीसें झाल्यामुळें असा प्रमाद झाला, आतां याला करावें तरी काय ?

रुक्मिणी–कांरे दांभिका, अश्या गोष्टीनें तूं कोण आहेस हें कबूल होतोस कीं भावोजींना ही गोष्ट कळवून तुझी फजिती केली पाहिजे ?

अर्जुन–( उठून ) वहिनी, केवळ तुझ्या कपटामुळें अति दीन झालेला हा पार्थ तुला शरण आला आहे, तर यास अभय दे ( असें ह्मणून तिच्यापुढें साष्टांग नमस्कार घालतो )

रुक्मिणी–( हंसून अर्जुनाच्या पाठीवरून हात फिरवून ) अर्जुना ! हें काय ? ऊठ.

अर्जुन–( तसाच ) छे छे, तूं अभय दिल्यावांचून मी कधीं उठायचा नाहीं

रुक्मिणी–अरे खरोखर तुला अभय आहे, ऊठ माझ्या हातून तुझी फजिती होईल असें तुला वाटतें तरी का ? मी उगीच मौजेनें तसें बोलले समजलास ?

अर्जुन–( उठून आपल्या जाग्यावर बसतो )

रुक्मिणी–पार्था, चन्द्राकरतां एवढें साहस करण्याला का तयार झाला आहेस ? अरे पण वेड्या आतां तुला लग्न कसें करतां येईल ?

अर्जुन–हें पहा, जसा माझा वेष तसा हा संन्यासही सोंग आहे पण वहिनी, कृपा करून तू माझ्या नांवानें मला हांक मारूं नकोस कारण दुसऱ्यानें जर ऐकलें तर गोष्ट फटूकणी होऊन सर्वच फसेल.

रुक्मिणी–अरे अर्जुना, आतां तू पुढें कसें काय करणार?

अर्जुन–वहिनी, तें मला कांहीं सुचत नाहीं. सुभद्रा दुर्योधनास रचित केल्याचें वर्तमान ऐकून मीं उदास होऊन हा त्रिदंडी सन्यास घेतला आणि रैवतकपर्वतावर बसलों. तों दादांनीं खऱ्या भक्तीनें आणून मला इथें ठेवलें. पण इथून सुभद्रेसहवर्तमान माझी सुटका कशी होईल हें कळत नाहीं.

रुक्मिणी–अर्जुना, आतां असें कर.

अर्जुन–कसें करूं तें सांग. पण 'अर्जुना, अर्जुना' असें ह्मणू नकोसग.

रुक्मिणी–इकडे कान कर ह्मणजे तुझ्या कानांत सांगतें.

अर्जुन–ठीक आहे. (असें ह्मणून तिच्यापुढें कान करितो. रुक्मिणी त्याच्या कानांत सांगते )

रुक्मिणी–संभाळ बरें, आतां मी जातें.

अर्जुन–पण वहिनी, ही गोष्ट कृष्णाला ठाऊक झाली असून तूं सांगतेस तसें केलें तर त्याला आवडेलना?

रुक्मिणी–तूं आतां मला कांहीं विचारूं नकोस, पुढें तें तुला सर्व कळेल. आतां मी जातें.

अर्जुन–तुझे उपकार मी कधीं विसरणार नाहीं.

रुक्मिणी–आतां तुझ्या वेषाला अनुसरून वागलें पाहिजे. (असें म्हणून नमस्कार करिते )

अर्जुन–( हंसून ) नारायण ! ( असें म्हणतो. रुक्मिणी निघून जाते. आपल्याशी)

पद.

[ कर्नाटकी, राग केदार गवळी— ताल झपा. ]

वाटे सर्वथा मुक्त झालों ॥ ध्रु० ॥ रुक्मिणीनें मला मंत्र जो कथियला ॥ जुळुनियां होईलचि सफल तो चांगला ॥ काय फसवील ती या नराला ॥ वाटे सर्वथा० ॥

या रुक्मिणीनें तरी काय बलादगिरी लढविली पहा! "आज केळवण देवकार्य व्हायचें, लमाला लवकरच हस्तिनापुराला जायचें" इत्यादि मिथ्या भाषण करून मला राग आणून माझें खरें स्वरूप प्रकट करायला लावलें! शाबास, धन्य आहे तिची. सारें खरें; पण माझी ती प्रिया इकडे आल्यावांचून कशी राहिली. यातील इंगित तिची पुनः गाठ पडल्यावांचून कळायचें नाहीं.

[ तदनंतर दासी सारंगनयना प्रवेश करिते. ]

सारंग०—( हात जोडून ) महाराज, ताईसाहेबांनीं चरणापाशीं अशी विनती करण्यास सांगितलें आहे कीं, आज आईसाहेबानीं कांहीं कारणानिमित्त मला आपल्याजवळ ठेवून घेतल्यानें मी आज सेवेला अंतरलें, याबद्दल क्षमा असावी.

अर्जुन—ह, नारायण, नारायण, (असें म्हणून स्तब्ध बसतो.)

[ पडद्यांत, "काय एथें कोणी नाहीं ?" ]

सारंग०—कोणी दर्शनाकरितां आलें असावें. जाऊन पाहिलें पाहिजे (आंत जाऊन बाहेर येते व स्वामीपुढें हात जोडून) महाराज, यादवसेनेचे अधिपति सात्यकीमहाराज आपल्या

दर्शनाकरितां आले आहेत. आज्ञा होईल तर त्यांस आंत घेऊन येतें

अर्जुन–( येऊं दे या अर्थाची मान हलवून ) नारायण, नारायण ! ( असें ह्मणतो )

[ नंतर मागमनचना सात्यकीस घेऊन येते. ]

सारथ०–हे यतिमहाराज बसले आहेत, पुढें होऊन दर्शन घ्यावें

सात्यकी–( यतीपुढें साष्टांगनमस्कार घालतो )

अर्जुन–( वर हात करून ) नारायण ! नारायण !

सात्यकी–( उठून उभा राहून हात जोडून ) महाराज, दादासाहेबांची चरणापाशीं अशी प्रार्थना आहे कीं, उद्यांक महापर्वणी असल्यामुळें सर्व नागरिकजनांसहवर्तमान समुद्र-तीरीं स्वारी जाणार व वनभोजन आटपल्यावर सायंकाळीं स्वारी परत येणार, तेव्हां आपली इच्छा येण्याची असल्यास ताईसाहेबांस नेण्याची तजवीज करतां येईल, व आपणास येण्याचें नसेल तर त्यांस इथेंच ठेवितां येईल.

अर्जुन–वा', तुह्मी सर्व समुद्रस्नानास जाणार आणि मला इथें राहून काय करायचें आहे ! मी मोठ्या आनंदानें येणार मात्र त्या जनसमुदायाचा संपर्क आह्मांला न होईल अशी तजवीज राहिली पाहिजे

सात्यकी–तो बंदोबस्त मी ठेवीन. त्या ठिकाणीं ताई-साहेब व त्यांचे थोडे सेवक यांशिवाय कोणी आपल्या नजरेस पडणार नाहीं

अर्जुन–फार उत्तम आहे

सात्यकी–मी निरोप घेतों. ( असें ह्मणून पुनः साष्टांग-नमस्कार करितो )

अर्जुन–नारायण ! ( असें म्हणतो )

[ सात्यकी जातो ]

अर्जुन–( दासीस ) अग, माझी माध्यान्हस्नानाची तयारी करण्यास सांग जा मी आतां तिकडेच येतों.

सार०–आज्ञा ( असें ह्मणून निघून जाते )

अर्जुन–( उठून आनंदानें ) एकूण रुक्मिणीचा कानमंत्र सफल होईल यांत संशय नाहीं; आतां उद्यांच असें करणार !

साकी.

मोडुनि दंडा फेंकुन देइन भिकार भगवीं वस्त्रें ॥
मशकापरि तीं उडविन सारीं यादवचमुशस्त्रें ॥
आतां बळ आलें ॥ दुर्दिन सर्वहि ते गेले ॥

[ निघून जातो व पडदा पडतो ]

( चवथा अंक समाप्त. )

---

# अंक ५ वा.

( यतिवेष धारण करणारा अर्जुन आसनावर ध्यानस्थ बसलेला आहे व जवळ सुभद्रा व दासी कुसुमावती उभ्या आहेत )

अर्जुन–( ध्यान विसर्जन करून ) सच्चिदानंद परमेश्वर ! नारायण !

[ सुभद्रा व दासी नमस्कार करितात ]

अर्जुन – नारायण ! अभीष्टवरप्राप्तिरस्तु सुभद्रे, आम्हां यतिजनांस नगरवासापेक्षां हा स्वच्छंद वनविहार फारच

सुखकारक होतो. पहा, आज कितीएक दिवस तुझ्या त्या अंतर्गृहांत कोंडून ठेवल्याप्रमाणें झालें होतें; पण आज पिंजऱ्यांतून मुक्त जाहलेल्या शुकाप्रमाणें मला भारीच आनंद होत आहे.

सुभद्रा– ( किंचित् हंसून ) पण अजून व्हावा तसा आनंद होत नसेल कारण जवळ माझी कटकट ती आहेच.

अर्जुन– छे छे; रसिकजनापासून आह्मांला कटकट होत नाहीं. पण तुझ्या अरसिक दासी मला मुळींच आवडत नाहींत.

सुभद्रा– तें मला समजतें, पण काय करूं ! मोठ-मोठ्या कष्टाचीं कामें करण्याची मला संवय नसल्यामुळें हीं माणसें आपल्यासमोर आणणें मला भाग पडतें. पण आज कांहीं होवो, आपलीं सर्व कामें मीच करिन ह्मणजे आजचा दिवस तरी आपणास थोडासा आनंद होईल. ( दासीस ) बाई कुसुमावती, आज तुला मोकळीक आहे सर्व नागरिकजन जशी आज चहूंकडे क्रीडा करीत आहेत तशी तूंही कर जा.

कुसुमा०– ताईसाहेब, आपण माझ्या डोळ्यासमोर असला ह्मणजे जशी मला मौज वाटते तशी कशानें वाटत नाहीं मी आज्ञेप्रमाणें जातें नी जवळपास इथेंच कुठें तरी असतें गरज पडेल तेव्हां हाक मारावी. ( असें ह्मणून निघून जाते )

अर्जुन– सुभद्रे, तर तूं आज मला एकांतसुख देणार !

ठीक आहे. मीही पण तुझ्याकडून तुझ्या योग्यच सेवा घेईन.

सुभद्रा– ( किंचित् रागावलीसें करून ) आपण यति आहांत, तेव्हा कसेंही भाषण केलें तरी आपणास शोभतें

अर्जुन– प्रापंचिकाशीं कसें वागावें याचा आह्मांला अभ्यास नसल्यामुळें असा कांहीं बोलण्यांत प्रमाद होतो, तर त्याबद्दल तूं रागाऊ नकोस

सुभद्रा–अद्वैतनिष्टजनांची भाषा ऐकण्याचा फारसा प्रसंग मला आला नसल्यानें एकाद्या शब्दाचा अर्थ भलताच भासून असा मनाला रागाचा विकार होतो तर त्याबद्दल मीच क्षमा मागतें. ( असें ह्मणून हात जोडते )

अर्जुन– सुभद्रे, तूं फार चतुर आहेस तुझ्या संगतींत असल्यानें दिवसाचें पळ होऊन वर्षाचा देखील दिवस वाटेल

सुभद्रा– जेणेंकरून पळ.चा दिवस आणि दिवसाचें वर्ष मला न वाटेल अशा रीतीनें मला वागवावी म्हणजे झालें.

अर्जुन– ( आपल्याशीं ) आतां भाषणाचा ओघच बदलला पाहिजे ( उघड ) सुभद्रे, हा प्रातःकालचा समय पाहून मला असें वाटतें–

पद.

[ केशवकरणी अगाध लीला, या चालीवर. ]

नच दृष्टिस पडती ते सज्जन उदय पावतां कली ॥ तैसीं नक्षत्रें लोपलीं ॥ साधूंच्या चित्तांतुनि जाते कामक्रोधावली ॥ तमाची तशी गति जाहली ॥ ॥ चाल ॥ तें मुनिमन जैसें सर्व काळ भासतें ॥ हें

प्रसन्न तैसें नभ आतां दीसतें ॥ चाल ॥ निरुद्योगी पुरुषाची लक्ष्मी क्षीणतेस पावली ॥ तशी बघ रात्र नष्ट जाहली ॥ १ ॥

सुभद्रा–खरोखर या प्रभातकाळीं सर्वच रमणीय भासत आहे–

पद.

[ कोन जाये ब्रिजमो दधिबेचन, या चालीवर. ]

पुष्पपरागसुगंधित शीतल अतिमंद चरे वनवायु हा ॥ निखिलतरूंतिल पक्षि उठोनी शब्द करिति किति मंजु हा ॥ पुष्प० ॥ ध्रु० ॥ निबिडकुंजमुखिं मोर मयुरी नटुनि थटुनि नाचति हे ॥ हरिण उडति बहु शशक धावती गिरिवरिं डोलत नाग हा ॥पुष्प०॥१॥

अर्जुन–सुभद्रे, या समुद्रतीरीं जो रैवतक पर्वत दिसत आहे, त्यावर जाऊन जर आपण पाहू लागलों तर यापेक्षाही विशेष मौज या वेळीं दिसणार आहे.

सुभद्रा–पूर्वी आपण या पर्वतांतील ज्या गुहेंत बसला होता ती मला दाखविण्याचें जर कबूल कराल तर मी येईन.

अर्जुन–हो हो; ती गुहा येथून जवळच आहे.

सुभद्रा–ठीक आहे, चलावें तर.

अर्जुन–पण तूं अंगावर ती शालजोडी पांघरण्यास घे. कारण तेथला वारा तुला सहन होणार नाहीं. (शालजोडीकडे बोट दाखवितो )

सुभद्रा–ती शाल फार जड होईल. दासींनीं माझ्या आणलेल्या वस्त्रांतून एखादें हलकेंसें वस्त्र घेतें. गरज पड

लीच तर पांघरीन. ( आंत जाऊन शेला पदराच्या आतून काखेंत घेऊन येते )

अर्जुन—चल, अशी ये (दोघें पर्वतावर चढलेसें दाखवि-तात ) सुभद्रे, जरी अद्यापि ऊन झालें नाहीं तरी या थो-ड्याशा चालण्यानें किती तरी तुला श्रम झाले हे—

पद.

[ कर्नाटकी नाट्य राग—ताल धुमाळी ]

वदनीं घर्मजलाला ॥ पुसुनि पुसुनि कर शिणला ॥
श्वासभरित उर जहाला ॥ ये रक्तपणा गालाला ॥१॥
तर या ठिकाणीं बसून जराशी विश्रांति घे

सुभद्रा—आपणालाही ही चढण चढतांना श्रम झाले आहेत, पण निमित्ताला मी बरीच सांपडलें ह्मणायची

अर्जुन—बरें तसें कां होईना. या ठिकाणीं थोडा वेळ बसून नंतर त्या गुहेकडे जाऊ. ( दोघें खालीं बसतात. )

सुभद्रा—( खाली पाहिलेसे करून ) यतिराज, या द्वार-केंतील संपूर्ण नरनारी ह्या लहानशा समुद्रतीरच्या उपव-नात या पर्वताच्या मुलप्रदेशीं एकत्र झालेल्या येथून दिस-ताहेत, त्यावरून मला असे वाटतें—

पद.

[ दोलोरे जोबन मधुमा, या ठुंबरीच्या चालीवर. ]

गिरिवर हा सवदागिर आणि सिंधुपथें नौका भरुनी ॥
पुरुषयुवतिंची चित्रें मांडी विकण्यास्तव बाजारवनीं ॥
बघुनि वाटतें मन्मनीं या समयीं कीं ॥ बघु० ॥
भूषालंकृत पौरजनीं ॥ बघु० ॥ ध्रु० ॥

अर्जुन–( हास्य करून ) सुभद्रे तुझी कल्पना माझ्या मतें अगदीं बरोबर जुळली—

पद.

[ चाल सदर. ]

त्या चित्रांतुनि सुंदर पुतळी निवडुनि मी करिं घे॰ वोनी ॥ जात तयासंनिध पुसाया मोल किती वदरे ह्मणुनी ॥ वधुनि वाटतें मन्मनीं या समयीं कीं ॥ वधु॰ ॥ भूषालंकृत पौरजनीं ॥ वधुनि॰ ॥ १ ॥

सुभद्रा–( किंचित् लाजलेसें करून आपल्याशीं ) अगबाई, माझीं बोटें माझ्याच डोळ्यात गेलीं. ( उघड ) पण यति-राज, आपलें हे विषयिजनाप्रमाणें भाषण मी आजच ऐकतें.

अर्जुन–भोजनात जसा एकच प्रकार कटाळा आणतो तद्वत् मौजेच्या भाषणांत निरनिराळ्या तऱ्हेचे रस आणले नाहीत तर वेळ गमतीनें जात नाहीं, शिवाय आह्मां अद्वै-तवाद्यांना कसचा प्रतिबंध आहे? आह्मी कांहीं बोललों तरी वस्तुतः अलिप्तच असतों.

सुभद्रा–( आपल्याशीं ) यांचा पूर्ववृत्तांत विचारून घ्यावा असें पुष्कळ दिवस माझ्या मनांत आहे; पण संधीच मिळाली नाहीं. आज ही वेळ बरीच आली आहे, तर विचारतेंच यांना.

अर्जुन–सुभद्रे, स्तब्ध कां बसलीस? दुसरा एखादा अलंकार करण्याच्या विचारांत आहेस वाटतें

सुभद्रा–नाहीं महाराज, आपणांस कांहीं विचारायचें मनांतून आहे, तर कोप न करितां सांगितलें पाहिजे.

अर्जुन—तुला काय विचारायचें असेल तें खुशाल विचार, मला कांही राग यायचा नाहीं

सुभद्रा—हा संसार नीट झाला तर यांतही सौख्य पुष्कळ आहे.

साकी.

सुंदर ललना स्थिर लक्ष्मी गृहिं गुणवान् सुतही ज्याला ॥ पुत्रापोटीं पुत्र होय तरी स्वर्गाधिक सुख त्याला ॥

तर असें तें संसारसुख अशा तरुण वयांत आपण कां सोडलें हें मला सांगितलें पाहिजे

अर्जुन—सुभद्रे, संसारांत सुख आहे हें ह्मणणें मुळीच खोटें आहे. पहा—

साकी.

निःसारीं संसारीं नच सुख होत सुखाची भ्रांती ॥ अंगुष्ठ मुखीं चोखुनि बालक सेवी निज लाला ती ॥ परि त्या वाटतसे ॥ मातृस्तन्यचि पीत असे ॥ १ ॥

सुभद्रा—तें खरें आहे; पण जन्मतांच अशी विरक्तता कोणाला होत नाही कांहीं तरी कारण लागतें. तेव्हां आपणांस असें वैराग्य उत्पन्न होण्यास निमित्त काय झालें तें सांगावें

अर्जुन—काय सांगू तुला !—

दिंडी

माझि मातुलकन्यका रूपशीला ॥
तिचा माझा बहु लोभ जुळुनि गेला ॥

मान्य पूर्वी तद्बंधु असुनि त्याला ॥
पुढें नीचांनीं वचनभंग केला ॥ १ ॥

सुभद्रा–(आपल्याशी) अगबाई, काय तरी चमत्कार हा

पद.

[ हजारामेरा कानका मोती, या ठुंबरीच्या चालीवर. ]
सकल जगीं सारखे बंधु ॥ बहुत निर्दय जणु कपटाचे सिंधु ॥ सकल० ॥ ध्रु० ॥ शालक लक्ष्मी बघती केवल ॥ नच त्या जरि गुणबिंदु ॥ सकल० ॥

(उघड) बरें, तुमच्या त्या मातुलकन्येनें आपला तो निश्चय तसाच ठेविला की बंधूप्रमाणें तीही फिरली ?

अर्जुन–छे छे, तिची योग्यता काय सांगावी ! अशा स्त्रिया फार विरळा.

अभंग.

[ राग देस–ताल दादरा. ]

माझ्यासाठिं तीनें ॥ अन्न वर्जियेलें ॥ रक्त शोषविलें ॥ विरहाग्नीनें ॥ देही टरवोनी ॥ कोंडुनि ठेविलें ॥ ऐसे छळ केले ॥ बधूंनीही ॥ परि तिनें नाहीं ॥ मन बदलीलें ॥ निर्मळ राखीलें ॥ माझ्या ठाई ॥ १ ॥

सुभद्रा–(आपल्याशीं) शाबास ! बाई शाबास ! मी समजत होतें कीं, या जगांत असलें दुःख सहन करण्याला मला एकटीलाच ब्रह्मदेवानें निर्माण केली पण नाहीं; तूही मजप्रमाणेंच दुर्भागी उत्पन्न झाली आहेस. (उघड) बरें काय झालें ?

अर्जुन–पुढें काय व्हायचें! जसजसा माझ्याविषयीं तिचा आग्रह वाढत चालला, तसतसा तिच्या वधूचाही मला ती न देण्याविषयीं हट्ट वाढू लागला तेव्हां मला विरक्तता उत्पन्न होऊन सन्यास घेऊन तीर्थयात्रा करूं लागलों.

सुभद्रा–स्वामिमहाराज, तुमचें चरित्र अगदीं माझ्या कथेसारखेंच असल्यानें तुह्मी व मी समदुःखी होतों मात्र अंतर एवढें तुम्ही सन्यास घेऊन दुःखमुक्त झालात, मी मात्र या दुःसह तापाशीं तशीच जळत आहें

अर्जुन–सुभद्रे, तुझी आणि माझी कथा सारखीच ह्मणतेस तें कसें काय तें सांग

सुभद्रा–पूर्वाश्रमींची तुमची जी मातुलकन्या तीच मी असें समजा, ह्मणजे मला कशा प्रकारचें दुःख आहे हें कांहीं सांगायला नको.

अर्जुन–तें झालें; पण माझी मातुलकन्या ज्याच्याकरितां दुःख करीत होती तसें तुझें कोण आहे?

सुभद्रा–ऐकावें महाराज—

पद.

[ क्षीरसागर नम्मनी–या कर्नाटकी चालीवर. ]

पांडुनृपाते जनक जया ॥ माता कुंती यदुतनया ॥
धर्म भीम बांधव जया ॥ नामें विजय जो ॥ १ ॥
अर्पियलें या शरिरा ॥ तया लोकधनुर्धरा ॥ न फिरे जरि चराचरा ॥ कंठ चिरियला ॥ २ ॥

तर माझा हा निश्चय सिद्धीस जावा असा आपला आशीर्वाद असावा.

अर्जुन—दृढनिश्चयाचें फल सर्वेश्वर दिल्यावांचून कधीं राहणार नाहीं (आपल्याशीं) अहाहा! आतां कशाचा संशय उरला आहे बरें? तर माझी इला ओळख देऊन इचें आताच हरण करूं काय? अथवा नको. आणखी काय मौज होते ती पहावी.

सुभद्रा—यतिराज, आह्मीं बराच वेळ या ठिकाणीं विश्रांति घेतली; आतां त्या गुहेकडे चलायचेंना।

अर्जुन—ठीक आहे; चला. (दोघेंही थोडा वेळ चाललेंसें दाखवितात)

अर्जुन—सुभद्रे, हीच ती गुहा या ठिकाणीं मीं कांहीं दिवस मोठ्या आनंदानें घालविले.

सुभद्रा—अगबाई, या गुहेंत घराप्रमाणें सर्व सोई आहेत!

अर्जुन—पूर्वीं येथें कांहीं सोई नव्हत्या, पण मीं येथें येऊन राहिल्यावर भक्तजनांनीं ह्या सर्व तजविजी केल्या आहेत.

सुभद्रा—ह्या गुहेच्या तोंडाशीं मांडव तरी किती सुरेख घातला आहे! मला वाटतें कीं एखादें लग्नच या ठिकाणीं होऊन गेलें कीं काय!

अर्जुन—अथवा होणार आहे ह्मणून तयारी केली आहे, अशीही कल्पना शोभेल.

सुभद्रा—यतिराज, या गुहेंतून हिंडून पाहून यावें अशी मला इच्छा झाली आहे तर आंत जाऊन पाहून येऊं का? कांहीं श्वापदाविपदाचें भय नाहींना?

अर्जुन—येथें कांहीं भय नाहीं, खुशाल जाऊन पाहून ये.

सुभद्रा—मी जाऊन येतें तोंपर्यंत आपण या मंडपांत बसावें.

अर्जुन—ठीक आहे (बसतो, सुभद्रा गुहेंत जाते.)

अर्जुन—(आपल्याशीं) हें ठिकाण आपलें हृदय उघड करण्यास फार चांगलें आहे, तर—

पद.

[राग कालंगडा—ताल त्रिताल.]

निजरूप इला मी दाऊं का ॥ निज० ॥ ध्रु० ॥ सर्व चरित मम सांगुनि येथुनि सुंदरिला गृहिं नेऊं का ॥ निज० ॥ १ ॥

अरे, पण कदाचित् यादववीर अंगावर चालून येतील त्यांचें निवारण करण्याला आपणापाशीं शस्त्र नाहीं. काय करावें ! [इतक्यांत सुभद्रा हातांत एक गाठोडें व धनुष्यबाण घेऊन गुहेंतून बाहेर येते.]

सुभद्रा—महाराज, या गुहेंतील अगदीं शेवटल्या कोप-ऱ्यांतील कोनाड्यांत मला हें सांपडलें. तेव्हां हें काय आहे तें पहावें

[असें ह्मणून गाठोडें व धनुष्यबाण अर्जुनापुढें ठेवते.]

अर्जुन—(आपल्याशीं) वाहवा ! वाहवा ! आतां मात्र दैव अनुकूल झालें खरें. हा माझा पोषाख व धनुष्य-बाण असें, ज्या वेळीं मीं हा संन्यासवेष घेतला त्या वेळीं या गुहेंत एकीकडे ठेविलें होतें तें माझ्या ध्यानातही नसून योग्य प्रसंगीं माझ्या प्रियेलाच सांपडलें ! ही गोष्ट फार चांगली झाली. माझें धनुष्य माझ्या हातीं आलें मी आतां

कोणासही जुमानणार नाहीं. ( उघड ) सुभद्रे, हे पदार्थ कोणा तरी राजपुत्राचे असावेत

सुभद्रा– ( गाठोडें सोडून सर्व वस्त्र व भूषणें पाहून ) यतिराज, हीं सुंदर भूषणें व वस्त्रें माझ्या दृष्टीखालून गेलीं असावींत असें वाटतें, पण अमुकच प्रसंगीं हें कांहीं आठवत नाहीं

अर्जुन– तुझ्या त्या अर्जुनाचीं तर नव्हेत ? कारण तो वेषांतर करून तीर्थयात्रेस गेला असे मीं ऐकिलें आहे.

सुभद्रा– ( आपल्याशीं ) यांच्या शरीराची आकृति व बोलण्याचालण्याची ढब अगदीं त्याच्यासारखीच दिसत असून यांनीं आपली जी पूर्वाश्रमाची कथा सांगितली, त्यावरून तर मला एक विलक्षण आशा उत्पन्न झाली आहे, तर त्याबद्दलची खात्री करून घेण्याला असेंच केलें पाहिजे ( उघड ) महाराज, मला एक इच्छा उत्पन्न झाली आहे, ती आपण पूर्ण केली पाहिजे

अर्जुन– तुला आज निरिच्छ करून सोडतों काय तें बोल म्हणजे झालें

सुभद्रा– महाराज, मी आपणाला देवाप्रमाणें पूज्य मानून आपली सेवा करीत आहें आणि भक्त जसे आपल्या देवास निरनिराळे पोषाख देऊन दर्शन घेतात तद्वत् हा पोषाख आपणावर घालून आपलें दर्शन घ्यावें अशी मला इच्छा उत्पन्न झाली आहे

अर्जुन– ( आपल्याशीं आनंदानें ) अरे हे प्रारब्धा ! जितके मला दुःख दिलेंस तितका आज आनंदाचा दिवस

आणलास. ( उघड ) सुभद्रे, तुझ्या इच्छेप्रमाणें होऊं दे. घटकाभर हा पोषाख मी तुजकरितां धारण करण्यास तयार आहें

सुभद्रा– ( हातांत धोतर घेऊन ) तर मग हें वस्त्र आपण परिधान करावें.

अर्जुन– ( कच्छ घालून वस्त्र परिधान करितो )

सुभद्रा– आतां हीं सर्व वस्त्राभरणें आपणास घालतें. ( असें ह्मणून सर्व वस्त्रालंकार अर्जुनावर घालून अर्जुनाची समग्र मूर्ति पाहून चकित होऊन लाजतें व एकीकडे तोंड करून आपल्याशीं ) अगबाई, हे थेट माझ्या प्राणवल्लभाप्रमाणें दिसतात. तर देवा ! तेच असतील काय हे ?

पद.

[ मंजूळ बोले, या चालीवर. ]

मनेत्र गुंतले ॥ लुब्ध झाले ॥ ज्यांवरि असे ॥
चित्तांत सांचले ॥ तेचि आले ॥ बाहेरी तसे ॥
॥ चाल ॥ नरवर हे काय बाई ॥ शुद्ध मन हें ॥
साक्ष देई ॥ १ ॥

अग पण वेडे सुभद्रे, माणसासारखीं माणसें पुष्कळ असतात, तर केवळ रूपसादृश्यानें फसूं नको

अर्जुन– सुभद्रे, अशी एकीकडे तोंड करून कां उभी राहिलीस ? तुझा पोषाख सर्व घालून झाला ?

सुभद्रा– ( अर्जुनाकडे तोंड करून ) सर्व झाला, पण अंगावर एक शेला पाहिजे तो कांहीं यांत नाहीं.

अर्जुन– नाहीं तर नाहीं, मी आपली पहिली छाटीच अंगावर घेतों

सुभद्रा-( आठवलेंसें करून आपल्याशीं ) आतां हा शेला यावा ह्मणजे हेच जर प्राणनाथ असतील तर ओळखतीलच. ( उघड ) नको, नको; मजजवळ मघां मी आणलेला शेला आहे तोच देतें. (असें ह्मणून तो शेला देते )

अर्जुन-( शेला उघडून आनंदानें ) अरे, काय तरी चमत्कार हा ! ज्या शेल्यावर स्वतः कशिदा काढून मध्यें माझें नांव घालून माझ्या मातुलकन्येनें पूर्वीं मला दिला होता तोच हा शेला. ( चेष्टेनें ) पण या स्त्रीपाशीं तो कसा आला हें कांहीं कळत नाहीं.

सुभद्रा-(लाजून खालीं मान घालून आनंदानें आपल्याशी) खचित प्राणनाथच हे. ( उघड ) ती स्त्रीच आपली मातुलकन्या ह्मणून हा शेला आला असेल.

अर्जुन-(सुभद्रेजवळ जाऊन तिच्या स्कंधावर हात ठेवून) सुभद्रे, तूं काय ह्मणतेस तें कांहीं मला कळत नाहीं.

सुभद्रा-( अर्जुनाचा हात स्कंधावरील काढून ) मला इतके दिवस संशयांत ठेवलेलें अजून नाहीं का पुरें झालें ?

अर्जुन-असो; तूं माझा अति प्रिय शेला मला दिलास याजकरितां तुलाही मी कांहीं बक्षीस देतों. ही घे रत्नमाला. (असें म्हणून तिच्या कंठांत ती रत्नमाला घालतो )

सुभद्रा-( माला रेखून पाहून ) अगबाई, जी माझ्या प्राणपतींनीं पूर्वीं मला मोठ्या प्रेमानें दिली होती तीच ही रत्नमाला ! ( चेष्टेनें ) पण याजपाशीं ती कशी आली असावी ! ( असें म्हणून खालीं मुख करून हंसते. )

अर्जुन- हे मत्प्राणसंजीविनी प्रिये,-

पद.

[ मुला सांग नृपतीस० या चालीवर. ]

भूमि, जल, तेज, पवमान, नभ पांच हीं आदि
तत्वें करुनि साक्ष धरितों ॥

( तिचा उजवा हात आपल्या हातात घेऊन )

पाणि तुझा सखे वीर नर पार्थ हा धर्मकामीं तुला
आज वरितों ॥ प्रिये सोडि सोडी अतां संशयातें ॥
देइ सखि गाढ आलिंगन तें ॥ प्रिये सोडि० ॥ १ ॥

( असें म्हणून तिला आलिंगन देतो. )

सुभद्रा–(अर्जुनास आलिंगून, त्याच्या उरावर मान टाकून)

पद.

[ जिनी केसरीलो, या गझ्याच्या चा० ताल दादरा. ]

बहुत छळियलें नाथा व्यर्थ शिणविलें ॥ ध्रु० ॥
लावियलें तुह्मां ध्यायाला ॥ यतिवेषा ऐशा
वीरा-अणिलें-निंदा-स्पदतेला ॥ तें सारेंही
विसरुनी शेवटिं सौख्य दाविलें ॥ बहुत० ॥ १ ॥

अर्जुन– ( तिच्या हनवटीस हात लावून ) प्रिये, जें झालें
तें फार चांगलें झालें कारण–

पद.

[ अबमोरि छांड दे, या ठुमरीच्या चालीवर. ]

सुविहित जाहलें ॥ बहुत खुले भेदही जुळले रति-
मदनचि जसे ॥ सुवि० ॥ ध्रु० ॥ जलद जडत जसें
तप्त लोह तें अया सुतप्त निरहित अह्मी तसे ॥
सुवि० ॥ १ ॥

तुला आणखी सांगतों, तुझें आमचें चरित्र असें चमत्कारिक झालें आहे कीं, पुढे तें कवींना नाटक रचण्यास फार उपयोगीं पडेल.

सुभद्रा–प्राणवल्लभा, कित्येक घडून आलेल्या गोष्टींबद्दल माझी कांहीं अक्कल चालत नाहीं. हा आपणापाशीं असलेला शेला मजजवळ कसा आला आणि माझ्या कंठांतील रत्नमाला तुमच्या हातीं कशी गेली ?

अर्जुन–प्रिये, यासंबंधीं मला जितकें ठाऊक आहे तितकें तुझ्या कानांत सांगतों. ( तिच्या कानांत मागील गोष्ट सांगितल्याप्रमाणें करितो )

सुभद्रा–तरीच त्या वनांत आपण मला भेटलां खरे; पण त्या वेळीं आपलें मुख रक्तानें भरल्यामुळें व मी अति दुःखांत असल्यामुळें आपणांस ओळखलें नाहीं. तरी पण मला थोडासा भास झाला. पण प्राणनाथ, ज्यानें मला वनांत आणलें, तो राक्षस कोण असावा ? आणि पुनः मी आपल्या मंदिरांत कशी पोहोंचलें हें कसें कळेल ?

[ तदनंतर राक्षस प्रवेश करतो. ]

राक्षस–( हात जोडून ) महाराज, सुभद्रादेवी दुर्योधनास प्राप्त न व्हावी ह्मणून ऐन मुहूर्ताच्या वेळीं श्रीकृष्णाच्या आज्ञेप्रमाणें त्यांना घोर अरण्यांत आणिलें व त्यांच्या कंठांतील रत्नमालेसहित पत्राची थैली तेथें टाकून पुनः त्यास त्यांच्या महालांत नेऊन ठेविलें.

सुभद्रा–अरेरे कृष्णानें माझ्याकरितां इतकें केलें असून मी त्याचीही निंदा पुष्कळ केली.

राक्षस–अर्जुनकाका व सुभद्राकाकी या उभयतांच्या चरणीं हा बालक घटोत्कच वंदन करितो (नमस्कार करितो)

अर्जुन–अरे! हा भीमपुत्र घटोत्कच!'' वत्सा ये, मला आलिंगन दे. (त्यास आलिंगून) बाळा, त्या प्रसंगीं तुझ्या शरीरांतून मीं रक्त काढिलें याबद्दल आतां मला फार वाईट वाटतें.

राक्षस–काका, त्याचें मला किमपि दुःख झालें नाहीं; उलट मला आनंदच वाटला

अर्जुन–असो, तू माझ्या कामीं इतका झटलास याबद्दल तुझ्या पित्याला परमानंद होईल

सुभद्रा–(पुन अर्जुनास आलिंगून) प्राणनाथ, आपण दुसरी कांहीं तरी युक्ती करायची होती, तें सोडून सन्यास घेऊन लेकांनी चेष्टा करण्याला साधन कां बरें केलें तें ?

अर्जुन–प्रिये, जें मी केलें तें तुझ्या सूचनेवरून केलें

सुभद्रा–काय? सन्यास घ्यायला मीं आपणांस सांगितलें?

अर्जुन–हो हो–मी केवळ तोंडातोंडी नाहीं सांगत. त्याबद्दल तुझा लेख दाखवीन--हें पहा या घटोत्कचानें तुझ्या कंठातील रत्नमाला ज्या थैलीत घालून नेथें टाकिली होती त्यात तुझ्या हातचें हें पत्र होतें. (पत्र तिच्या हातीं देतो )

सुभद्रा–( पत्र वाचून पाहून ) हें अक्षर माझ्या अक्षरासारखें आहे; पण हें मीं लिहिलें नाहीं.

[ एकदम कृष्ण प्रवेश करतो. ]

कृष्ण–ताई, तुला अर्जुनच पति मिळावा, म्हणून जो

घेत रचिला होता त्याची जुळणी नीट होण्याकरितां तुझ्या अक्षरासारखें अक्षर काढून हें पत्र मी लिहिलें, समजलीस.

सुभद्रा–( लाजून अर्जुनाचे पाठीशीं उभी रहाते. )

कृष्ण–( अर्जुनाकडे तोंड करून ) परम सायासानें पत्नी मिळविलेल्या माझ्या मित्राचा विजय असो.

अर्जुन–कृष्णा, तुझा हा गुप्त प्रसाद मला कळला नसल्यानें तुझी मीं निंदा केली त्याची तू क्षमा करशीलच.

( असें म्हणून त्यास आलिंगतो कृष्ण व पार्थ भेटतात. )

सुभद्रा–( कृष्णास नमस्कार करून व गहिंवरून ) कृष्णा, तुझे मजवर उपकार किती झाले हें कांहीं माझ्यानें सांगवत नाहीं

कृष्ण–( तिला जवळ घेऊन डोळे पुसून ) ताई, मी दुसऱ्याकरितां झटलों असतों तर उपकार झाले असते. अग, माझें कर्तव्य मी केलें, समजलीस ?

सुभद्रा–अजून मोठें विघ्न तें आहेच. दादाची समजूत कशी करशील ?

कृष्ण–त्याविषयीं तू काळजी करूं नको आतां मी सांगतों असें कर घटोत्कचा, तू ही अर्जुनाच्या यतिवेषाची सामग्री सर्व एकत्र बांधून या पर्वताच्या मूलप्रदेशीं नेऊन टाक आणि यांच्या मागेंच ऐस आणि तसा प्रसंग पडलाच तर मीं सांगितल्याप्रमाणें कर

राक्षस–आज्ञा(असें म्हणून दंड त्यांच्या आदिकरून घेऊन जातो. )

कृष्ण–पार्था, आतां तू सुभद्रेसहवर्तमान हळूहळू पूर्वस्थळीं घे. मी पुढें जातों ( निघून जातो )

अर्जुन–प्रिये, आतां आल्या मार्गानें जाऊं चल. एकवार बलरामाला भेटून राजरोस होऊं.

सुभद्रा–चलावें. ( उभयतां कांहीं चालतात ) माझ्या उरांत कशी धडकी भरली आहे, कारण त्यांचा कोप फार भयकर आहे.

अर्जुन–(अवज्ञेनें) अग जा, काय करणार आहे तो. माझ्या हातांत धनुष्य असलें ह्मणजे यमालाही मी भिणार नाहीं. [ दोघें निघून जातात पश्चात ‘ अरे धांवा, पळा ’ असा गलबला होतो ] [ हा विष्कंभक ] [तदनंतर गलबला श्रवण करीत हातांत गदा घेऊन बलराम प्रवेश करितो ]

बल०–( आपल्याशीं ) अरे, कांहीं कारण नसतां या वेळेस गलबला कसला होत आहे ! कोण आहेरे तिकडे !

[ हात जोडून लंबकूर्च नांवाचा एक राक्षस प्रवेश करितो. ]

लंब०–( हात जोडून ) सरकार, एक मोठी दुःखकारक वार्ता आहे. आपणांस सांगितल्यावाचून निर्वाह नाहीं

बल०–(घाबरून) अरे, असें काय झालें तें बोल बोल—

लंब०–महाराज, सुभद्राताईसाहेबांना घेऊन तो दांभिक यति पळून गेला.

बल०–( कोपानें त्याच्या अंगावर धावून जाऊन ) अरे निर्लज्जा, निर्बल्या, नपुंसका, ही गोष्ट होईपर्यंत तू आणि तुझ्या हाताखालचे ते सहस्र पहारेकरी निजले होते कीं मेले होते रे ? थांबा हरामखोरांनो, या अपराधाबद्दल तुम्हां सर्वांस तोफेच्या तोंडीं बाधून उडवून टाकतों. अरे

तो कृष्ण कुठें आहे? कोण आहेरे, माझा रथ तयार करून लवकर आणा.

श्लोक– अनुष्टुप्.

घालीन पालथी पृथ्वी ॥ स्वर्ग पाडीन खालती ॥
बघतों जातसे कोठें ॥ दुष्ट चांडाल तो यती ॥

[ तदनंतर कृष्ण प्रवेश करतो. ]

कृष्ण– दादा, इतकें संतापायला काय झालें तरी काय?

बल०– काय? तुला अद्याप कळलेंच नाहीं? तो यति ह्मणे सुभद्रेस घेऊन पळून गेला!

कृष्ण– हें भविष्य मी पूर्वींच केलें होतें. पण आपण कुठें ऐकलेंत?

बल०– ( कृष्णाकडे तोंड करून रागानें ) कृष्णा, हें सर्व कपट तुझें आहे मी पक्कें समजतों. तू ज्या त्या माझ्या बेतांत असेंच विघ्न करतोस जाऊ दे, मलाही कंटाळा आला, नको तें राज्य आणि नको तो प्रपंच. मी संन्यास घेऊन कोठें तरी निघून जातों. कोण आहेरे, माझ्या सन्यासाची तयारी करा.

[ इतक्यांत हातांत यतिवेषाची सामग्री घेऊन एक चाकर प्रवेश करतो ]

चाकर– हा घ्यावा महाराज यतीचा वेष.

बल०– अरे वा! कृष्णा, मी सन्यास घेऊन लवकर निघून जावें ह्मणून किती तयारी ठेवली आहेस तरी ही!

कृष्ण– दादासाहेब, तो काय ह्मणतो हें पुरतें ऐकून घेतल्यावाचून टीका करू नये.

बल०– ( तुच्छतेनें ) तूंच ऐक ऐकून काय ह्मणतो तें.

कृष्ण–( चाकरास ) कायरे, काय ह्मणतोस तें ट सांग

चाकर–ऐकावें महाराज. सेनापति सात्यकीमहाराज ताईसाहेबाच्या शोधाकरितां हिंडत असतां पर्वताच्या मूल-प्रदेशीं हा यतिवेष पडलेला सांपडला, तो मजकडे देऊन त्यांनीं मला पुढें पाठविलें. मागून ते स्वतः सर्व वृत्तांत समजून घेऊन येत आहेत.

[ इतक्यांत सात्यकी प्रवेश करितात. ]

सात्यकी–उभयतां सरकारचा विजय असो. महाराज, आनंदकारक वर्तमान निवेदन करण्यास आलों आहें.

बल०–( शांत होऊन ) वत्सा, बोल बोल लवकर.

सात्यकी–सुभद्राताईसाहेबांस एका सुंदर तरुण राज-पुत्रानें सोडविली व त्यासहवर्तमान तो या पर्वतावरून खालीं उतरून येत आहे त्यानें त्या दांभिक यतीस शिक्षा करून त्याचा वेष काढून घेऊन या पर्वताखालीं टाकून दिलेला मला सांपडला तो तर पहाण्याकरितां पुढें मी पाठवून दिलाच होता.

बल०–बरें, सात्यकी, तो तरुण राजपुत्र कोण असावा असें तुला वाटलें?

सात्यकी–मीं त्याला दुरून पाहिलें असल्यामुळें अमकच असें सांगता येत नाहीं. पण बहुशः तो राजा दुर्योधन असावा असें मला वाटलें

बल०–कोणीही असो. असा ज्यानें मजवर उप केला त्याला मीं आपली सुभद्रा अर्पण केली.

कृष्ण— दादा विचार करून बोला; दुर्योधनास वचन गेलेलें आहे.

बल०— अरे, अरे, तो दुर्योधन असला तर बरेंच झालें. नसला तरी तो माझा शिष्यच आहे, त्याची समजूत मी हवी तशी करीन. सात्यकी, तू लवकर जा, आणि त्या राजपुत्रास सुभद्रेसह इकडे घेऊन ये. मी त्याला भेटण्याविषयीं अति उत्सुक झालों आहें.

सात्यकी— आज्ञा. ( असें म्हणून आत जाऊन सुभद्रा व अर्जुन यांसह प्रवेश करून ) असें इकडे यावें. हे सरकार आपणास भेटण्याविषयीं उत्सुक झाले आहेत.

बल०— ( दोन पावलें पुढें होऊन ) शाबास, वीरशिरोमणे, शाबास. तू केलेल्या उपकाराबद्दल ही माझी प्रिय भगिनी सुभद्रा मीं तुला अर्पण केली.

( अर्जुनास ओळखून ) अरेरे ! घात झाला. न जाणतां मी दिलेलें वचन कांहीं खरें नव्हे ( रागानें ) अरे चांडाळा अधमा पार्था ! अशा कपटानें सुभद्रा मिळवूं पहातोस काय ? तर सुभद्रेबद्दल या गदेचा प्रहार तुला देतों. ( गदाप्रहार करण्याकरितां अर्जुनावर जातो तों गर्गमुनी येऊन बलरामाचा हात धरितात )

गर्ग०— हां हां ! बलरामा, वचनभंग करूं नकोस. शुद्धीवर ये, शुद्धीवर ये. अरे, अर्जुनाचा घात करून भगिनीला वैधव्य आणणार कीं काय ?

बल०— ( गदा फेकून देऊन ) तर महाराज ही गदा घेऊन माझ्या डोक्यांत घालावी.

गर्ग०— रामा, तूं महाज्ञाता असूच असें काय वेरें वेड पांघरतोस ? तुझा मजवर विश्वास आहे कीं नाहीं ? मी कांहीं तुमचें अकल्याण होऊं देणार नाहीं.

बल०— गुरुराज, आपलें वचनामृत प्राशन करितांच माझा सर्व संताप नाहींसा होऊन मी शांत झालों.

गर्ग०—ऐक तर. सुभद्रेला अर्जुनच पति योग्य आहे आणि अर्जुनाला सुभद्रा स्त्री योग्य आहे. यदुपाडूंचा जो पूर्वापार संबंध चालत आला आहे तो तसाच चालावा अशी मी सर्वेश्वरापाशीं प्रार्थना करितों.

बल०—( शांत होऊन ) मी आपल्या इच्छेविरुद्ध वाग णार नाहीं.

गर्ग०—तर मग सुभद्रेचा हस्त अर्जुनाच्या हातांत भ-जदेखत घाल, आणि अर्जुनावरील राग सोडून देऊन त्याजवर लोभ कर.

बल०—ठीक आहे. गुरूंची आज्ञा प्रमाण.

गर्ग०—पार्था, तूं बलरामास नमस्कार कर.

अर्जुन—आर्या, मी आपणास अभिवादन करितों. ( नमस्कार करितो )

बल०—( सुभद्रेचा हात धरून अर्जुनास ) वत्सा,

( साकी पूर्वार्ध )

हा भगिनीचा कर मीं तव करिं धनंजया घे दिधला ॥

अर्जुन—( उत्तरार्ध म्हणतो )

अत्यादरपूर्वक मीं याचा स्वीकार पहा केला ॥

कृष्ण—( साकीचा शेवट करितो )

नांदा सौख्यभरें ॥ शोभो कुल तव सत्कुमरें ॥

[ इतक्यांत रुक्मिणी प्रवेश करिते ]

रुक्मिणी–वन्सें, माझ्याशीं अबोला धरलेला आतां तरी सोडाल ना ? शेवटीं सन्याशालाच वरिलेंत पण ?

सुभद्रा–( खालीं मान घालून, लाजून ) वहिनी, आतां बोलशील तितकें थोडें आहे.

गर्ग०–पार्था, तुझे सर्व हेतु परिपूर्ण झाले. पण आणखी कांहीं इच्छा असली तर माग.

अर्जुन–महाराज, आपल्या कृपेनें सर्व मनोरथ पूर्ण झाले आतां काय मागूं ! तथापि भगवताच्या मनांतून देण्याचें असेल तर हें भरतवाक्य असो—

## श्लोक–पृथ्वी छंद.

वसो नृपतिच्या मनीं सदयता क्षमाबुद्धि ती ॥
प्रजाजनहि सुधर्में करुत आत्मदेशोन्नती ॥
सुकाव्यरचनीं असो सुलभ ती कवींना मती ॥
स्वयंभु सकलां जनां निपजवो सुकार्यीं रती ॥

गर्ग०–( वर हात करून ) तथास्तु !

[ असें झाल्यावर सर्व निघून जातात ]

( पांचवा अंक समाप्त )

# नाटककर्त्यांची ईश्वरास प्रार्थना.

रंगधीरा श्रीनिरवरदगणपकुमरा ॥
निखिलसुगभरण ॥ रण० ॥ ध्रु० ॥
मारहरा विबुधवरा मोदकरा बहुगुणगंभीरा ॥
भस्मधरा विनतपरा कलितगरा सुखनिकरा ॥
सुगिरा मुखरा हृतकालकृतदरा श्रुतिशिखरसुविहारा ॥
ने वा तू हा पतितानिजघरा तुजचि शरण ॥रण०॥१॥
दिग्वसना पुरमथना शिखिनयना पदनतसंस्थाना ॥
वृषवहना मुदितमना भवशमना कलिदमना ॥
स्वजनाकलना श्वशुराध्वरलवना स्थितिलयजन्य-
वसाना ॥
भो ताता तूं सुकवि शिवहरा जननमरण ॥रण०॥२॥
वेदनुता अमरहिता बोधरता हिमनगजामाता ॥
योगजिता बहुविनता रजतसिता सुखभरिता ॥
वनितासहिता तव किंकर लवता करि सुकवि बलवंता॥
श्री कीं भू ती प्रिय न मज जरा तवचि चरण॥रण०३॥

नाटक
२३२६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १९८५५
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)